**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.**

**इतिहास विषयाच्या एम. फिल. (विद्या निष्णात) पदवीसाठी सादर**

**केलेला लघुशोधप्रबंध**

**शीर्षक**

# ● माळशिरस तालुक्यातील सहकारी चळवळींचा आढावा (१९५० ते २०००): एक चिकित्सक अभ्यास ●


संशोधक

**श्री. योगेश नंदकिशोर इनामदार**

एम. ए., एम. लिब.

मार्गदर्शक

**डॉ. व्ही. एच. निंबाळकर**

एम. ए., बी.एड्.,पीएच. डी.

इतिहास विभागप्रमुख,

**अे**. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर

मा. अधिष्टाता, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा,

सोलापूर विद्यापीठ, सोलापूर


**एप्रिल-२०११**

# <u>प्रतिज्ञापत्र</u>

मी प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की, “माळशिरस तालुक्यातील सहकार चळवळींचा आढावा (१९५० ते २०००): एक चिकित्सक अभ्यास” या विषयावरील प्रस्तुत प्रबंध, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या एम. फिल. (इतिहास) या पदवीसाठी सादर करीत आहे. प्रस्तुत लघुशोधप्रबंध अथवा त्याचा कोणताही भाग संशोधकाने अन्यत्र कोठेही व कोणत्याही पदवी वा पदवीका परिक्षेसाठी सादर केलेला नाही.

**स्थळ :-** **संशोधक**

**दिनांक :-** **(श्री. योगेश नंदकिशोर इनामदार)**

**कायम नोंद क्र. ०२२०८०००४७२**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री. योगेश नंदकिशोर इनामदार यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या एम. फिल. पदवीसाठी सादर केलेला आहे. 'माळशिरस तालुक्यातील सहकारी चळवळीचा आढावा (१९५० ते २०००) एक चिकित्सक अभ्यास' हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पुर्ण केलेला आहे. प्रबंध लेखनात ज्या संदर्भ ग्रंथांचा आधार घेण्यात आलेला आहे. त्याचा आवश्यक तेथे यथोचित निर्देश केला आहे.

सदर प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या एम. फिल. पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

**स्थळः** **मार्गदर्शक,**

**दिनांकः** **डॉ. व्ही. एच. निंबाळकर**

एम. ए., बी.एड्.,पीएच. डी.

इतिहास विभागप्रमुख,

**अे**. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर

मा. अधिष्टाता, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा,

सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## ऋणनिर्देश

विद्यानिष्णात पदवीसाठी २००८-०९ या शैक्षणिक वर्षामध्ये "माळशिरस तालुक्यातील सहकार चळवळींचा आढावा (१९५० ते २०००): एक चिकित्सक अभ्यास" हा संशोधन प्रबंध पुर्ण करण्याकरिता ज्यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत केली त्यांचे आभार मानणे हे माझे परमकर्तव्य समजतो.

सर्वप्रथम टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांनी मला एम. फिल ला प्रवेश देऊन माझ्या विषयास मान्यता दिली, त्यामुळे हा अभ्यासक्रम पुर्ण करण्याची मला संधी मिळाली. सामाजिक अधिष्टाता, प्रा. विजय कारेकर, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, विभागप्रमुख, इतिहास विभागाचे प्रा.श्रध्दा कुंभोजकर मॅडम, प्रा. विजय कुंजीर यांनी जे मार्गदर्शन केले त्यांचे आभार मानतो.

या संशोधनासाठी लागणारी कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यासाठी श्री. हनुमान शिक्षण प्रसारक संस्था माळशिरसचे ज्येष्ठ मार्गदर्शक श्री. विष्णुपंत विठ्ठलराव कुलकर्णी, कार्याध्यक्ष श्री. श्रीकांत पंचवाघ यांनी जी मदत केली त्यामुळे त्यांचे मी आभार मानतो. माझे सहकारी मित्र प्रा. तेलसंग, प्रा. भोजने, प्रा. बंदुके, प्रा. कांबळे , प्रा. बावळे, प्रा. विकास यलमार यांनी वेळोवेळी मदत व प्रोत्साहन दिले, त्यांचेही आभार मानतो.

माझ्या कुटूंबातील सर्वांनी या कार्यात खंबीरपणे पाठीशी उभे राहून मदत केली. प्रबंध पुर्ण होईपर्यंत प्रोत्साहन दिले व माझे धैर्य टिकवण्यास मदत केली. त्यामुळे मी त्यांचा ऋणी आहे.

या संशोधनासाठी लागणारे संदर्भ ग्रंथ विजयसिंह मोहिते पाटील महाविद्यालय, नातेपूते येथील ग्रंथपाल, पाटील सर, शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालयाचे उपग्रंथपाल सुर्वे सर, गोपाळराव देव प्रशालेचे ग्रंथपाल सुधीर पंचवाघ यांनी तत्परतेने उपलब्ध करुन दिले त्यांचे मी आभार मानतो.

या प्रबंधाच्या पुर्ततेसाठी मार्गदर्शक म्हणून लाभलेले डॉ. विलास हरिभाऊ निंबाळकर यांनी विषय निवडीपासून ते कागदपत्रे मिळवून शास्त्रीय दृष्टया प्रबंध कसा पुर्ण होईल यासाठी योग्य ती दिशा दाखविली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे मला या विषयाचा अभ्यास पुर्ण करता आला. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

तसेच अत्यंत कमी वेळात प्रा. गेजगे डी. एस. यांनी अत्यंत आकर्षक पध्दतीने संगणकीय अक्षरजुळणी प्रबंध माडणी केली. त्याबद्दल त्यांचाही मी अत्यंत ऋणी आहे.

**प्रा. योगेश नंदकिशोर इनामदार**

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | मुखपृष्ठ. | १ |
| | प्रतिज्ञापत्र. | २ |
| | मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र. | ३ |
| | ऋणनिर्देश. | ४ |
| | अनुक्रमणिका. | ६ |
| | तक्ता यादी | ७ |
| १. | माळशिरस तालुक्याची ऐतिहासिक, भौगोलिक पार्श्वभूमी | ९ |
| २. | सहकारी चळवळींचा इतिहास | २१ |
| ३. | माळशिरस तालुक्यातील प्रमुख सहकारी संस्था आणि त्यांचे कार्य | ५० |
| ४. | माळशिरस तालुक्याच्या सहकारी चळवळींचे नेतृत्व | ११६ |
| ५. | उपसंहार | १४१ |
| | संदर्भ ग्रंथ सूची. | १४९ |
| | परिशिष्टये. | १५२ |

## तक्ता यादी


| तक्ता क्र. | तक्त्याचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | | १९ |
| २. | भारतातील सहकारी संस्था | ३९ |
| ३. | भारतातील सहकारी संस्था तपशिल | ४२ |
| ४. | महाराष्ट्र राज्य सहकार चळवळीची प्रगती | ४४ |
| ५. | महाराष्ट्रातील सहकारी संस्था | ४५ |
| ६. | माळशिरस तालुक्यातील सहकारी संस्था | ४८ |
| ७. | माळशिरस तालुक्यातील सहकार चळवळीचा विकास | ४९ |
| ८. | माळशिरस तालुक्यातील सहकारी संस्था प्रगती आलेख | ५० |
| ९. | सूतगिरणी भागभांडवल | ५५ |
| १०. | सूतगिरणी बंद रोटर्सची कारणे | ५७ |
| ११. | सत उत्पादन वृतांत | ५७ |
| १२. | कापूस खरेदी | ६० |
| १३. | दूध उत्पादक सहकारी संस्था सभासद | ६३ |
| १४. | शिवामृत दूध संघाचे कृत्रिम रेतन व औषधोपचार केंद्रे | ६७ |
| १५. | ऊस विकास योजना | ८२ |
| १६. | ॲसिटीक ॲसिड उत्पादन | ८५ |
| १७. | प्रतिटन ऊसाला दिलेला दर | ८८ |
| १८. | कारखान्याच्या विकासाची वाटचाल | ९१ |
| १९. | मागासवर्गीय अनुदान योजना | ९५ |
| २०. | सभासद संख्या | ९७ |
| २१. | सभासद भागभांडवल | ९८ |

| | | |
|---|---|---|
| २२. | साखर उतार | ९८ |
| २३. | निव्वळ उत्पादीत साखर पोती | ९९ |
| २४. | बँकेतील ठेवी | १०३ |
| २५. | बँकेने दिलेले कर्ज | १०३ |
| २६. | निव्वळ नफा | १०४ |
| २७. | खेळते भागभांडवल | १०५ |
| २८. | सभासद लाभांश | १०५ |
| २९. | विजय सहकारी कुक्कूटपालन संघ | १०७ |
| ३०. | माळशिरस तालुक्यातील सहकारी संस्था माहिती | ११० |

## प्रकरण. १ ले :

## ● माळशिरस तालुक्याची ऐतिहासिक, भौगोलिक परिस्थिती ●

**प्रास्ताविक :**

माळशिरस हे सोलापूर जिल्ह्यातील महत्त्वाचे असे तालुक्याचे ठिकाण आहे. स्वातंत्र्योत्तर काळानंतर भारतात कृषी विकास, औद्योगिक विकास आणि शैक्षणिक विकासासाठी पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून व सहकारी चळवळीच्या माध्यमातून स्थानिक भागाच्या विकासास सुरूवात झाली. अत्यंत कमी पाऊस पडत असलेल्या या क्षेत्रामध्ये स्वातंत्र्यपुर्व काळात पारंपारिक पध्दतीने शेती व उद्योग केले जात होते. येथे मुख्यतः ज्वारी, बाजरी, मका, मटकी, तूर यासारखी पिके घेतली जात होती. मात्र स्वातंत्र्योत्तर काळानंतर व सहकार चळवळीच्या विकासानंतर या पिक पध्दतीत मोठया प्रमाणात बदल होऊन ऊस, कापूस, डाळीब, बोर यासारखी नगदी पिके घेतली जाऊ लागली आहेत.

दारिद्र्य व बेकारी या दोन्ही समस्या आर्थिक व सामाजिक दृष्टीकोनातून हानीकारक असतात. यामुळे आर्थिक व सामाजिक विषमतेला दूर करण्यासाठी रोजगाराची समस्या सोडविण्यासाठी सहकारी चळवळीची सुरूवात झालेली आहे.

माळशिरस हे सोलापूर जिल्ह्यातील महत्त्वाचे असे तालुक्याचे ठिकाण आहे. स्वातंत्र्योत्तर काळानंतर भारतात कृषी विकास, औद्योगिक विकास आणि शैक्षणिक विकासासाठी पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून व सहकारी चळवळीच्या माध्यमातून स्थानिक भागाच्या विकासास सुरूवात झाली. अत्यंत कमी पाऊस पडत असलेल्या या क्षेत्रामध्ये स्वातंत्र्यपुर्व काळात पारंपारिक पध्दतीने शेती व उद्योग केले जात होते. येथे मुख्यतः ज्वारी, बाजरी, मका, मटकी, तूर यासारखी पिके घेतली जात होती. मात्र स्वातंत्र्योत्तर काळानंतर व सहकार चळवळीच्या विकासानंतर या पिक पध्दतीत मोठया

प्रमाणात बदल होऊन ऊस, कापूस, डाळीब, बोर यासारखी नगदी पिके घेतली जाऊ लागली आहेत.

दारिद्र्य व बेकारी या दोन्ही समस्या आर्थिक व सामाजिक दृष्टीकोनातून हानीकारक असतात. यामुळे आर्थिक व सामाजिक विषमतेला दूर करण्यासाठी रोजगाराची समस्या सोडविण्यासाठी सहकारी चळवळीची सुरूवात झालेली आहे.

**१) समस्या विधान :**

प्रस्तुत संशोधकाने माळशिरस तालुक्यातील सहकारी चळवळींचा आढावा (१९५०-२०००): एक चिकित्सक अभ्यास ही समस्या संशोधनासाठी निवडली आहे.

**२) विषयाचे कुतूहल / विषयाची निवड :**

सहकारी चळवळीची सुरूवात जगामध्ये सन १८४४ साली झाली. वर भारतात सन १९०४ साली झाली. या चळवळीमुळे ग्रामीण भागाचा विकास मोठया प्रमाणात घडून आलेला आहे. माळशिरस तालुक्यात ही चळवळ१९ पासून सुरू झालेली आहे. सहकारी चळवळींमुळे येथील पीकपध्दतीत लोकांच्या राहणीमानात कसा बदल झालेला आहे. एकंदरीत तालुक्याचा विकास घडून येण्यासाठी सहकारी चळवळ कशी फायदेशिर ठरली आहे याचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने या विषयाची निवड केलेली आहे.

आधुनिक काळामध्ये इतिहास लेखनातील बदलत्या प्रवाहामुळे इतिहासातील शाखेमध्येही बदल होत आहेत. या बदलांना अनुसरून संशोधकानेही संशोधनासाठी स्थानिक इतिहासाच्या दृष्टीने माळशिरस तालुक्यातील सहकारी चळवळींचा ऐतिहासिक दृष्टीकोनातुन हा विषय निवडला आहे.

**३) संशोधन विषयाचे महत्त्व :**

स्वातंत्र्योत्तर काळात सहकारी चळवळीने ग्रामीण भागाच्या विकासात महत्त्वाची कामगिरी पार पाडलेली आहे. माळशिरस तालुक्यातील सहकारी चळवळीतुन उभ्या राहिलेल्या विविध उद्योगधंदयांचा व सहकारी चळवळीला लाभलेल्या नेतृत्त्वाला परिचय

समाजाला करुन देण्यासाठी संशोधन विषयाचे महत्व मोठे आहे. सहकारी चळवळीमुळे स्थानिक रोजगार मोठया प्रमाणात उपलब्ध होऊन ग्रामीण भागातून शहरी भागांकडे होणारे लोकांचे स्थलांतर कमी होते. सहकारी चळवळींमुळे समाजाचा विकास होतो. समाजात एकत्मिक व सहकार्याची भावना वाढीस लागते. याची माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने संशोधन विषयाचे महत्त्व आहे.

**४) उद्दीष्टये :**

१) माळशिरस तालुक्याचा थोडक्यात ऐतिहासिक, भौगोलिक आढावा घेणे.

२) सहकारी चळवळींचा थोडक्यात ऐतिहासिक आढावा घेणे.

३) माळशिरस तालुक्यातील विविध सहकारी संस्थांचा व त्यांच्या कार्याचा आढावा घेणे.

४) माळशिरस तालुक्यातील सहकारी चळवळीतील नेतृत्वाचा आढावा घेणे.

५) सहकारी चळवळीतील विविध सहकारी संस्थांच्या स्थापनेमुळे लोकांच्या उत्पन्नावर, रोजगारावर, बचत, गुंतवणूक आणि उपभोगावर कोणता परिणाम झाला याचा अभ्यास करणे.

६) माळशिरस तालुक्याच्या विकासात सहकारी चळवळींचे कोणते योगदान आहे याचा अभ्यास करणे.

**५) गृहितके / अभ्युपगम :**

प्रस्तुत संशोधकाने संशोधनाकरीता निवडलेल्या समस्येसाठी खालील महत्त्वाची गृहितके गृहित धरली आहे.

१) सहकारी चळवळींमुळे लोकांच्या आर्थिक परिस्थित सुधारते व विकासास मदत होते.

२) ग्रामीण भागाच्या विकासास उत्तेजन मिळते.

३) मोठया प्रमाणात स्थानिक रोजगार उपलब्ध होतो.

४) समाजामध्ये शैक्षणिक, सांस्कृतिक विकासाच्या बदलासाठी वाव मिळतो.

५) समाजामध्ये परस्पर सामंजस्याची व सहकार्याची भावना वाढीस लागते.

**६) विषयाची व्याप्ती :**

माळशिरस तालुक्यातील सहकारी चळवळींचा विचार करीत असताना या विषयाची व्याप्ती स्पष्टपणे मांडणे आवश्यक आहे. या प्रबंधामध्ये प्रदेशाच्या दृष्टीने संपुर्ण माळशिरस तालुक्यातील सहकारी चळवळीचा (१९५० ते २०००): एक चिकित्सक अभ्यास केला जाणार आहे. या तालुक्याची व्याप्ती दर्शविणारा नकाशा या प्रबंधामध्ये देण्यात आलेला आहे. माळशिस तालुक्यतील सहकारी चळवळींचा इतिहास हा प्रामुख्याने स्थानिक इतिहास या दृष्टीने अभ्यासलेला आहे.

**७) भौगोलिक स्थान :**

माळशिरस तालुका महाराष्ट्राच्या दक्षिण बाजूस असलेल्या सोलापूर जिल्हयाच्या पश्चिम भागात बसला आहे. माळशिरस तालुक्याचे रेखांश ७४°.४५ पूर्व ते ७५°.१६ पूर्व तर अक्षांश १७°४० उत्तर ते १७°.५६ उत्तर आहे. तालुक्याच्या पूर्वेस सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुका पश्चिमेस सातारा जिल्ह्यातील माण तालुका, दक्षिणेस सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुका तर उत्तरेस पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुका आहे. तालुक्याची उत्तर सीमा नीरा नदीने तर पूर्वेकडील काही सीमा नीरा-भीमा नदीने निश्चित केली आहे. माळशिरस तालुक्याची दक्षिण पश्चिम सीमा सह्याद्री पर्वतातील महादेवाच्या डोंगररांगांनी निश्चित केली आहे. माळशिरस तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ १,६०,८०१.६४ हेक्टर इतके आहे.[१]

**८) प्राकृतिक रचना व उतार :**

माळशिरस तालुक्याच्या दक्षिण सीमेवर सह्याद्री पर्वताची उपशाखा असणाऱ्या महादेवाची डोंगररांग असल्याने हा भाग उंच डोंगराळ ओसाड अशा स्वरुपाचा आहे. तालुक्याच्या उत्तर सीमेवरुन नीरा नदी वाहत असल्याने हा भाग कमी उंचीचा आहे. त्यामुळे तालुक्याचा नैसर्गिक उतार हा दक्षिणेकडून उत्तरेकडे आहे. त्यामुळे ईशान्य कोपऱ्यात पुणे जिल्ह्यातून येणाऱ्या भीमा व नीरा नदीचा संगम नीरा-नृसिंहपूर येथे होतो. ही भीमा व नीरा नदी पुढे तालुक्याच्या उत्तर – पूर्व सीमेवरून वाहत जातात. तालुक्याच्या

दक्षिण भागात शेतीसाठी सिंचनाच्या सोयी नसल्याने, हा भाग डोगराळ असल्यामुळे अतिशय मागास व अविकसित आहे. तर नदी व कालव्याच्या सिंचन सोयीमुळे उत्तर व पूर्व भाग मात्र अतिशय विकसित झाला आहे.

**९) जलप्रणाली :**

माळशिरस तालुक्यात नीरा व भीमा या मुख्य दोन नद्या आहेत. या दोन जलसिंचीत झाले आहे. या नद्यामुळेच माळशिरस तालुक्यातील क्षेत्र आर्थिकदृष्टया प्रबल झाले आहे. नीरा नदीची माळशिरस तालुक्यातील एकूण लांबी ८४ कि. मी. असून तालुक्यातील संगम येथे पुणे जिल्ह्यातून येणाऱ्या भीमा नदीशी नीरा नदी येऊन मिळते. भीमा नदीची माळशिरस तालुक्यातील लांबी ४२ कि. मी. इतकी आहे. नीरा नदीमुळे तालुक्यातील १९ गावाच्या शेतीला पाणी पुरवठा झाला असून भीमा नदीमुळे १३ शेतीला पाणीपुरवठा होत आहे.

माळशिरस तालुक्यातील दक्षिण असलेल्या शंभू महादेव डोंगरामुळे त्या भागातील भूपृष्टाची समुद्रसपाटीपासूनची उंची सर्वाधिक तर उत्तरपूर्व सीमेवरून वाहणाऱ्या नीरा नदीमुळे या भागात उंची सर्वात कमी आढळते. त्यामुळे तालुक्याच्या भूपृष्टाचा नैसर्गिक उतार हा दक्षिणेकडून उत्तरेकडे असल्याचा दिसतो. त्यामुळे बहुतांश झरे, ओढे, नदीच्या नैसर्गिक उतारामुळे उत्तरेकडे वाहत जाऊन नीरा नदीला मिळतात. तर तालुक्याच्या अतिपूर्व दक्षिण भागातील नदीनाले हे पूर्वेकडे वाहत जाऊन भीमा नदीला मिळतात.[२]

माळशिरस तालुक्यात सहा प्रमुख नाले असून आठ गावच्या शेतीला या मुख्य नाल्यापासून पाणीपुरवठा होतो. ब्रिटीश कालखंडात नीरा नदीवर पुणे जिल्ह्यातील भाटघर येथे बांधलेल्या धरणातून येणारा नीरा उजवा कालवा हा माळशिरस तालुक्याच्या जवळपास मध्यातून जातो. माळशिरस तालुक्यातील या कालव्याची एकूण लांबी ६८ कि. मी. आहे. तर या मुख्य कालव्याचे कालवा क्र . ४१ ते क्र.६५ पर्यंत कालवे तालुक्यात आहेत. त्यांची एकूण लांबी २५,५६३ हेक्टर क्षेत्र सिंचीत झाले आहे.

माळशिरस तालुक्याच्या उत्तरेला असणाऱ्या माढा तालुक्यातील भीमा नदीवरील उजनी धणाच्या (सोलापूर जिल्हा) यशवंत सागर जलाशयातून येणारा मुख्य कालवा

पुलाच्या साहय्याने भीमा नदी ओलांडून उत्तरेकडून तालुक्यातून प्रवेश करतो. त्यानंतर तालुक्याच्या उत्तरपूर्व भागातून वाहत जाऊन पंढरपूर तालुक्यात प्रवेश करतो. या कालव्यांची तालुक्यातील एकूण लांबी केवळ ४१ कि. मी. असून तालुक्यातील मीरे, लवंग, जांबूड, उंबरे, वेळापूर, दसून, बोरगाव, खळवे, तोंडले-बोंडले या गावाच्या शेतीला हा कालवा वरदान ठरला आहे. एकंदरीत तालुक्याचा उत्तर बाजूचा भाग हा सिंचित असून दक्षिणेकडील बहुतांश भाग मात्र कोरडवाहू असल्याचे दिसते.

**१०) हवामान :**

माळशिरस तालुका महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वताच्या पर्जन्याच्या छायेच्या प्रदेशात येत असल्याने हवामान प्रामुख्याने उष्ण व कोरडे आहे. माळशिरस तालुक्यात उन्हाळा ऋतूची सुरूवात मार्चमध्ये होऊन तो मे च्या शेवटी संपतो तर जूनच्या पहिल्या आठवड्यात नैऋत्य मान्सूनचे आगमन होऊन पावसाळा ऋतूस सुरूवात होते. हा पावसाळा सप्टेंबर पर्यंत चालतो. डिसेंबर अखेरीस हिवाळयाची सुरूवात होते, तो फेब्रुवारीच्या शेवटपर्यंत चालतो. सन-२००५ च्या आकडेवारीनुसार माळशिरस तालुक्याचे सरासरी वार्षिक कमाल तापमान ३३.२४°८१ तर वार्षिक सरासरी किमान तापमान ३०.८१°८१ एवढे असल्याचे दिसून येते.[३]

**११) पर्जन्यमान :**

माळशिरस तालुक्याचे सरासरी पर्जन्यमापन करणेसाठी तालुक्यात ११ पर्जन्यमापक क्षेत्रे आहेत. सोलापूर जिल्ह्यात सर्वात कमी पावसाचा तालुका म्हणून माळशिरस तालुका ओळखला जातो. माळशिरस तालुक्यात सन-२००० मध्ये सरासरी पर्जन्य ४८४.२३ मी. मी. एवढे पडले असून सर्वात कमी पर्जन्य नातेपूते मंडलात ४५९.३ मी. मी. एवढे होते.[४]

**१२) वनसंपदा :**

सन २०००० चे आकडेवारीनुसार माळशिरस तालुक्यातील वनाखालील एकूण क्षेत्र ६८५८ हेक्टर इतके आहे. माळशिरस तालुक्याच्या प्रामुख्याने दक्षिण भागातच वने आढळतात उत्तर भागात हे प्रमाण अगदी नगण्यच आहे. सामाजिक वनीकरण व

वनविभाग यांचेमार्फत या वनांची लागवड केली असून त्याची निगा राखली जाते. यात प्रामुख्याने चिंच, लिंब, बाभूळ, निलगिरी इ. वृक्षाचा समावेश आहे.

**१३) मृदा :**

पिकांच्या वाढीसाठी सर्वात महत्त्वाचा घटक मृदा होय. माळशिरस तालुका हा दख्खनच्या पठारावर असल्याने काळी कसदार मृदा असून तिची पाणी साठवून ठेवण्याची क्षमता चांगली आहे. माळशिरस तालुक्याच्या दक्षिण बाजूस असणाऱ्या डोंगराळ भागामुळे या भागातील अत्यंत हलक्या प्रकारची असून मृदेचा थर १० से. मी. जाडीपेक्षा कमी आहे. पाण्याचे दुर्भिक्ष, सिंचनाचा अभाव व डोंगराळ प्रदेशातील पर्जन्यामुळे मृदेची धूप जास्त होत असलेने जमीन अत्यंत निकृष्ट प्रतिची आहे. तर जसजसे उत्तरेकडे जावे तसतसे मृदेच्या थराची जाडी वाढताना दिसून येते. तालुक्याच्या उत्तरेकडील नदीमुळे नदीकाठची जमीन ही गाळाची, सूपीक व १०० से. मी. पेक्षा जास्त जाडीचा थर असणारी आहे.[५]

**१४) लोकसंख्या :**

सन २००१ च्या जनगणनेनुसार माळशिरस तालुक्याची लोकसंख्या ४,२२,६०० इतकी आहे. तालुक्यामध्ये एकही नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका नसल्याने संपुर्ण तालुक्याची लोकसंख्या ही ग्रामीण आहे. २००१ च्या जनगणनेप्रमाणे पुरुष लोकसंख्या २,१९,७६२ तर स्त्री लोकसंख्या २,०२,८३८ होती. एकूण कुटूंबे ९०,२८१ इतकी आहेत.[६]

**१५) जमिनधारणा क्षेत्र :**

जमिनीच्या उत्पादकतेवर जमिनीच्या सरासरी धारणाक्षेत्राचे आकारमान मोटे असेल तर उत्पादन व उत्पादकता जास्त राहते. छोटया धारणाक्षेत्रामुळे उत्पादन व उत्पादकता कमी राहते. माळशिरस तालुक्यातील एकूण खातेदारांची संख्या १,२१,०८५ इतकी आहे. ० ते १ हेक्टर पर्यंत जमीन असणाऱ्या खातेदारांची संख्या २४,२६३ इतकी

आहे. १ ते २ हेक्टर पर्यंत जमीन असणाऱ्या खातेदारांची संख्या १९,०५५ इतकी आहे. २ ते ४ हेक्टर पर्यंत जमीन असणाऱ्या खातेदारांची संख्या १३,३११ असून त्यांनी धारण केलेले क्षेत्र ३६,०२३ हेक्टर आहे. ४ हेक्टरवरील खातेदारांची संख्या ५,७९४ असून त्यांनी धारण केलेले क्षेत्र ९११ हेक्टर आहे. अशाप्रकारे तालुक्यातील एकूण जमीनीपैकी सर्वाधिक जमीन ही ४ हेक्टरपेक्षा जास्त आकारमानाची असून ती धारण करणाऱ्या खातेदाराचे एकूण खातेदाराशी असणारे प्रमाण सर्वात कमी आहे. म्हणजे तालुक्यातील जमीनीचे मोठया शेतकऱ्यांच्या हातीच केंद्रीकरण झालेचे दिसते.

### १६) जलसिंचन :

माळशिरस तालुक्यातील शेतीसाठी विहीरीची संख्या १८,४९९ असून या विहीरीच्या पाणीपुरवठयद्वारे भिजणारे क्षेत्र ५०,९१६.३५ हेक्टर इतके आहे. तर विंधन विहीरीची एकूण संख्या ३,१४३ इतकी असून त्याद्वारे भिजणारे क्षेत्र हे ६,५७५.६० हेक्टर आहे. तालुक्यातील लघुपाठबंधारे पाझरतलाव संख्या ६८ इतकी असून त्याद्वारे भिजणारे क्षेत्र ७२९.९२ हेक्टर इतके आहे. कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांची संख्या १४१ इतकी असून त्याद्वारे भिजणारे क्षेत्र ५४१.३२ हेक्टर इतके आहे. वळणबंधाऱ्यांची संख्या ७ इतकी असून या बंधाऱ्याभोवतालची जमीन माळरानाची व शेती करण्यायोग्य नसल्याने याद्वारे भिजणारे क्षेत्र ००.० हेक्टर आहे.[७]

### १७) शेतीविषयक अवजारे व साधनसामुग्री यांची माहिती :

माळशिरस तालुक्याचा मुख्य व्यवसाय शेती असून ८० टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या शेती व्यवसायावर आधारीत आहे. शेतकरी प्रकारची आधुनिक अवजारे शेतीत वापरतात. माळशिरस तालुक्यातील एकूण ट्रॅक्टर संख्या १५५६ असून बैलगाडी संख्या ३,६१७, पॉवर ट्रीलर संख्या २४७ इतकी आहे. पॉवर स्पेअर संख्या ४३७ इतकी असून शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या लाकडी नांगरांची संख्या १,१६७ इतकी आहे. लोखंडी नांगरांची संख्या ३४१ तर मळणी यंत्रांची संख्या ६५० इतकी आहे. शेतीला पाणी

पुरवठयासाठी ऑईल इंजीनची संख्या ३६० इतकी असून विद्युत पंपाची संख्या ६,५६६ इतकी आहे. तर कृषी अवजारांची विक्री करणाऱ्या केंद्रांची संख्या १६ इतकी असून खते विक्री केंद्रे ९८, कृषी चिकित्सालये ११ आहेत. कृषी उत्पन्न बाजार समिती व दुय्यम समित्यांची संख्या ३ इतकी आहे. कृषी माल प्रक्रीया केंद्रांची संख्या १ असून शेतमाल साठविण्यासाठी शीतगृहांची संख्या २, तालुका बीजगुणन केंद्र इतकी आहे.[८]

**१८) वाहतूक व दळणवळण :**

कोणत्याही प्रदेशाचा आर्थिक विकास घडवून आणायला त्याप्रदेशातील नैसर्गिक साधनसंपत्तीच्या उपलब्धतेबरोबरच वाहतूक दळणवळणाच्या सोयी उपयुक्त ठरतात. माळशिरस तालुक्यात रस्ते, लोहमार्ग, जलमार्ग व हवाईमार्ग यापैकी केवळ रस्तेमार्गच उपलब्ध आहेत. तालुक्यातून एकही राष्ट्रीय महामार्ग गेला नाही. प्रमुख राज्य महामार्गाची तालुक्यातील लांबी १७८ कि. मी. आहे तर प्रमुख जिल्हा मार्गाची एकूण लांबी २६० कि. मी. इतकी आहे. इतर जिल्हा मार्गाची एकूण लांबी २२० कि. मी. असून गाव रस्त्यांची लांबी ही १४० कि. मी. आहे.[९]

**१९) पशूधन :**

माळशिरस तालुका हा पशुधनाबाबतीत सोलापूर जिल्ह्यात अग्रेसर आहे. माळशिरस तालुक्यातील पशुधनाची माहिती पुढील तक्त्यावरुन कळते.

**तक्ता क्र. १**[१०]

| **अ.नं.** | **पशुधन** | **संख्या** |
|---|---|---|
| १. | विदेशी गाय | ३२,३०३ |
| २. | विदेशी संकरित वासरे | ५९,५५८ |
| ३. | देशी बैल | १४,०३८ |
| ४. | देशी वासरे | २०,३८४ |

| | | |
|---|---|---|
| ५. | देशी गाई | ३,४४२ |
| ६. | एकूण देशी गाई व बैल | ३७,८६४ |
| ७. | म्हशी | २७,९२४ |
| ८. | रेडे | १,४४१ |
| ९. | मेंढया | ७५,५१७ |
| १०. | बकऱ्या | १,२४,६७८ |
| ११. | घोडे व शिंगरे | ७४५ |
| १२. | कुक्कुट पक्षी | ४,१५,६४२ |
| १३. | इतर पशुधन | २९,८४८ |

मागील तक्ता क्र. १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे माळशिरस तालुक्यातील दुग्ध व्यवसायाचा अत्यंत मोठया प्रमाणात विकास झाला आहे. विदेशी संकरीत दुभत्या गाईंची संख्या ३२,३०३ असून वासरांची संख्या ५९,५५८

इतकी आहे. माळशिरस तालुक्यात बैलांची एकूण संख्या १४,०३८ इतकी असून त्यांचा शेतीच्या विविध कामांसाठी वापरण्यात येणाऱ्या श्रमशक्ती अत्यंत महत्त्वपूर्ण वाटा आहे. देशी गाई व वासरांची संख्या मिळून २०,३८४ इतकी आहे.

म्हशींची एकूण संख्या २७,९२४ इतकी असून रेडयांची संख्या

१,४४१ इतकी आहे. तालुक्याच्या दक्षिण डोंगराळ भागामध्ये मेंढीपालन व्यवसाय विशेष विकसित झाल्याचा दिसून येतो. सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक मेंढया माळशिरस तालुक्यात असून त्यांची संख्या ७५,५१७ तर बकऱ्यांची संख्या १,५४,६७८ एवढी आहे. घोडे व शिंगरांची संख्या ७४५ इतकी असून इतर पशुधन २९,८४८ इतके आहे. माळशिरस तालुक्यात १९९४ पूर्वी सहकारी व खाजगी कुक्कुट पालन व्यवसाय अत्यंत मोठया प्रमाणात विकसित झाला होता. परंतु १९९४ मध्ये आलेल्या गंबोरा रोगाने कुक्कूटपालन व्यवसायाच्या विकासाला खिळ बसली. सध्या तालुक्यात केवळ ४,१५,६४२ एवढेच

कुक्कूटपक्षी उपलब्ध आहेत. पशुवैद्यकिय संस्थांची संख्या पाहता, तालुक्यातील पशुवैद्यकिय चिकित्सालये १ असून राज्य तथा स्थानिक स्तरावरील पशुवैद्यकिय दवाखाने ११ इतके आहेत. तर पशुवद्यकिय प्रथोमोपचार केंद्रांची संख्या १५ इतकी आहे.

**२०) माळशिरस तालुक्याची प्रशासकिय माहिती :**

माळशिरस तालका हा सोलापूर जिल्ह्यात असून तो पुणे महसूल विभागाअंतर्गत येतो. माळशिरस तालुक्यात एकूण १०८ ग्रामपंचायती आहेत. पिलीव, माळशिरस, नातेपूते, वेळापूर, अकलूज, सदाशिवनगर, दहिगाव, महाळूंग अशा आठ मंडलांतर्गत ५९ तलाठी सज्जे असून महसूली गावाची एकूण संख्या ११७ इतकी आहे.

**२१) माळशिरस तालुक्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

माळशिरस तालुक्याला अत्यंत संपन्न व समृध्द असा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. तालुक्यातील वेळापूर हे तेराव्या शतकात अत्यंत भरभराटीला आलेले गाव असून ते राजा रामचंद्रदेवराय यादव यांच्या देवगिरी राज्यात दक्षिण सीमेवरील गाव होते.[११] या ठिकाणी अत्यंत प्राचीन व सुंदर मंदिरे आहेत. अकलूज येथे शिवपूर्वकालीन भुईकोट किल्ला असून पिलीवचे जहागीरदार हे अक्कलकोटचे भोसले घराण्याचे मांडलिक होते. तालुक्याच्या दक्षिण सीमेवरील कारखेल हे गाव छत्रपती शिवाजी महाराजांच्या फौजेतील वीर संताजी घोरपडे यांच्या मृत्यूने पावन झाले आहे. तसेच संत ज्ञानेश्वर महाराजांच्या आळंदी ते पंढरपूर जाणारी पालखी व श्री. संत तुकाराम महाराज यांचीही पालखी माळशिरस तालुक्यातून जाते. तालुक्याच्या पश्चिम सीमेवरील दहिगाव हे जैनांचे पवित्र क्षेत्र म्हणून ओळखले जाते.[१२] माळशिरस शहराच्या पूर्वेकडील सीमेवर माळशिरस अकलूज रस्त्यालगत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पत्नी (सईबाई) चे थोरले बंधू बजाजी निंबाळकर यांचे पुत्र महादजी शिंदे व पत्नी सखूबाई (छत्रपती शिवाजी महाराजांच्या कन्या) यांची समाधी अत्यंत दुर्लक्षित स्थितीत आहे. संत तुकाराम महाराजांचे किर्तन सुरू असताना कललेल्या मारुतीचे मंदिर देखील माळशिरस शहरात आहे. माळशिरस तालुक्यात पर्यटन व तीर्थक्षेत्राची संख्या बारा इतकी आहे.

**संदर्भ सूची :**


(१) महाराष्ट्र राज्य गॅझेटीयर, सोलापूर जिल्हा गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, १९७७. ३६८पृ.

(२) तहसिलदार कार्यालय माळशिरा तालुका येथील संगणकीय नकाशावर आधारीत.

(३) उपमहानिर्देशक हवामानशास्त्र मुंबई. २००५

(४) उपमहानिर्देशक हवामानशास्त्र मुंबई. २००५

(५) पंचायत समिती कार्यालय, माळशिरस यांचेकडील कृषी अधिकारी मासिक सभा फाईल २००२-०३ दि. २७/०२/२००२

६) प्रपत्र क्र. १ तालुका घोषवारा दिर्घकालीन यथार्थदर्शी प्रारुप आराखडा तयार करण्याकरीता गावनिहाय गोळा करावयाची विकासात्मक आकडेवारी. दि. ०१/०४/२०००

७) प्रपत्र क्र. १ तालुका घोषवारा दिर्घकालीन यथार्थदर्शी प्रारुप आराखडा तयार करण्याकरीता गावनिहाय गोळा करावयाची विकासात्मक आकडेवारी. दि. ०१/०४/२०००

८) प्रपत्र क्र. १ तालुका घोषवारा दिर्घकालीन यथार्थदर्शी प्रारुप आराखडा तयार करण्याकरीता गावनिहाय गोळा करावयाची विकासात्मक आकडेवारी. दि. ०१/०४/२०००

९) सार्वजनिक बांधकाम कार्यालय अकलूज यांचेकडील कार्यालयीन माहिती.

१०) पशुगणना २००३ व जिल्हा सामाजिकी व आर्थिक समालोचन सोलापूर जिल्हा, २००६-०७ अहवाल तक्ता क्र.६.१४, ६.१४ पान नं. ६१ ते ६९

११) इतिहासाचार्य, वि.का. राजवाडे, संशोधन मंडळाचे, “त्रैमासिक :- संशोधक” मार्च, १९९८ वर्ष ६६वे संपादक, प्रा. डॉ. प्र.न. देशपांडे वेळापूरातील शिलालेख, ले.श्री. भागवत सावळाराम बावळे, पृ.३९

१२) श्री महावीर स्वामी दिगंबर जैन अतिशय क्षेत्र, दहिगाव ले. श्री. १००८ महावीर स्वामी दिगंबर जैन पृ.२

## प्रकरण . २ रे :

## सहकार चळवळींचा इतिहास :

### १. प्रास्ताविक :

सहकाराचे तत्व मानवी समाजाइतके पुरातन आहे. सहकार ही संकल्पना मानवी जीवनामध्ये अतिशय महत्त्वपूर्ण आहे. मानवी जीवन विकास हा सहकारी प्रवृत्तीमधून झाला आहे. मानवातील ती एक सहजप्रवृत्ती आहे. मानवी जीवनाच्या इतिहासावरती प्रकाश टाकला तर आपणास असे दिसून येते की, मानवी जीवन हे सहकारातून उत्क्रांत झाले आहे. मानवी जीवनात स्पर्धेपेक्षा सहकारी वृत्ती ही नैसर्गिक असून दुर्बलांच्या प्रगतीचा तो एक मार्ग आहे.[१] प्राचीन काळातील अनेक जमाती आणि शिकारी टोळया यांच्याकडे पाहिले तर सहकारी तत्व मानवी जीवनामध्ये बरेच रुळले होते असे आढळून येईल. सामुहिक गरजेतून निर्माण झालेला सहकार हा प्राचीन सद्‌गुणांचा अविष्कार आहे.

१७ व्या शतकात जाणीवपुर्वक आर्थिक उपक्रमांची सुरूवात करण्याचा प्रयत्न प्रथम झाला. पी. सी. प्लॉक नाये, या इंग्लंडमध्ये वास्तव्य करून असलेल्या डच माणसाने इ.स. १६५६ साली एक पुस्तिका लिहून त्यामध्ये शेतकरी आणि कारागीर यांचा उद्योगधंदा चालविणेसाठी संघ स्थापण्याची कल्पना मांडली.[२] औद्योगिक क्रांतीनंतर सहकार या संकल्पनेकडे व्यापक दृष्टीकोनातून पाहिले जाऊ लागले. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीमुळे समाजात भांडवलदार व मजूर असे वर्ग निर्माण झाले मात्र या दोन गटाचे हितसंबंध नेहमी परस्परविरोधी राहिले, भांडवलदारांच्या हातात आर्थिक नाडया आल्याने त्यांनी कामगारांची शारीरिक व आर्थिक पिळवणूक सुरू केली. दुसऱ्या बाजूला मजूर वर्ग मात्र आर्थिकदृष्टया हेळसांड, विषमता, दारिद्रय, निकृष्ट राहणीमान , कामाची असुरक्षितता या खाईत लोटला

गेला होता. या वर्गात असमाधान आणि असंतुष्टतेचे वातावरण होते. त्यामुळे या दोन घटकांमधील वर्गकलहाला सुरूवात झाली. थोडक्यात भांडवलशाही समाजरचनेला विटल्यामुळे तिला पर्याय म्हणून अनेक वाद निर्माण झाले त्यामध्ये सहकार वाद हा महत्त्वाचा वाद आहे.

**२. : सहकार म्हणजे काय? :**

'सहकार' (Co-Operation) हा लॅटीन भाषेतील Co-Operari या शब्दापासून निर्माण झालेला आहे. या लॅटीन शब्दाचा
सामान्या अर्थ 'एकत्र काम करणे' असा आहे.[३] सहकार या संकल्पनेचा शब्दशः अर्थ परस्पर सहाय्य करणे, एकमेकास मदत करणे किंवा सर्वाच्या हितासाठी काम करणे असा आहे.[३] तर समाजसुधारकांच्या दृष्टीने सहकार हे समाजपरीवर्तनाचे साधन होय. साम्यावाद्यांच्या मते, सहकार हे समाजवाद प्रस्थापित करण्याचे साधन होय. धर्मवेत्त्यांच्या दृष्टीने, सहकार हा आर्थिक व्यवहाराचा व सामाजिक प्रगतीचा कणा आहे. अशाप्रकारे सहकाराच्या व्याख्येबाबत एकमत आढळत नाही. तरीही सहकार म्हणजे काय? हे समजण्यासाठी त्याचा अभ्यास करणे, आवश्यक ठरते.

**प्रा. पॉल लेंबर्ट :**

"स्वतःच्या उपयोगासाठी व्यक्तिसमुहाने स्थापन केलेली आणि दिग्दर्शित केलेली, लोकशाही नियमानुसार चालविलेली आणि सभासदाच्या व एकूण समाजाच्या सेवेसाठी स्थापन झालेली व्यवहारा संस्था म्हणजे, सहकार संस्था होय."[४]

**एच. कलव्हर्ट :**

"मानवी भुमिकेतून व्यक्तींनी स्वेच्छेने एकत्र येऊन आपल्या आर्थिक हितसंबंधांच्या उन्नतीसाठी समानतेच्या तत्त्वावर स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकार होय."[५]

**प्रा. सी. आर. पे :**

"समाजातील दुर्बल घटकांनी निःस्वार्थी भूमिकेतून चालविलेली आणि सभासदांनी केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात त्यांना नफ्यात वाटा देणारी व एकत्र व्यवहार करण्यासाठी स्थापन झालेली संघटना म्हणजे सहकारी संस्था होय."[६]

**पी. एच. कॅलसमन :**

"सामाजिक आशय असलेली अर्थपध्दत म्हणजे सहकार होय."[७]

**व्ही. एल. मेहता :**

"समान आर्थिक उद्दीष्टे साध्य करण्यासाठी समान गरजा असणाऱ्या व्यक्तिंनी ऐच्छिकरित्या स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकार होय."[८]

**सर होरेस प्लेकेट :**

"व्यक्तिंच्या संघटनेतूनच परिणामकारक ठरणारे स्वावलंबन म्हणजे सहकारी चळवळ होय. सहकाराची उत्तम शेती उत्तम व्यवसाय व उत्तम राहणीमान ही तीन उद्दीष्टये आहेत."[९]

## वसंतदादा पाटील :

दुर्लक्षित घटकांना आणि कमकुवत वर्गाना शक्ती देणारे सहकार हे एक प्रभावी माध्यम आहे.[१०] १९१२ च्या भारतीय सहकारी कायद्याप्रमाणे सहकारी तत्त्वानुसार आपल्या सभासदांचे आर्थिक हितसंवर्धन करणारी संस्था म्हणजे सहकारी संस्था होय.[११]

**३. : सहकाराची तत्वे :**

सहकारी संस्थेचे संघटन, तिचे व्यवहार, तिचे व्यवस्थापन, प्रशासन, सभासदाचे हक्क आणि कर्तव्ये, संस्था चालकाची कर्तव्ये, संस्थेचे अंतर्गत स्वरुप, हिशेबाच्या पध्दती इत्यादीबाबत जे नियम केलेले असतात त्या नियमांच्या संचास सहकाराची तत्वे म्हणतात. एम. जॉर्ज. डेव्हीस यांच्या मते, संघटनेचे अस्तित्त्व व

कार्यपध्दती ठरविणाऱ्या नियमांचा संच म्हणजे सहकाराची तत्वे होय. जॉर्ज डेव्हिडोव्हिका यांच्या मते संघटनेचे जीवन आणि कार्यपध्दत ठरविण्याच्या नियमांचा संच म्हणजे सहकारी तत्त्वे होय.

● **सहकारी तत्वाचा विकास :**

रॉबर्ट ओवेन हा आधुनिक सहकारी चळवळीचा जनक मानला जातो. त्याने 'न्यु लॅनार्क' गिरणीत कामगारांची स्थिती सुधारण्यासाठी सहकार पध्दतीचा अवलंब केला जगमधील सहकारी चळवळीचा प्रारंभ हा इंग्लंडमधील रॉश्डेल या गावातून झालेला आहे. रॉश्डेलच्या २८ कामगारांनी एकत्रित येऊन २१ डिसेंबर १८४४ मध्ये इक्विटेबल पायोनियरस को-ऑपरेटीव्ह सोसायटीची स्थापना केली. त्यांनी स्वीकारलेली मुलतत्त्वे कित्येक वर्ष अनेक देशातल्या सहकारी चळवळीला मार्गदर्शक ठरली.[१२]

रॉश्डेल  सहकारी पध्दतीची तत्त्वे जगभर सहकारी तत्त्वे म्हणून ओळखली जातात. कारण त्यांनी सहकारी तत्त्वे स्वष्ट, काटेकोर व सोप्या भाषेत मांडली आहेत. या तत्त्वात फारसा बदल न करता विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या सहकारी संस्थांना ती लागू करता येतात. म्हणून रॉश्डेल तत्त्वांना जागतिक मान्यता प्राप्त करून प्राप्त झाली. व ती संपुर्ण जगभर पसरली. एकंदरीत सहकारी तत्त्वे म्हणजे रॉश्डेल तत्त्वे असे समिकरण तयार झाले आहे. परंतु १९३७ मध्ये सादर केलेल्या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या अहवालावरून रॉश्डेल यांनी सहकारी तत्त्वाची दोन विभागात विभागणी केली.

अ) आवश्यक तत्त्वे :

ब) कमी महत्त्वाची व सामान्य तत्त्वे :

१९३७ नंतर जागतिक परिस्थितीत फार मोठे बदल झाले. सन १९३९-४५ या कालावधीत दुसरे महायुध्द घडून आले. या महायुध्दाचा जगातील सहकारी चळवळींवर आणि इतर अनेक गोष्टींवर फार मोठे परिणाम झाले. अनेक राष्ट्रे स्वातंत्र्य झाली. (महायुध्दाचा जगातील) सामाजिक, राजकीय, आर्थिक  परिस्थिती बदलल्याने जगातील अनेक देशात योजनाबध्द विकासासाठी विविध योजनांचा अवलंब केला गेला. कल्याणकारी

राज्याची संकल्पना उद्यास आली. शासनाच्या जबाबदाऱ्या वाढल्या. या बदलत्या परिस्थितीत सहकारी तत्त्वांची पुर्नमांडणी करण्याची आवश्यकता भासू लागली.

१९६४ मध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने पुन्हा एक तज्ञ समिती नेमणूक केली. या तज्ञ समितीचे अध्यक्ष डॉ. डी. जी. कर्वे होते. या समितीत भांडवलवादी आणि सहकारवादी या विषयावरील तज्ञांचा समावेश होता. १९६६ मध्ये या समितीने शिफारस केलेली सहकाराची तत्त्वे पुढीलप्रमाणे,

**३.१ : ऐच्छिक व खुले सभासदत्त्व :**

सहकारी संस्थेचे प्रमुख तत्त्व म्हणून या तत्त्वाचा उल्लेख केला जातो. सहकारी सेस्थेचे सभासदत्त्व कोणत्याही व्यक्तीला या तत्त्वानुसार लगेच प्राप्त होते. या सभासदाची जात, धर्म, वंश, लिंग, वर्ण, त्यांची आर्थिक स्थिती, राजकीय मते, सामाजिक प्रतिष्ठा यासारख्या कोणत्याच बाबी आड येत नाहीत. तसेच कोणतीही सभासद व्यक्ती सहकारी संस्थेतील आपल्या सभासदत्त्वाचा त्याग कधीही करू शकते. अशी सहकारी संस्थांच्या नियमात तरतूद हवी. थोडक्यात सभासदाला संस्थेचे सभासदत्त्व स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे स्वांतंत्र्य असावे. कोणतीही सहकारी संस्था स्थापन करीत असताना त्या संस्थेतील व्यक्ती स्वतःच्या इच्छेने एकत्रित आलेल्या असतात. सहकारी संस्थेमध्ये सक्तीने सभासद करून घेऊ नये. तसे केल्यास सहकारी संस्थेचा उद्देश सफल होणार नाही. ऐच्छिक व खुल्या सभासदत्त्वाचे महत्त्व सांगताना बॉनरेन असे म्हणतात की, या तत्त्वाशिवाय सहकारी संस्था आपले, सहकाराचे वैशिष्टये गमावतील त्यांचे नफा मिळविण्याच्या संस्थेत रुपांतर होईल.

मुक्त सभासदत्त्व याचा अर्थ नवे सभासद होताना कोणतीही बंधने नसणे असा नव्हे तर नव्या सभासदामुळे जर सहकारी संस्थेतील इतर सभासदांच्या सामुहिक हिताला बाधा निर्माण होत असेल तर अशा व्यक्तीस सभासदत्त्व नाकरणे गैर ठरणार नाही. तसेच ज्या व्यक्ती सहकारी संस्थेच्या ध्येय धोरणाशी सहमत नसतात किंवा व्यवसायाशी स्वर्धात्मक व्यवसाय करतात त्यांना सभासदत्त्व मुक्तपणे दिले जाऊ नये. थोडक्यात जे सभासद

सहकारी संस्थेस हानी पोहोचवतात, त्यांचे सभासदत्त्व रद्द करावे किंवा अशा व्यक्तींना सभासदत्त्व देऊ नये.

### ३.२ : लोकशाही कारभार व नियंत्रण :

लोकशाहीची जी वैशिष्टे आहेत ती व्यैशिष्टये सहकारी संस्थांच्या कारभारात व नियंत्रणात दिसून यावीत कारण सहकारी संस्था ही अनेक व्यक्तींचे संघटन असलेली संस्था आहे. लोकशाहीत निवडणूकीत प्रत्येक व्यक्तीला एकच मत असते. दरडोई एक मत या तत्त्वाप्रमाणे, मताचा अधिकार प्राप्त होतो. लोकशाहीत अंतिम अधिकार लोकांच्याकडे असतात. यासारख्या लोकशाहीतत्त्वाचा अवलंब सहकारी संस्थेने आपल्या कारभारात करावा अशी अपेक्षा आहे.[१३]

सहकारी संस्थेत सुध्दा खऱ्या अर्थाने लोकशाही राबविली जाते. ज्या देशात लोकशाही पध्दतीने राज्यकारभार चालतो. त्या देशातील लोक राज्यकारभार चालविण्यासाठी आपले प्रतिनिधी निवडून देतात. तशाच लोकशाही तत्त्वाप्रमाणे सहकारी संस्थेचा कारभार चालविण्याकरीता सर्व सभासद आपले काही प्रतिनिधी सहकारी संस्थेचे संचालक म्हणून निवडून देतात. सहकारी संस्थेतील कोणतीही सभासद व्यक्ती संचालक पदाच्या स्थानाकरीता निवडणूकीला उभी राहू शकते. त्याचप्रमाणे संस्थेच्या प्रत्येक सभासदाला एकच मत देण्याचा अधिकार असतो. या दृष्टीने सहकारी संस्थेत विविध सभासदाचे भांडवल कमी - अधिक प्रमाणात असते. मात्र प्रत्येक सभासदाला फक्त एकच मत देण्याचा अधिकार असतो. त्याने जास्त भांडवल पुरविले त्याला जास्त मते हे तत्त्व सहकारी संस्थांना लागू पडत नाही. सहकारी संस्थेत सभासदाची जात, वर्ण, लिंग, धर्म, सामाजिक, राजकिय, आर्थिक दर्जा विचारत घेतला जात नाही. एकंदरीत सर्व सभासदाच्या अधिकाराच्या दृष्टीने समता प्राप्त होते.

### ३.३ : भांडवलावर मर्यादित व्याज :

आपल्या देशात सहकारी संस्था भांडवलावर जो लाभांश जाहीर करतात त्यालाच सहकारी क्षेत्रात भांडवलावरील व्याज म्हणून ओळखतात. सभासदांनी सहकारी संस्थेत

गुंतवलेल्या भांडवलावर मर्यादित दराने व्याज द्यावे. रॉश्डेलच्या प्रवर्तकांनी असे मत मांडले होते की, सहकारी संस्थेत गुंतविलेल्या भांडवलावरील व्याज ठेऊ नये. प्रत्यक्षात बिनव्याजी भांडवल गोळा करणे, सहकारी संस्थांना अशक्य आहे. ही बाब लक्षात घेऊन भांडवलावर मर्यादित व्याज देण्यास प्रारंभ झाला.

**३.४ : व्यवहाराच्या प्रमाणात नफ्याची वाटणी :**

सहाकरी संस्थांनी प्रामुख्याने आपल्या सभासदांशी व्यवहार करावेत अशी अपेक्षा असते. त्यामुळे संस्थेला मोठया प्रमाणात नफा मिळविण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. आपल्या ग्राहकांना व सभासदांना किमान किंमतीत वस्तू पुरविल्या जातात. असे असूनसुध्दा संस्थेला या व्यवहारात नफा मिळतो. मात्र सहकारी संस्थांनी याला नफा न म्हणता वाढावा म्हणावा.

**३.५ : सहकारी शिक्षण :**

कोणतीही संस्था यशस्वी होण्यासाठी शिक्षणाची नितांत आवश्यकता असते. त्याप्रमाणेच सहकारी चळवळ प्रभावी होण्यासाठी सभासदांना सहकारी कार्यकर्त्यांना सहकारी संस्थेतील नोकरवर्गाला, अधिकारवर्गाला आणि सर्वसामान्य जनतेला सहकारी शिक्षणाची व इतर सामान्य शिक्षणाची नितांत गरज असते. सहकारी प्रशिक्षण असेल तरच सहकारी संस्थांचा कारभार यशस्वीपणे चालू शकतो.

**३.६ : सहकारांतर्गत सहकार :**

सहकारांतर्गत सहकार तत्त्वाप्रमाणे सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांनी सभासदांच्या हितरक्षणासाठी आपल्या व्यवहारात परस्परांशी शक्य तितके सहकार्य करावे. सहकारांतर्गत सहकार हा स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील केला जावा अशी अपेक्षा या तत्त्वाद्वारे केली आहे. वेगवेगळया सहकारी संस्थांमध्ये अशा प्रकारचे सहकार्य निर्माण झाले तरच आधुनिक प्रचंड उद्योगधंद्यासमोर सहकारी संस्थांचा निभाव लागू शकतो. म्हणून हे तत्त्व नैतिक तत्त्व नसून विकासाचे तत्त्व आहे. त्यामुळे सर्वच सहकारी संस्थांचा विकास होण्यास मदत होईल.[१४]

## ३.७. सहकाराची इतर तत्त्वे :

### ३.७.१ : स्वावलंबनाद्वारे परस्परांना मदत :

सहकारी चळवळीचे एक महत्त्वाचे तत्त्व म्हणून स्वावलंबनाद्वारे परस्परांना मदत करणे हे आहे. प्रा. डी. जी. कर्वे यांच्या मताप्रमाणे 'स्वावलंबन आणि परस्परांना सहाय्य' हे सहकाराचे सार अगर गाभा किंवा पाया आहे. त्याशिवाय निर्भेळ सहकार अस्तित्वात येणे अशक्य असते. सहकारी संस्थेतील प्रत्येक व्यक्ती व्यक्तीगतपणे आपल्या परिस्थितीत बदल घडवून आणण्यात असमर्थ ठरते. म्हणूनच सहकारी संस्थेतील सर्व व्यक्ती एकत्रित प्रयत्न करून आपले व त्याचप्रमाणे इतरांचे हित साधण्याचा प्रयत्न करतात. म्हणजेच परस्परांना सहाय्य करणे, हा सहकारी संस्थेतील सर्व सभासदातील संबंधाचा गाभा ठरतो. या संबंधातून "एकाकरीत सर्व व सर्वाकरीता एक" हे सहकाराचे मूळ तत्त्व अस्तित्वात येते. परस्पर साहाय्यातून सहकारी संस्था स्वावलंबी बनू शकते.

### ३.७.२ : रोख व्यवहाराचे तत्त्व :

या तत्त्वाचा पुरस्कार प्रामुख्याने ग्राहक सहकारी संस्था करतात. रॉश्डेल या जगातील पहिल्या ग्राहक सहकारी संस्थेने आपल्या नियमात हे तत्त्व नमूद करून ठेवले होते. रोखीच्या व्यवहारामुळे संस्थेचा अनेक बाबतीत फायदा होतो. उदाः संस्थेचे भांडवल अडकून पडत नाही. थकबाकी बुडण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही इ. मात्र रोख व्यवहाराचे तत्त्व कितीही चांगले असले तरी, त्यामुळे संस्थेची विक्री मोठया प्रमाणावर होत नाही. १९६६ च्या तज्ञ समितीने रोख व्यवहाराचे तत्त्व महत्त्वाचे मानले नाही. परंतु सहकारी संस्थांनी परिस्थितीप्रमाणे या तत्त्वाचा स्विकार करावयास हरकत नाही असे म्हटले आहे.

### ३.७.३ : सामाजिक मालकीचे तत्त्व :

सहकारी संस्था सभासदाच्या मालकीची असते. परंतु सभासदांचा संस्थेवर असणारा मालकी हक्क सांगता येत नाही. मात्र एकत्रितपणे सर्व सभासद संस्थेच्या मालमत्तेवर हक्क सांगु शकतात.

**३.७.४: प्रसिध्दीचे तत्त्व :**

सहकारी संस्थेतील सर्व व्यवहारांना प्रसिध्दी द्यावी. याचा अर्थ असा की, सहकारी संस्थेतील व्यवहाराची माहिती सर्व सभासदांना पुरवावी. उदाः संस्थेची आर्थिक परिस्थिती, ध्येयधोरण याची निश्चित माहिती सभासदांना मिळण्यासाठी प्रसिध्दीचे तत्त्व महत्त्वाचे ठरते. या तत्त्वामुळे सभासद व इतर लोकांच्या मनात विश्वास निर्माण होतो.

**३.७.५: स्थानिक स्वायत्तेचे तत्त्व :**

स्थानिक स्वायत्तता पुरस्कार १९५८ च्या सहकारी स्वातंत्र्य समितीने केला आहे. सहकारी लोकांच्या जीवनाचा एक भाग आहेत. याची जाणीव करून देण्यासाठी त्या संस्थेचे नाव, व्यवस्थापन, व्यवहार केल्या जाणाऱ्या व्यक्ती हे सर्व स्थानिक असणे गरजेचे आहे. याच दृष्टीकोनातून या तत्त्वाचा स्विकार करण्यात आला. [१५]

सहकाराच्या वरील रॉश्डेल तत्त्वाप्रमाणे, काही देशातील सहकारी चळवळीने उत्तम कामगिरी केली, तर काही देशांच्या सहकारी चळवळीत राजकारणाचा अनिष्ठ प्रभाव, अकार्यक्षमतेत वाढ, भ्रष्टाचार सहकाराचा हस्तक्षेप इ. गोष्टींचा शिरकाव झाल्याने सहकारी चळवळींची प्रगती मंदावलेली आहे.  किंबहूना अशा देशातील सहकारी चळवळींवरील सभासदांचा, जनतेचा पर्यायाने समाजाचा विश्वास उडून चालला यातून बाहेर पडण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेचे तत्कालीन अध्यक्ष, लर्ग्स मार्कस यांनी प्रयत्न सुरू केले. त्याचवेळी २४ जुलै १९९१ पासून भारतात नव्या खुल्या आर्थिक धोरणाचा स्विकार करण्यात आला. खुल्या आर्थिक धोरणात सहकारी चळवळ टिकून राहण्यासाठी स्वीडनचे तज्ञ स्वेन ॲक बुक यांच्या नेतृत्वाखाली समिती नेमली १६ ते २३ सप्टेंबर १९९५ या कालावधीत इंग्लंडमधील मॅचेंस्टर येथे त्यांच्या शिफारशीवर परिषद आयोजित केली. त्यावर चर्चा झाली व सहकाराची सात तत्त्वे
पुर्ननिर्धारीत मुलत्त्वे म्हणून मान्य करण्यात आली. या तत्त्वांना सहाराची आधुनिक मॅचेस्टर तत्त्वे म्हणून ओळखली जाते.

४. : सप्टेंबर १९९५ मधील मॅन्चेस्टर कॉग्रेसने निश्चित केलेली आधुनिक सहकाराची पुर्ननिर्धारित मुलतत्त्वे :[१६]

१) स्वखुशीने खुले सभासदत्त्व.

२) सभासदांचे लोकशाही नियंत्रण.

३) सभासदाची आर्थिक भागीदारी.

४) स्वायत्तता आणि स्वातंत्र्य.

५) शिक्षण, प्रशिक्षण आणि माहिती प्रसारण.

६) सहकारी संस्थामधील परस्पर सहकार.

७) समाजाशी नाते.

**५. : जागतिक सहकारी चळवळ :**

खऱ्या अर्थाने सहकार वादाची सुरूवात इ.स.१८४४ साली रॉबर्ट ओवेन या परोपकारी सद्‌गृहस्थाने केली. म्हणून रॉबर्ट ओवेन हा सहकारी चळवळीचा जनक मानला जातो. सहकार हा शब्दप्रयोग ओवेनने सर्वप्रथम उच्चारला. जीवनकलहाच्या अनुभवातून निर्माण झालेली तत्त्वे, चिंतन, विचार यांना एकत्र आणून नफापिपासू बाजारपेठेतल्या प्रवृत्तीपासून संरक्षण देण्याच्या दृष्टीने इंग्लंडमधील रॉश्डेल खेडयातील टोंडसेन गल्लीतील २८ विणकारांनी जीवनावश्यक वस्तू किंमतीला उपलब्ध व्हाव्यात म्हणून इ.स. २१ डिसेंबर १८४४ मध्ये “इक्किटेबल पायोनिअर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी” ची स्थापना केली. [१७] या संस्थेमुळे जगातील आधुनिक सहकार चळवळीची मुहर्तमेढ रोवली गेली. ब्रिटीश साम्राज्यवादाचे जगावर जे अनेक चांगले परिणाम झाले. त्यापैकी सहकार चळवळीचा विकास हा एक मानावा लागेल. इक्विटेबल पायोनिअर्स को -ऑपरेटीव्ह सोसायटी या संस्थेने स्वीकालेली मुलतत्त्वे कित्येक वर्षे अनेक देशातल्या सहकारी चळवळीला मार्गदर्शक ठरलेली आहेत. खुले सभासदत्त्व, एकाला एकच मत, भांडवलदारावर ठराविक व्याज, व्यवहारातून शिल्लक राहिलेले उत्पन्न त्यांच्या खेरेदीच्या प्रमाणात वाटून घ्यावयाचे अशी महत्त्वाची आदर्श मुलतत्त्वे या संस्थेने निर्माण केली.

**६. : भारतातील सहकार चळवळ:**भारत हा शेतीप्रधान देश आहे. या कृषीप्रधान देशात सहकारी चळवळीची सुरूवात शेतकऱ्यांच्या शेतीविषयक गरजेतून झाली. भारतात

प्राचीन काळापासून एकत्र कुटूंब पध्दती व स्वयंपूर्ण ग्रामराज्ये होती. पण जिला सहकारी म्हणतात ती, १९०४ ला लॉर्ड कर्झन याने सहकार कायदा मंजूर करून संस्थानी व खालसा मुलखात लागू केला. ब्रिटीश राजवटीमुळे समाजजीवनात जो फरक झाला व जी उलथापालथ झाली. ती निस्तरण्यासाठी ही चळवळ परकीय सत्ताधाऱ्यांनी सुरू केली. व वाढविली. ब्रिटीशांच्या हाती सत्ता आल्यानंतर पहिला धक्का बसला तो भारतातील उद्योगधंद्यांना, भारतातील छोटे उद्योगधंदे इंग्लंडच्या गिरणीतील स्वस्त मालापुढे व राजाश्रयाविना धुळीला मिळाले. तसेच दुष्काळ, शिक्षणाचा अभाव, दैववाद व परंपरागत शेती कसण्याची पध्दती यामुळे परिस्थिती अधिकच चिघळली. व शेतकरी कर्जाच्या विळख्यात अधिकच अडकला. भारतातील सहकारी चळवळीचा प्रारंभ येथील ग्रामीण जनतेच्या दारिद्रयातून व पिळवणूकीतून झाल्याचे दिसून येते. भारतामध्ये सहकारी संस्थांची स्थापना होण्यापूर्वीच इ.स.१९८२ साली न्या.

महादेव गोविंद रानडे व सर विल्यम वेडरबर्न यांनी पुरंदर तालुक्यामधील शेतकऱ्यांना कर्ज देण्याच्या इ.स.१८८४ च्या कायद्याला संमती दिली व तगाई देण्याची व्यवस्था केली.[१८] सावकारांच्या विळख्यातून बाहेर येण्यासाठी व आर्थिक मुक्तता मिळविण्यासाठी संघटित प्रयत्नांची आवश्यकता होती. सन १९०१ च्या फोमिन कमिशनने सहकारी पतपेढया भारतात सुरू करण्याची शिफारस केली. मद्रास सरकारने फ्रेडरक निकोलसन यांना ग्रामीण कर्ज निवारण करण्यासाठी काय उपाययोजना आखावी याचा अभ्यास करण्यासाठी युरोपात पाठविले व त्यांच्या अहवालावरच सहकारी पध्दतीचा या देशात पाया रोवला गेला. निकोलस यांनी आपल्या अहवालाचा शेवट "हिंदूस्थान रेफेसॉन आणा" या शब्दात केला. निकोलसन यांनी सहकारी तत्त्व पूर्ण शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी योग्य असल्याचे मत व्यक्त केले. श्री. निकोलसन यांच्या अहवालानंतर सहकारी संस्थांना कायदेशिरपणा आणण्यासाठी लॉर्ड कर्झन यांनी सर एडवर्ड लॉ यांची ग्रामीण पतपुरवठयाच्या समस्येचा अभ्यास करण्यासाठी सन १९०० मध्ये नियुक्ती केली. त्यांनी सहकारी पतपुरवठयाचा प्रश्न सोडविण्यासाठी सहकारी संस्था स्थापन करण्यास उत्तेजन

देण्याची तसेच सहकारी चळवळ दीर्घकाळ उपयोग करण्याची शिफारस केली. या सुचनेनुसार २५ मार्च १९०४ रोजी सहकारी पतपुरवठा संस्थाविषयक कायदा करण्यात आला.[१९] या सहकारी कायद्यानेच सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ भारतात रोवली.

**७. : सहकारविषयक कायदे :**

**७.१ : १९०४ चा सहकारी कायदा :**

२५ मार्च १९०४ साली भारतातील पहिला सहकारी पतसंस्थाचा कायदा पास झाला. व सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ भारतात रोवली गेली. सावकाराच्या कर्जातून शेतकऱ्यांची मुक्तता करावी. त्याला योग्य व्याजदराने उत्पादन करण्यासाठी कर्जपुरवठा करावा. तसेच स्वावलंबन काटकसर, बचत इत्यादी सवयी त्याला लावाव्या. अशी प्रमुख उद्दिष्टये हा कायदा करण्यामागे होती.

या कायद्याच्या प्रस्तावनेत असे म्हटले होते की, “शेतकरी, कारागीर आणि इतर गरीब व्यक्तींना बचत आत्मनिर्भरता व सहकार्याची भावना शिकवून दारिद्रयातून संपन्नतेकडे नेण्याचा प्रयत्न केला जाईल.”

**●१९०४ च्या कायद्याची ठळक वैशिष्टये :**

१) समान आर्थिक गरजा असणारे व एका ठिकाणी राहणारे किमान १० लोक एकत्र येऊन सहकारी संस्था स्थापन करू शकतात.

२) ग्रामीण आणि शहरी असे सहकारी संस्थेचे वर्गीकरण करण्यात आले.

३) फक्त प्राथमिक पतसंस्थांनाच मान्यता दिली गेली.

४) फक्त सदस्यांना कर्ज देण्याची मुभा देण्यात आली.

५) कोणत्याही सदस्याचे संस्थेतील भागभांडवल एक हजार रुपयांपेक्षा अधिक असू नये असा दंडक घालण्यात आला.

६) प्रत्येक सहकारी संस्थेची हिशेब तपासणी निबंधकाने विनाशुल्क करावी असे ठरविण्यात यावे.

७) आयकर, स्टॅम्प डयुटी, नोदणी शुल्क अशा करातून सहकारी संस्थांना सूट देण्यात यावी.

८) प्रत्येक प्रांतात एकेक सहकारी निबंधक नेमण्याची तरतूद करण्यात आली.

१९०४ च्या कायद्यातील त्रुटी :

१) पतसंस्थांशिवाय इतर संस्थांना मान्यता नव्हती.

२) फक्त प्राथमिक स्तरावर संस्था स्थापन करण्याची अनुमती होती. त्यांच्या संघसंस्था स्थापन करण्याविषयी तरतूद नव्हती.

३) ग्रामीण आणि शहरी असे संस्थांचे वर्गीकरण करून ग्रामीण संस्थांना कमी लेखण्यात आले.

१९०४ च्या कायद्याचे मूल्यपान :

१९०४ च्या कायद्याचे महत्त्व यासाठी होते की, या कायद्याने भारतात सहकारी आंदोलनाची सुरूवात केली. हिशेब तपासणी शुल्क, नोंदणी फी व इतर करातून सूट त्याप्रमाणे इतरही काही सवलती सहकारी संस्थांना देऊन सहकारी पतसंस्थांच्या वाढीला या कायद्याने बराच हातभार लावला.[२०]

**७.२ : १९१२ चा सहकारी सोसायट्यांचा कायदा:**

१९०४ च्या कायद्यातील ग्रामीण सोसायटया व शहरी सोसायटया हा कृत्रिम भेद दूर करण्यासाठी गरज होती. त्यासाठी या कायद्यातून पतपुरवठा सोसायटयांचा हा शब्द काढून टाकला. या कायद्यात सहकारी संस्थांच्या व्यवस्थापनाचे दृष्टीने आवश्यक असलेल्या सर्वच तरतूदी होत्या. सोसायटीची नोंदणी उपविधीची व उपविधीच्या दुरूस्तीची नोंदणी, सभासद करवून घेणे त्यांचे अधिकार व जबाबदाऱ्या, वार्षिक व विशेष सभा, पंच कमिटीची निवड अधिकार व कार्ये इत्यादी बाबतचे नियम या कायद्यामध्ये होते. सोसायटयांच्या हिशोबाचे ऑडीट करण्याची तरतूद या कायद्यात होती. पतपेढयांबरोबर केद्रीय सोसायटया खरेदी विक्री संस्था स्थापन करण्याची तरतूद यात होती. राज्य सहकारी संघ, राज्य सहकारी बँक,

सेंट्रल बँक, सुपरवायझींग युनियन या संस्थांची नोंदणी १९१२ च्या कायद्याखाली झाली. हा कायदाही सर्वसामान्यांना समजेल, अशा भाषेतला आणि लवचिक होता. सुमारे ६७ कलमांचा हा कायदा म्हणूनच आदर्श कायदा मानला जातो. या कायद्यामुळे देशात सहकारी संस्था त्यांचे सभासद आणि त्यांचे खेळते भांडवल यात भरीव वाढ झाली.[२१]

### ७.३ : मॅक्लेगन समिती :

याच वेळी १९१४ मध्ये ब्रिटीश शासनाने सहकारी चळवळीने मुल्यांकन करून तिच्या विकासाबाबत उपाय सुचविण्यासाठी १९१४ मध्ये सर एडवर्ड मॅक्लेगन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. य समितीने रिपोर्ट ऑफ को-ऑपरेशन इंडीया १९१५ या अहवालामध्ये अनेक महत्त्वाच्या शिफारशी केल्या.[२२] या समितीच्या शिफारशीच्या आधारावरच सहकारी चळवळ संबंधीचे शासकीय धोरण त्यानंतर ठरविण्यात आले. १९१९ नंतर सहकार खाते प्रांतिक सरकारांकडे सोपवून त्यांना आपल्या गरजेनुसार सहकारी कायदे करण्याचा अधिकार देण्यात आला. त्यानुसार मुंबई राज्याने स्वतःचा सहकारी कायदा १९२५ साली पास केला. त्यानंतर मद्रास, बिहार, बंगाल या प्रांतांनी तशा पध्दतीचे कायदे केले.

### ७.४ : मुंबई सहकारी संस्थांचा कायदा (१९२५)

या कायद्यानुसार सहकारी संस्थांचे पुर्वीचे केवळ सभासदांच्या जबाबदारीवर असलेले वर्गीकरण बदलून विभागणी झालेली होती. त्यावेळी प्रथमच सहकार हा विषय केंद्र सरकारकडून प्रांतिक सरकारकडे सुपूर्द करण्यात आला. यामुळे लोकप्रतिनिधींचा सहकारी चळवळींशी प्रत्यक्ष संबंध आला व तिच्यापासूनच्या अपेक्षा वाढल्या व लवकरच १९२५ मध्ये मुंबई प्रांतीक सहकारी कायदा अस्तित्वात आला हा भारतातील पहिलाच प्रांतिक कायदा होय. यानंतरच्या काळात सहकाराविषयी अनेक कायदे करण्यात आले.

१९५७ मध्ये केंद्र सरकारने के. टी. राज यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली व सहकाराविषयी काही आदर्श नियम तयार करण्यात आले. भारतातील सर्व राज्यांनी आपल्या राज्यातील सहकारी कायदा १९५७ च्या आदर्श कायद्यास धरुन करावा अशी अपेक्षा होती मात्र महाराष्ट्र राज्याने स्वातंत्र्य सहकारी कायदा करण्याकरता स्वातंत्र्य समिजी

श्री. जी. एम. लाड यांच्या अध्यक्षतेखाली तयार नेमण्यात आली. व १९६० साली महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० हा मंजूर करण्यात आला. हा कायदा करताना लाड समिती व राज समिती यांच्या शिफारशी विचारात घेतल्या आहेत.[२३]

एकंदरीत महाराष्ट्रातील सहकार चळवळ देशात अग्रेसर आहे. विविध आर्थिक क्षेत्रामध्ये सहकार चळवळीने यशस्वीपणे समाजाच्या आर्थिक विकासाचे कार्य केले. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांची वाटचाल हे सहकारी चळवळीचे अभिमानास्पद पर्व आहे. भारतात सहकारी क्षेत्रातील पहिला साखर कारखाना स्थापन करण्याचा मान महाराष्ट्राकडे जातो. हा कारखाना कै. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील यांनी स्थापन केला. तो प्रवरा सहकारी साखर कारखाना म्हणून ओळखला जातो.

महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळीची प्रगती त्यांच्या उद्देशानुसार सहकारी संस्थांचे वर्गीकरण केले. सहकारी संस्थातील वाद मिटविण्यासाठी लवादीची तरतुद कायद्यात करण्यात आली. एक सभासद एक मत या तत्त्वाचा कायद्यात समावेश करण्यात आला. सहकारी संस्थांच्या वसूलीस अग्रक्रम देण्यात आला. दोन किंवा अधिक सहकारी संस्थांच्या एकत्रिकरणाची तसेच आर्थिक नुकसान करणाऱ्याकडून भरपाई घेण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली.

**७.५ : १९२५ च्या कायद्यातील सुधारणा :**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मुंबई राज्याचे सहकार मंत्री या नात्याने वैकुंठभाई मेहता यांनी १९४८ साली मुंबई सहकारी कायदा १९२५ मध्ये महत्त्वपूर्ण अशा.

१) सहकारी संस्थांच्या नियंत्रणाची सुत्रे हळूहळू त्यांच्या फेडरेल संस्थाकडे जावीत म्हणून कायद्यात तरतूद करण्यात आली.

२) एका सोसायटीची दोन किंवा अधिक संस्थात विभागणी करण्याची परवानगी देण्यात आली.

३) सभासदांची संस्थेतील कमाल भाग भांडवल मर्यादा वाढविण्यात आली.

४) संस्थेच्या कर्ज फेडीला संरक्षण मिळेल कर्जदार सभासदाचे त्यांच्या स्थावर मालमत्तेवर बोजा चढवून देण्याची व तो मालकी हक्काच्या दस्तऐवजात नोंदविण्याची तरतूद करण्यात आली.

५) सहकारी खात्याने केलेल्या लेखापरीक्षण तपासणीमध्ये संस्थेच्या कामकाजात दोष आढळल्यास ते दुरूस्त करून घेण्याची तरतूद करण्यात आली.

६) सेवकांसाठी पी. एफ. योजना लागू केली.

७) लवादाच्या निवाडयावर अपिल करण्यासाठी सहकारी न्यायाधिकरण स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली. इत्यादी.

**तक्ता क्र. २ : सन १९९९-२००० मधील भारतातील सहकारी संस्था**[२४]

| अ. क्र. | सहकारी संस्था | संख्या |
|---|---|---|
| १. | सर्व प्रकारच्या सहकारी संस्था | ५,२८,२४७ |
| २. | राष्ट्रीय पातळीवरील सहकारी संस्था | २१ |
| ३. | राज्य पातळीवरील सहकारी संस्था | ३५३ |
| ४. | जिल्हा पातळीवरील सहकारी संस्था | २,५६५ |
| ५. | सर्व संस्थातील एकूण सभासद | २००९ द.ल. |
| ६. | खेळते भांडवल (रु. द.ल.) | २८८६४३३.५ |
| ७. | भाग भांडवल (रु. द.ल.) | ७०९६३.४ |

एकंदरीत विविध सहकारी संस्थांच्या स्थापनेमुळे ग्रामीण आणि शहरी भागाचा मोठया प्रमाणात विकास झाला. सहकारी कायद्यामुळे या देशाच्या सामाजिक व आर्थिक इतिहासाला नवे वळण लागले. भारतातील सर्वसामान्य नागरीक, गरीब, शेतकरी, शेतमजूर, कारागीर इत्यादी. लोकांच्यामध्ये काटकसर परस्पर सहकार्य सामुदायिक प्रगती यासारख्या प्रवृत्ती रुजल्या गेल्या.

**● महाराष्ट्रातील सहकारी चळवळ :**

सन १९०४ च्या सहकारी पतपुरवठा संस्थांच्या कायद्यानेच महाराष्ट्रात सुध्दा सहकारी चळवळीची सुरूवात झाली. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ फोफावण्यात तत्कालीन मुंबई राज्याचे मंत्री श्री. वैकुंठलाल मेहता व त्यांचे तत्कालीन वडील श्री. लल्लुभाई सामळदास यांची फारच मदत झाली त्याप्रमाणे, कै. गो. कृ. देवकर, कै. द. गो. कर्वे, प्रा. धनंजयराव गाडगीळ, श्री. वर्दे, प्रा, काझी, रावसाहेब खोले व डॉ काकडे , कै. वसंतदादा पाटील, राधाकृष्णन विखे-पाटील, कै. रत्नाप्पा कुंभार, श्री. गणपतराव देशमुख इत्यादींच्या व्यक्तिमत्वामुळे व नेतृत्वामुळे महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विकास झालेला आहे.[२५]

इ.स. १९१९ मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा कायद्यानुसार काही विषयाची केंद्र सरकार व प्रांतिक सरकार यांची गोरवाला कमिटीच्या (१९५१) शिफारशी व नंतर १९५१ मध्ये केंद्र शासनाने रिझर्व बँक ऑफ इंडीयाला देशाच्या शेती पतपुरवठयाची पाहणी करण्यास सांगितले. त्यासाठी प्रा. ए. डी. गोरवाला यांच्या अध्यक्षतेखाली १९५१ मध्ये एक समिती नेमली व तिने आपला १९५४ मध्ये रिझर्व बँकेला सादर केला. हा अहवाल सहकारी चळवळीच्या दृष्टीने अतिमहत्त्वाचा आहे. कारण त्यातल्या शिफारशी स्विकारल्यामुळे सहकारी चळवळीचे भविष्य बदलले.

**७.६ : महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम – १९६० :**

गोरवाल समितीच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र राज्याने १९२५ च्या कायद्यात सुधारणा करण्यासाठी श्री. जी. एम. लाड यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नेमली त्यानुसार महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यानंतर २६ जानेवारी १९६२ पासून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० ची अंमलबजावणी सुरू झाली. या कायद्यामध्ये २५० पेक्षा अधिक कलमे आहेत. गेल्या ४० वर्षामध्ये असंख्य वेळा दुरूस्ती झाल्या असल्या तरी सध्यासुध्दा महाराष्ट्रामध्ये सहकाराबाबत हा महत्त्वाचा कायदा आहे.

ज्या सहकारी संस्थांना आर्थिक सहाय्य मिळत नाही अशा संस्थांवर शासनाची नियंत्रणे किमान असावीत व या संस्थांना त्याचे कामकाज लोकशाही पध्दतीने करू द्यावे. अशी मागणी सहकार क्षेत्रामध्ये बऱ्याच वर्षापासून होती. यासाठी केंद्र सरकारने १९९० मध्ये नेमलेल्या चौधरी ब्रम्हप्रकाश समितीच्या शिफारशीनुसार राज्य सरकारांनी या धर्तीवर हवे असल्यास स्वतंत्र्य स्वायत्त सहकारी संस्थांचे सहकारी कायदे पास करावेत असे सांगितले. असा कायदा १९९५ साली आंध्रप्रदेशाने केला. त्यानंतर देशातल्या आठ राज्यांनी स्वतंत्र्य कायदे पास केले आहेत. त्यांच्या अनुभवाचे मूल्यमापन अजून व्हावयाचे आहे. महाराष्ट्रामध्ये मात्र अशा पध्दतीचा कायदा अजून अस्तित्वात नाही.[२६]

**८. : भारतातील सहकारी चळवळीचा विकास :**

मुंबई प्रांतासाठी ३० मे १९०४ रोजी सहकारी कायदा लागू केला. रेव्ह. सी. एस. फैनान रिव्हीग्टन, शिवाजी रामचंद्र कुलकर्णी, कांगिनहाळचे सिदगोंडा पाटील यांच्या मदतीने मॅकनील मुंबई प्रांतातील पहिल्या संस्थेची स्थापना केली.

धारवाड जिल्ह्यातील कंगिनहाळ गावचे सिदगोंडा पाटील यांच्या संघटनात्मक कार्यकौशल्यातून मुंबई प्रांतातील पहिली ग्रामीण सहकारी पतसंस्था ८ मे १९०५ रोजी गदग तालुक्यातील (धारवाड जिल्हा) बेटगेरी येथे पहिली नागरी सहकारी पतसंस्था स्थापन केली गेली. २१ डिसेंबर १९०५ रावबहाद्दुर पी. एन. पंडीत यांनी सिरसी ग्रामीण सहकारी पतसंस्था सिरसी या गावी स्थापन केली. यानंतरच्या काळात भारतातील विविध ठिकाणी काही सहकारी संस्था स्थापन झाल्या. उदाः पायोनियर बॉम्बे, कॉसमॉस पुणे-१८ जानेवारी १९६०, गोकाक अर्बन-१५ फेब्रुवारी १९०६, बेळगाव पायोनियर्स-२३ फेब्रुवारी १९०६, विठ्ठल ठाकरदास आणि लल्लुभाई सामलदास यांच्या प्रेरणेने निघालेली बॉम्बे अर्बन को. ऑफ क्रेडीट सोसायटी-२३ जानेवारी १९०६ (आजची महाराष्ट्र बॅंक) वरील संस्थांच्या माध्यमातून भारतात सहकारी चळवळीचा विकास झाला.[२७]

सन १९१२ च्या सहकारी संस्थाच्या कायद्याद्वारे शेतकरी कर्जपुरवठयाशिवाय खरेदी-विक्री, उत्पादन, विमा, घरे इत्यादी सेवा पुरविणाऱ्या सहकारी संस्थांची तरतूद करण्यात आली. तसेच स्वातंत्र्यानंतर या चळवळीचा प्रसार विविध क्षेत्रात वाढला. त्यात प्रामुख्याने

नागरी सहकारी बँका, शेतमाल प्रक्रिया, साखर उद्योग, पाणीपुरवठा, सूतगिरण्या, दुध उत्पादक संस्था, ग्राहक संस्था इत्यादी प्रकारच्या सहकारी संस्थांचा समावेश होता.

**तक्ता क्र. ३ : १९९९-२००० मधील भारतातील सहकारी संस्था व त्यांचा तपशील**[२८]

| | | |
|---|---|---|
| १. | सर्वप्रकारच्या सहकारी संस्था - संख्या | ५२८२४७ |
| २. | राष्ट्रीय पातळीवरील सहकारी संस्था | २१ |
| ३. | राज्यपातळीवरील सहकारी संस्था | ३५३ |
| ४. | जिल्हा पातळीवरील संघटना | २५६५ |
| ५. | सर्व संस्थातील एकूण सभासद | २००९ द.ल. |
| ६. | खेळते भांडवल रु. (द.ल.) | २८८६४३३.५ |
| ७. | भाग भांडवल रु. (द.ल.) | ७०९६३.४ |

एकंदरीत विविध सहकारी संस्थांच्या स्थापनेमुळे ग्रामीण आणि शहरी भागांचा मोठया प्रमाणात विकास झाला आहे. सहकारी कायद्यामुळे या देशाच्या सामाजिक व आर्थिक इतिहासाला नवे वळण लागले. भारतातील सर्वसामान्य नागरीक, गरीब शेतकरी, शेतमजुर, कारागीर इत्यादी लोकांच्या मध्ये काटकसर परस्पर सहकार्य सामुदायिक प्रवृत्ती यासारख्या प्रवृत्ती रुजल्या गेल्या.

**९. : महाराष्ट्रातील सहकारी चळवळ :**

सन. १९०४ च्या सहकारी पतपुरवठा संस्थांच्या कायद्यानेच महाराष्ट्रात सुध्दा सहकारी चळवळींची सुरूवात झाली. सहकार चळवळ फोफावण्यात तत्कालिन मुंबई राज्याचे मंत्री श्री. वैकुंठलाल मेहता व त्यांचे वडील श्री. लल्लुभाई सामोळदास यांची फारच मदत झाली. त्याप्रमाणे कै. गो. कृ. देवकर, कै. बा. गो. काळे, प्रा. द. गो. कर्वे, प्रा. धनंजयराव गाडगीळ, श्री. वर्दे, प्रा. काझी, रावसाहेब कोले, डॉ. काकडे, कै. वसंतदादा पाटील, कै. राधाकृष्ण विखे-पाटील, कै. रत्नाप्पा कुंभार, इत्यादींच्या व्यक्तीमत्त्वामुळे व नेतृत्त्वामुळे महाराष्ट्रातील सहकारी चळवळींचा विकास झालेला आहे.[२९] इ.स.१९१९ च्या मॉन्टेग्यु-चेम्सफर्ड सुधारणा कायद्यानुसार काही विषयांची केंद्रसरकार व प्रांतिक सरकार

यांच्यात विभागणी झालेली होती. यावेळी प्रथमच सहकार हा विषय केंद्रसरकार कडून प्रांतिक सरकारकडे सुपूर्द करण्यात आला. यामुळे लोकप्रतिनिधींचा सहकारी चळवळीशी प्रत्यक्ष संबंध आला व चळवळीचे स्वरुप तिच्यापासूनच्याअपेक्षा वाढल्या. लवकरच इ.स.१९२५ मध्ये मुंबई प्रांतिक कायदा अस्तित्वात आला. हा भारतातील पहिलाच प्रांतिक कायदा होय. यानंतरच्या काळात सहकारविषयी अनेक कायदे करण्यात आले.

१९५७ मध्ये केंद्र सरकारने के.टी.राज यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली व सहकाराविषयी काही आदर्श नियम तयार करण्यात आले. भारतातील सर्व राज्यांनी आपल्या राज्यातील सहकारी कायदा १९५७ च्या आदर्श कायद्यास धरुन करावा अशी अपेक्षा होती. मात्र महाराष्ट्र राज्याने स्वतंत्र्य सहकारी कायदा करण्याकरीता एक स्वतंत्र समिती जी. एम. लाड यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आली व १९६० साली महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० हा मंजुर करण्यात आला. हा कायदा करताना लाड समिती व राज समिती यांच्या शिफारशी विचारात घेतल्या आहेत.[३०]

एकंदरित महाराष्ट्रातील सहकार देशात अग्रेसर आहे. विविध आर्थिक क्षेत्रामध्ये सहकार चळवळीने यशस्वीपणे समाजाच्या आर्थिक विकासाचे कार्य केले असून काही क्षेत्रात तर व्यापक व विकासाभिमुख कार्य केले आहे. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांची वाटचाल हे सहकार चळवळींचे अभिमानास्पद पर्व आहे. भारतात सहकारी क्षेत्रातील पहिला साखर कारखाना स्थापन करण्याचा मान महाराष्ट्राकडे जातो. हा कारखाना कै. पद्मश्री. डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील यांनी स्थापन केला. तो प्रवरा सह. साखर कारखाना म्हणून ओळखला जातो.

**तक्ता क्र.४ : महाराष्ट्र राज्य सहकारी चळवळींची प्रगती[३१]**

**(सभासद लाखात)**

| अ.नं. | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ |
|---|---|---|---|---|
| एकूण संख्या | ३१,५६५ | ४२,६९३ | ६०,७४७ | १,०४,६२० |
| एकूण सभासद | ४२ | ८६ | १४८ | २७० |

**तक्ता क्र.५ : २०००-२००१ मधील महाराष्ट्रातील सहकारी संस्था** [३२]

| संस्था | संख्या |
|---|---|
| सहकारी साखर कारखाने | १५० |
| सूतगिरण्या | २०१ |
| प्राथमिक शेती पतपुरवठा संस्था | २०,३४३ |
| नागरी पतपुरवठा संस्था | १७,२०२ |
| सेवक पतसंस्था | ७,२७८ |
| नागरी बँका | ६५४ |
| दूध पुरवठा संस्था | २३,६७९ |
| औद्योगिक संस्था | ६,२४६ |
| गृहनिर्माण संस्था | ५९,४०० |
| मजूर संस्था | ९,९५९ |
| मच्छीमार | २,४८५ |
| यंत्रमाग | १,०८७ |
| उपसा जलसिंचन संस्था | ७,००९ |
| इतर प्रकारच्या संस्था | ११,५७३ |
| एकूण | १,६७,२६६ |
| एकूण संस्थांचे भाग भांडवल | रु.१२,२२५ कोटी |
| खेळते भांडवल | रु.१,५४,८२९ कोटी |

**सोलापूर जिल्हयातील सहकारी चळवळः**

सोलापूर जिल्हयातील सहकारी चळवळीचा मोठया प्रमाणात विकास झालेला आहे. मुंबई प्रांतासाठी ३० मे १९०८ रोजी सहकारी कायदा लागू केला तोच कायदा सोलापूर

जिल्हयासाठी सहकारी चळवळीची सुरुवात सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँक मर्यादित सोलापूर या बँकेची स्थापना दि. ८ मार्च १९१८ रोजी झाली. या बँकेच्या वाढीस प्रारंभी सोलापूर शहरातील कै. रा. ब. जी. के. साठे, कै. व्ही. एस. जोग, कै. एम. आर. गोडबोले, कै. जी. डी. पुंडे, कै. जमादार, कै.जे.ई. कुलकर्णी व कै. जी. आर. कुंभकोणी या मान्यवरांचा सहभाग लाभला. बँकेच्या सभासदत्वास ग्रामीण भागात वाव मिळू लागला. तेव्हापासून शेतकऱ्यांमधील व जिल्हयातील कर्तृत्त्ववान नेतृत्त्व या बँकेस मिळू लागले. त्यामध्ये कै. गणपतराव साठे सहकार महर्षी कै. शंकररावजी मोहिते-पाटील, कै. नामदेवरावजी जगताप यांनी बँकेच्या उद्देशास शेतकऱ्यांच्या, कारागिरांच्या घरापर्यंत पोहोचविण्यात व जिल्हयामध्ये सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेस व वाढीमध्ये सिंहाचा वाटा उचलेला होता.

सोलापूर जिल्हयात सहकारी चळवळीचा मोठया प्रमाणात विकास झालेला आहे. सनः २०००-०१ पर्यंत या जिल्हयात एकूण ८,१४८ एवढया सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत. त्यामध्ये जिल्हा मध्यवर्ती बँक - १ व जिल्हा औद्योगिक बँक — १, प्राथमिक विविध कार्यकारी सोसायट्या-१०५७, नागरी सहकारी बँका-४२, नागरी/ ग्रामीण बिगरशेती पथसंस्था-७८०, पगारदार नोकरदारांच्या सहकारी पथसंस्था-२९१ एवढया आहेत. पणन / फलोत्पादन सहकारी संस्था ४०, सहकारी साखर कारखाने १२, शेतीमालप्रक्रिया संस्था ११, सहकारी संस्था २५, पाणीपुरवठा सहकारी संस्था २९५, गृहनिर्माण संस्था ६८५, ग्राहक सहकारी संस्था७८४, दुग्ध व्यवसाय सह. संस्था २३५५, मच्छिमार सहकारी संस्था ११०, कुक्कुटपालन व्यव. सह. संस्था १४७, मेंढपाळ सह. संस्था २००, इतर सहकारी संस्था ९९६ अशा विविध प्रकारच्या सहकारी संस्थांमुळे सोलापूर जिल्हयाचा सहकाराच्या बाबतीत मोठया प्रमाणात विकास झालेला आहे.[३३]

**१०. : माळशिरस तालुक्यातील सहकारी चळवळ :**

माळशिरस हे सोलापूर जिल्हयातील महत्त्वाचे असे तालुक्याचे ठिकाण आहे. स्वातोत्र्योत्तर काळानंतर भारतात कृषी विकास, औद्योगिक विकास आणि शैक्षणिक विकासासाठी पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातुन व सहकारी चळवळींच्या माध्यमातून

स्थानिक भागाच्या विकासास सुरूवात झाली. आवर्षणग्रस्त असणाऱ्या या भागामध्ये स्वातंत्र्यपुर्व काळात पारंपारिक पध्दतीने शेती उद्योग केले जात होते. मात्र स्वातंत्र्योत्तर काळानंतर सहकारी चळवळींच्या विकासानंतर या पिक पध्दतीत मोठया प्रमाणात बदल घडून ऊस, कापुस, डाळींब व बोर यासारखी नगदी पिके घेतली जाऊ लागली आहेत. या पिकपध्दतीमुळेच सहकारी चळवळीच्या माध्यमातून विविध सहकारी संस्थांची स्थापना झालेली आहे.

माळशिरस तालुक्यातील सहकारी चळवळीची सुरूवात ही इ.स. १९१५ रोजी झाली. प्रथमतः या तालुक्यात अकलूज विविध कार्यकारी सोसायटी संस्थेची स्थापना १९१५ रोजी झाली. त्यानंतर तालुक्यात विविध सहकारी संस्था सुरु झाल्या.

तालुक्यात वि.का.से. संस्था, नागरी सहकारी पत संस्था, पगारदार सेवकांच्या पत संस्था, नागरी बँका, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेची शाखा, सहकारी साखर कारखाना, ग्राहक भांडारे, शिवामृत दूध संघ, दुध संकलन संस्था, मजूर संस्था, पाणलोट संस्था, सहकारी सूत गिरणी, कुक्कूट पालन संघ, देखरेख संघ, शेतीसाधन पुरवठा संस्था, वाहतूक संस्था अशा विविध प्रकारच्या संस्थांची स्थापना झालेली आहे.[३४]

**तक्ता क्र. ६ : माळशिरस तालुक्यातील सहकारी संस्था प्रकार दर्शक तक्ताः-**[३५]

| | | |
|---|---|---|
| १. | प्राथमिक कार्यकारी सेवा संस्था | ५४ |
| २. | प्राथमिक नागरी बँका | २ |
| ३. | नोकरदारांच्या पतपुरवठा संस्था | २२ |
| ४. | ग्रामीण बिगरशेती पत संस्था | ६४ |
| ५. | पणन सहकारी संस्था | १ |
| ६. | सहकारी साखर कारखाना | ३ |
| ७. | ताडगुळ | १ |
| ८. | गुळ खांडसरी सहकारी संस्था | १ |

| | | |
|---|---|---|
| ९. | इतर ग्रामीण सहकारी संस्था | १८ |
| १०. | दोरखंडे उत्पादन संस्था | १ |
| ११. | सामान्य यंत्रोद्योग संस्था | १ |
| १२. | सुतगिरणी | १ |
| १३. | सहकारी औद्योगिक वसाहत | १ |
| १४. | सहकारी प्राथमिक ग्राहक संस्था | ६ |
| १५. | सहकारी गृहनिर्माण संस्था | १७ |
| १६. | सहमजुर संस्था | ६४ |
| १७. | वाहतुक सहकारी संस्था | २ |
| १८. | इतर सहकारी संस्था शेती | १ |
| १९. | नाविण्यपुर्ण सहकारी संस्था | १ |
| २०. | तालुका देखरेख संघ | १ |
| २१. | कालवा पाणी वापर संस्था | ५ |
| २२. | सहकारी पाणीपुरवठा वापर संस्था | ६४ |
| | एकूण | ३७३ |

सन २००० पर्यतच्या तालुक्यातील प्रमुख सहकारी संस्थांचा आढावा घेतला असता त्यात सहकारी साखर कारखाने, ५४ प्राथमिक विकास कार्यकारी सेवा संस्था, ६४ बिगर ग्रामीण बिगरशेती पतसंस्था, १ सूतगिरणी, २ कुक्कूटपालन संस्था, २ सहकारी वाहतूक संस्था, ६४ मजूर सहकारी संस्था, १ सहकारी दूध उत्पादक संघ, ३१२ सहकारी दूध संकलन संघ, १७६ सहकारी गृहनिर्माण संस्था, इतर ग्रामीण १८ संस्था, २ प्राथमिक सहकारी नागरी बँका, १ पणन सहकारी संस्था, १ ताडगुळ, १ गुळ खांडसरी सहकारी संस्था, १ सामान्य यंत्रोद्योग, १ दोरखंड उत्पादन, ६ सहकारी प्राथमिक ग्राहक संस्था, १ इतर सहकारी शेती संस्था, १ नाविण्यपुर्ण सहकारी संस्था, १ तालुका देखरेख संघ.


**तक्ता क्र.७: माळशिरस तालुक्यातील सहकार चळवळीचा विकास** १९५०-२०००[३६]

| अ.नं. | संस्थेचे नाव | १९५०-६० | १९६०-७० | १९७०-८० | १९८०-९० | १९९०-२००० |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था | १६ | ६ | - | १० | १३ |
| २. | नागरी सहकारी बँका | - | - | १ | - | १ |
| ३. | नोकरदाराची सहकारी पतसंस्था | ३ | ३ | २ | ७ | ७ |
| ४. | नागरी/ ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था | - | - | - | १६ | ४८ |
| ५. | पणन सहकारी संस्था | १ | - | - | - | - |
| ६. | सहकारी साखर कारखाना | - | २ | - | १ | - |
| ७. | ताडगूळ सहकारी संस्था | - | - | - | - | १ |
| ८. | गूळ खांडसरी संस्था | - | - | - | - | १ |
| ९. | इतर ग्रामीण उद्योग संस्था | - | - | - | ४ | १४ |
| १०. | सामान्य यंत्रोद्योग सहकारी संस्था | - | १ | - | - | - |
| ११. | बांधकाम माल उत्पादन सहकारी संस्था | - | - | - | - | १ |
| १२. | दोरखंड उत्पादन सहकारी संस्था | - | - | - | १ | - |
| १३. | इतर बलुतेदारांसह सहकारी संस्था | - | - | २ | १ | १ |
| १४. | सूतगिरणी | - | - | - | १ | - |
| १५. | औद्योगिक वसाहत सहकारी संस्था | - | - | - | १ | - |
| १६. | ग्राहक सहकारी संस्था | १ | १ | ४ | ६ | ५ |
| १७. | मजूर सहकारी संस्था | १ | ३ | १८ | २७ | ३३ |
| १८. | वाहतूक सहकारी संस्था | - | - | - | - | २ |
| १९. | इतर शेती सहकारी संस्था | - | - | - | १ | - |
| २०. | नाविण्यपुर्ण सहकारी संस्था | - | - | - | - | १ |
| २१. | तालुका सहकारी देखरेख संघ | - | - | - | - | १ |
| २२. | कालवा पाणी वापर सहकारी संस्था | - | - | - | - | ५ |
| २३. | पाणीपुरवठा सहकारी संस्था | - | ३ | - | १५ | ७८ |

माळशिरस तालुक्यातील सहकारी चळवळींचा मोठया प्रमाणात विकास सन १९६० मध्ये स्थापन झालेल्या यशवंत सहकारी साखर कारखाना लि. यशवंतनगर-अकलूज या संस्थेपासून झालेला आहे. एकंदरीत माळशिरस तालुक्यातील विविध प्रकारच्या सहकारी संस्थांच्या स्थापनेमुळे येथील लोकांच्या सामाजिक, आर्थिक, राजकिय, शैक्षणिक विकासात मोठया प्रमाणात बदल झालेला आहे.

**तक्ता क्र.८: माळशिरस तालुक्यातील १९५० ते २०००सहकारी संस्था प्रगती आलेख**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९५०-६० | १९६०-७० | १९७०-८० | १९८०-९० | ९०-२००० |
| १९ | १९ | २७ | ९१ | २१२ |




वरील आलेखावरुन असे दिसून येते की, माळशिरस तालुक्यामध्ये १९५०-६० मध्ये १९, १९६०-७०मध्ये १९, १९७०-८०मध्ये २७, १९८०-९०मध्ये ९१, १९९०-२००० मध्ये २१२ या सहकारी संस्थांची स्थापना झाली आहे. एकंदरीत १९९० ते २००० या कालखंडात सहकारी संस्थांच्या स्थापनेच्या प्रगतीची आकडेवारी जास्त दिसुन येते.

**● संदर्भ सूची :**


१. डॉ. जोशी सी. जे. 'सहकाराचा विकास' फडके प्रकाशन, कोल्हापूर. जून २००५. पृष्ट. २

२. जुगळे वसंत, 'महाराष्ट्रातील सहकारी चळवळः दिशा आणि दशा' समाजवादी प्रबोधिनी (संपा) इचलकरंजी, १९९६, पृ.१४

३. प्रा. चौगुले व्ही. टी. व प्रा. के. जी. पठाण 'सहकाराची मूलतत्त्वे' कॉन्टीनेन्टल प्रक ाशन पुणे, प्रथमावृत्ती, १९७९. पृ. ३

४. डॉ. माथूर बी. एस. 'कोऑपरेशन इन इंडीया' साहित्यभवन तृतीय आवृत्ती,१९७७. पृ.७

५. हजेला टी. एन. 'प्रिन्सीपल प्रॉब्लेम अँड प्रॅक्टीस ऑफ को ऑपरेशन' शिवालाल आगरलाल अँड कं. आग्रा १९७८, पृ.५

६. डॉ जोशी सी.जे., 'सहकारतत्त्वे आणि व्यवहार', फडके प्रकाशन कोल्हापूर.

७. हजेला टी. एन. 'प्रिन्सीपल प्रॉब्लेम अँड प्रॅक्टीस ऑफ को ऑपरेशन' शिवालाल आगरलाल अँड कं. आग्रा १९७८, पृ.५

८. तामलकी एस. एस. 'को-ऑपरेशन इन इंडीया' ॲन्ड अ ब्रॉन्ड' बेसल मिशन प्रेस मेंगलोर १९३१ पृ.१४

९. डॉ. सी. जे. जोशी, 'सहकाराचा विकास' फडके प्रकाशन कोल्हापूर. २००४ पृ.३

१०. डॉ. माथुर बी. एस. 'को-ऑपरेशन इन इंडीया' साहित्यभवन, आग्रा. १९७७,पृ.७

११. प्रा. कामत गो.स., 'सहकार तत्त्व आणि व्यवस्थापन' विद्याप्रकाशन, पुणे २००२, पृ.४

१२. जुगळे वसंत, 'महाराष्ट्रातील सहकारी चळवळः दिशा आणि दशा' समाजवादी प्रबोधिनी (संपा) इचलकरंजी, १९९६, पृ.१५

१३. प्रा. चौगुले व्ही. टी. व प्रा. के. जी. पठाण 'सहकाराची मूलतत्त्वे' कॉन्टीनेन्टल प्रक ाशन पुणे, प्रथमावृत्ती, १९७९. पृ. ३

१४. प्रा. सराफ मोहन, ना. मा. आचार्य, 'सहकार' मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे. १९९२, पृ. २३.

१५. प्रा. सराफ मोहन, ना. मा. आचार्य, 'सहकार' मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे. १९९२, पृ. २३.

१६. प्रा. शहा रुपा व डॉ. बी. एच दामजी 'सहकार' मेहता पब्लिशिंग पुणे. १९९२ पृ. २३

१७. जुगळे, 'महाराष्ट्रातील सहकार चळवळः दिशा आणि दिशा', प्रबोधिनी (संपा), इचलकरंजी १९९६, पृ.१५

१८) कर्वे चि. ग., जोगळेकर स. आ. व शं. गा. जोशी (संपा) 'महाराष्ट्र परिचय/संयुक्त महाराष्ट्राचा ज्ञानकोष', प्रसाद प्रकाशन पुणे.१९५४ प..६४०

१९. हजेला टी. एन. 'प्रिन्सीपल प्रॉब्लेम ॲन्ड प्रॅक्टीस ऑफ को-ऑपरेशन' शिवालाल अगरवाल ॲन्ड कंपनी, आग्रा. १९७८. पृ.२१९

२०. कुलकर्णी पी. आर., 'सहकार तत्व आणि व्यवहार' पिपळापुरे आणि पब्लिशर्स नागपूर. प्रथमावृत्ती, जून १९९० पृ. ६५.

२१. कुलकर्णी पी. आर. 'सहकार तत्त्व आणि व्यवहार' पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स नागपूर. प्रथमावृत्ती १९९०. पृ.६५

२२. अुगळे जयंत (प्र.) 'शतकोत्तर सहकार' अजिंक्य सहकारी मुद्रणालय, लि. सातारा. प्रथमावृत्ती २००४.पृ. ६८

२३. अुगळे जयंत (प्र.) 'शतकोत्तर सहकार' अजिंक्य सहकारी मुद्रणालय, लि. सातारा. प्रथमावृत्ती २००४.पृ. ४५

२४. अुगळे जयंत (प्र.) ‘शतकोत्तर सहकार’ अजिंक्य सहकारी मुद्रणालय, लि. सातारा. प्रथमावृत्ती २००४.पृ. ४५

२५. कर्वे चि. ग. ‘जोगळेकर स. आ., जोशी शं. गो. (संपा) ‘महाराष्ट्र परिचय/संयुक्त महाराष्ट्राचा ज्ञानकोश’ प्रसाद प्रकाशन पुणे १९५४ पृ.५०

२६. अुगळे जयंत(प्रका), ‘शतकोत्तर सहकार’ ‘अजिक्य सहकारी मुद्रणालय, लि. सातारा. प्रथमावृत्ती, २००४. पृ. ७३

२७. डॉ.जुगळे वसंत, ‘महाराष्ट्रातील सहकारी चळवळःदिशा आणि दशा’ समाजवादी प्रबोधिनी(संपा), इचलकरंजी १९९६, पृ. २०

२८. डॉ.संतोष दास्ताने, महाराष्ट्र २०११, प्रकाशक : दास्तानी रामचंद्र कं.पुणे पृ. ९४

२९. कर्वे चि. ग. ‘जोगळेकर स. आ., जोशी शं. गो. (संपा) ‘महाराष्ट्र परिचय/संयुक्त महाराष्ट्राचा ज्ञानकोश’ प्रसाद प्रकाशन पुणे १९५४ पृ.५०

३०. शिंदे वसंतराव, ‘सहकारी महाराष्ट्र’ मानद सचिव महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे. जुलै.२००४ पृ.४

३१. डॉ. संतोष दास्ताने, ‘महाराष्ट्र २०११’ दास्ताने रामचंद्र कं. पुणे. पृ.९४

३२. डॉ. संतोष दास्ताने, ‘महाराष्ट्र २०११’ दास्ताने रामचंद्र कं. पुणे. पृ.९५

३३. सोलापूर जिल्हा मध्य.सह. बँक मर्या. सोलापूर. वार्षिक अहवाल २०००-०१ पृ.११

३४. दुय्यम निबंधक यांचेकडील सहकारी संस्थांची यादी २००९-१०

३५) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अकलूज ता. माळशिरस यांचे कार्यक्षेत्रातील तालुक्यातील सहकारी संस्थाची यादी मार्च २००९

**३६)** सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अकलूज ता. माळशिरस यांचे कार्यक्षेत्रातील तालुक्यातील सहकारी संस्थाची यादी मार्च २००९

## प्रकरण. ३ रे :

## ● माळशिरस तालुक्यातील प्रमुख सहकारी संस्था आणि त्यांचे कार्य ●

### ● प्रास्ताविक :

देशाला स्वातंत्र्य मिळून जवळजवळ साठ वर्षे पूर्ण झाली. तर दुसऱ्या बाजूला सहकारी चळवळीला १०३ वर्षे पूर्ण झाली. राष्ट्रीय विकासात भारतातील सहकारी चळवळींचे योगदान मोठे आहे. लोकशाही मार्गाने ग्रामीण व शहरी, भागाचा कायापालट घडवून आणणारी चळवळ म्हणून सहकाराकडे पाहिले जाते. देशामध्ये आर्थिक व सामाजिक लाकशाही निर्माण करण्याच्या उद्देशाने नियोजनाची कास धरण्यात अली. भारतीय नियोजन यशस्वीपणे राबवायचे असेल, तर सहकाराला उत्तेजन दिले पाहिजे अशी भुमिका अने तज्ञांनी मानली.

आज माळशिरस तालुक्यात अनेक सहकारी संस्था निर्माण झाल्या आहेत. आज तालुक्यातील काही प्रमुख सहकारी संस्थांचा आढावा घेतला असता त्यात सहकारी साखर कारखाने(३), प्राथमिक विविध कार्यकारी सेवा संस्था (१३२), ग्रामीण बिगरशेती पथसंस्था (८९), सहकारी पाणीपुरवठा संस्था (१३९), सूतगिरणी, सहकारी कुक्कूट पालन संस्था, सहकारी वाहतूक संस्था, सहकारी मजूर संस्था, सहकारी दूध उत्पादक संघ, सहकारी दूध संकलन संस्था, सहकारी गृहनिर्माण संस्था व इतर ग्रामीण सहकारी संस्था असे विस्तृत स्वरूप आहे.

माळशिरस तालुक्यातील सहकारी चळवळ समाजातील ग्रामीण, शहरी भागातील लोकांच्यासाठी कार्य करीत असल्याने या संस्थांच्या कार्याचे मूल्यमापन, संस्थांची संख्या, त्यांचा विकास या संदर्भात त्यांच्य कार्याचे मूल्यमापन करणे गरजेचे आहे. तसेच या संस्थांचा विकास कसा होत गेला, कोणत्या संस्थाची किती वाढ झाली, यावरही त्याचे मूल्यमापन अवलंबून असते. त्या दृष्टीने सहकारी संस्था किती आहेत. त्यांचे वर्गिकरण कशा प्रकारचे आहे, यालाही महत्त्व दिले जाते. म्हणून निवडक सहकारी संस्थांमधून

प्रातिनिधिक स्वरुपाच्या नमुना संस्थांची निवड केली आहे. सर्व निवडक सहकारी संस्थांचा अभ्यास करताना सहकारी संस्थेची वाढ, त्यांचे भांडवल स्त्रोत, त्यांची आर्थिक स्थिती, इत्यादी माहिती गोळा करून संशोधन अहवाल पूर्ण केला आहे. सहाय्यक निबंधक यांच्या कार्यालयातील कागदपत्रांमधून माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे.

**अ) शंकरराव मोहिते-पाटील सहकारी सूत गिरणी लिमिटेड : अकलूज. (पिसेवाडी) :**

शंकरराव मोहिते सहकारी सूत गिरणी ही महाराष्ट्रातील, सोलापूर जिल्हयातील, माळशिरस तालुक्यात पंढरपूर – पूणे मार्गावर, उत्तर बाजूस उभी राहिली आहे. तिची स्थापना दि. १८/०१/१९८० रोजी झालेली असून नोंदणी क्रमांक : एस. यू. आर. / पी. आर. जी./(ए)६ एवढा आहे.[१]

सहकार महर्षी कै. शंकरराव मोहिते-पाटील यांनी साखर धंद्याशिवाय, दूग्ध व्यवसाय, कुक्कूटपालन व्यवसाय असे इतर व्यवसायही ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मिळवून दिले पाहिजेत, आणि अशाप्रकारे अनेक व्यवसायातून ग्रामीण भागातील शेतकरी, सर्वसामान्य जनता, कामगार सुखी व समृध्द झाला पाहिजे, या त्यांच्या महत्त्वाकांक्षेचा आदर्श डोळयासमोर ठेऊन मा. श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांनी या सूतगिरणीची स्थापना केली. सूतगिरणी स्थापनेच्या कालावधीमध्ये या परिसरात कापसाचे मोठया प्रमाणात उत्पादन होत होते. हा कापूस बाहेर विक्री करण्याऐवजी आपल्या तालुक्यात गिरणीची स्थापना करून हा कापूस त्या सूतगिरणीसाठी उपयोगात आणता येईल व तालुक्यातील शेतकऱ्यांना रास्त दराने व हमखास विक्रीची हमी मिळेल या उदात्त हेतूने सूतगिरणीची स्थापना करणेत आली.

सूत गिरणीची स्थापना सन १९८० साली झाली असली तरी, खऱ्या अर्थाने सूत गिरणी सन १९९०-९१ मध्ये कार्यरत झाली. कारण सन १९९०-९१ पर्यंत शासनाकडून शासकीय भागभांडवल उपलब्ध झाले नाही. त्यामुळे सूत गिरणी उभारणीस विलंब लागला. सन १९८० चे दरम्यान तालुक्यात कापसाचे मोठया प्रमाणात उत्पादन होत होते. परंतु सन

१९८०-९० चे दरम्यानच्या काळात हवामानात अमुलाग्र बदल झाला. कापसाचे पिकावर व उत्पादनावर अनिष्ट परिणाम होऊ लागला. त्यामुळे शेतकरी कापसाचे पीक घेण्याकडे दुर्लक्ष करु लागला. त्यामुळे कापसाचे क्षेत्र नगण्य होत गेले. त्यामुळे शेतकरी संस्थेला महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासघ व खाजगी कापूस व्यापारी यांचेकडून कापूस खरेदी करावा लागत आहे.

सुरूवातीला ५७८२ सभासदावर ही सूतगिरणी सुरू होऊन प्रारंभी गिरणीत ५७६ रोटर्स चा समावेश होता. वीजप्रवाह खंडीत झाल्यामुळे तुटलेले धागे जोडण्यासाठी दोन तासाचा कालावधी जात होता. तो कमी करणेसाठी ॲटोकोरो मशिनला जादा वपिसर कॅरेज बसविण्यात आले. मूळ प्रकल्प-५७६ रोटर्स चा असून पुर्णपणे व यशस्वीरित्या चालू आहे. संस्थेने सूताची प्रत उत्तम ठेवण्यासाठी तीन कोरोलॅब मशीन खरेदी केलेल्या आहेत. तसेच फेडरेशनकडून आलेल्या विविध जातीच्या कापूस गाठीचे योग्य प्रमाणात मिक्सींग करुन उत्तम दर्जाचे सूत निर्मितीसाठी मल्टीमिक्सर बसविले आहेत. (संस्थेने शासनास २५००० चात्यांचे विस्तारीत प्रकल्प सुरू केला आहे.)

**तक्ता क्र. ९**

## भागभांडवल

| अ.क्र. | तपशील | सभासद | रू. लाख | सभासद | रू. लाख | सभासद | रू. लाख | सभासद | रू. लाख | सभासद | रू. लाख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | उत्पादक सभासद | ५७८२ | ९९.७८ | ७९३४ | ७१.८८ | ७६२६ | २२६.२९ | ७६५६ | २२६.५३ | ७६६० | २२६.८१ |
| २. | शेअर अनामत | - | २.६७ | - | ३.६४ | - | ७.८३ | - | ७.५९ | - | ५.२६ |
| ३. | सरकारी | २२ | ६.१० | २४ | ५.५० | २४ | ५५.१५ | २४ | ५३.९९ | २४ | ५२.७९ |
| ४. | सार्वजनिक ट्रस्ट | १ | ०.०५ | १ | ०.०५ | १ | ०.०५ | १ | ०.०५ | १ | ०.०५ |
| ५. | महाराष्ट्र शासन | १ | ३२४.०४ | १ | ३२४.१४ | १ | ३२४.१४ | १ | ३२४.१४ | १ | ३२४.१४ |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, सुतगिरणीचे अहवाल वर्ष १९९३-९४ मध्ये ५७८२ उत्पादक सभासद असून ९९.७८ लाख रुपये इतके भागभांडवल होते. शेअर अनामत सभासद काहीही नसुन २.६७ लाख रुपये भागभांडवल आहे. सरकारी सभासद २२ असून ६.१० लाख रुपये भागभांडवल आहे. सार्वजनिक ट्रस्ट व महाराष्ट्र

शासन हे अनुक्रमे १ व १ सभासद असून त्यांचे अनुक्रमे ०.०५ लाख रुपये व ३२४.१४ लाख रुपये भागभांडवल होते. १९९४-९५ मध्ये ७९३४ सभासद व २७१.८८ लाख रुपये भागभांडवल शेअर अनामत ३.६४ लाख रुपये सरकारी सभासद २४ त्याचे ५.५० लाख रुपये भागभांडवल सार्वजनिक ट्रस्ट — ०.०५ महाराष्ट्र शासन ३२४.१४ इतके भागभांडवल होते. १९९६-९७ मध्ये ७६२६ सभासद त्यांचे २२६.२९ रूपये लाख भागभांडवल शेअर अनामत रक्कम ७.८३ लाख रुपये सरकारी भागभांडवल ५५.१५ लाख रुपये सार्वजनिक ट्रस्ट — ००-०५, महाराष्ट्र शासन ३२४.१४ लाख रुपये इतके भागभांडवल होते. सन १९९७-९८ मध्ये ७६५६ सभासद त्यांचे २२६.५३ भागभांडवल शेअर अनामत रक्कम रुपये ७.५९ लाख रुपये सरकारी भागभांडवल ५३.९९ लाख रुपये , सार्वजनिक ट्रस्ट — ०.०५ आणि महाराष्ट्र शासन ३२४.१४ लाख रुपये इतके भांडवल होते. सन १९९९-२००० मध्ये ७६६० सभासद त्यांची २२६.८१ लाख भागभांडवल शेअर अनामत रक्कम रु. ५.२६ लाख रुपये, सरकारी भागभांडवल ५२.७९ लाख, सार्वजनिक ट्रस्ट — ००.०५, महाराष्ट्र शासन ३२४.१४ इतके भागभांडवल होते.

एकंदरीत १९९३-९४ मध्ये ५८०६ सभासदांचे ४३२.६१४ लाख रुपये भागभांडवल होते. १९९४-९५ मध्ये ७९६० सभासदांचे ६०५.०७ लाख रुपये भागभांडवल होते. सन १९९५-९६ मध्ये ७६५२ सभासदांचे ६१३.४६ लाख रुपये भागभांडवल होते. १९९७-९८ मध्ये ७६८२ सभासदांचे ६१२.०३ लाख रुपये भागभांडवल होते. १९९९-२००० मध्ये ७६८६ सभासदांचे ६०९.०५ भागभांडवल होते.

**तक्ता क्र. १०**

## बंद रोटर्सची कारणे त्याचे प्रमाणे टक्केवारी मध्ये.

| अ.क्र. | तपशिल | १९९३-९४ | १९९४-९५ | १९९५-९६ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | स्वच्छता व साफसफाई | १.१९ | २.०९ | १.८१ | ०.८५ | ०.६४ | ०.५७ |
| २. | दुरूस्ती | ०.६७ | ०.८८ | १.७९ | १.१० | ८.१५ | ०.४२ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | स्पेअर्स अभावी | १.०५ | ०.२९ | ०.९५ | ०.०० | ०.०२१ | ०.०९ |
| ४. | काऊंट बदल | २.०६ | १.४५ | २.८४ | ०.६७ | ०.३५ | ०.२५ |
| ५. | अंतर्गत – विद्युत बिघाड | - | ०.०६ | ०.७८ | ०.३६ | १.९४ | ०.७६ |
| ६. | खंडीत विद्युत पुरवठा | ५.७४ | ८.५० | ११.९५ | ३.३६ | ५.११ | १.८५ |
| ७. | कामगार कमतरता | - | - | - | - | - | ३.२९ |
| ८. | अपुरा कच्चा माल | १.४९ | ३.०३ | ५.५८ | - | - | २.१३ |
| एकूण | टक्केवारी | १३.३८ | १६.०३ | २५.७ | १२.७३ | २५.५१ | ३७.६८ |


वरील तक्त्यातील आकडेवारीतुन असे दिसून येते की, सन १९९३-९४ मध्ये बंद रोटर्स कारणे त्याचे प्रमाण टक्केवारीमध्ये १३.३८ इतके होते. सन १९९४-९५ मध्ये बंद रोटर्स कारणे त्याचे प्रमाण टक्केवारीमध्ये १६.०३ इतके होते. सन १९९५-९६ मध्ये बंद रोटर्स कारणे त्याचे प्रमाण टक्केवारीमध्ये २५.०७ इतके होते. सन १९९७-९८ मध्ये बंद रोटर्स कारणे त्याचे प्रमाण टक्केवारीमध्ये १२.७३ इतके होते. सन १९९८-९९ मध्ये बंद रोटर्स कारणे त्याचे प्रमाण टक्केवारीमध्ये २५.५१ इतके होते. सन १९९९-२००० मध्ये बंद रोटर्स कारणे त्याचे प्रमाण टक्केवारीमध्ये ३७.६८ इतके होते.

एकंदरीत बंदरोटर्सच्या टक्केवारीचे प्रमाण वाढत गेल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र.११**

## सूत उत्पादन (किलो) वृत्तांत :

| १९९४-९५ | १९९९५-९६ | १९९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | ९९-२००० |
|---|---|---|---|---|---|
| १७७२०९८ | १५४८७९४ | २०५८६६१ | २२२०३१८ | १९१४२२४ | १३९५४३६ |




वरील आलेखावरुन असे दिसून येते की, सन १९९४-९५ मध्ये सुतउत्पादन १७७२२०९८ किलो, १९९५-९६ मध्ये १५४८७९४, १९९६-९७ मध्ये २०५८६६१,

१९९७-९८ मध्ये २२२०३१८, १९९८-९९ मध्ये १९१४२२४ तर १९९९-२००० मध्ये १३९५४३६ किलो इतके होते.

यावरुन असे दिसुन येते की, १९९४-९५ नंतर प्रत्येकवर्षी सूत उत्पादनात कमी जास्त फरक पडून सन १९९९-२००० मध्ये सूत उत्पादन कमी झाले.

**राष्ट्रीय सहकारी विकास निगम आधुनिकीकरण व विस्तारीकरण योजना :**

सहकारी क्षेत्रातील सूत गिरण्यांचे आधुनिकीकरण व विस्तारीकरण आवश्यकतेनुसार करून त्यांची सर्वकष क्षमता वाढवावी व त्यांना आर्थिकदृष्टया सक्षम करावे, या हेतूने राष्ट्रीय सहकारी विकास निगम एन.सी.डी.सी. नवी दिल्ली. यांनी एक योजना आखली असून या योजनेअंतर्गत प्रकल्प अहवालाच्या एकूण ६० टक्के इतके कर्ज सवलतीच्या दराने ३० टक्के इतकी व रक्कम भागभांडवल स्वरुपात राज्य शासनामार्फत यानुसार अदा केली जाणार आहे. या योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यामध्ये महाराष्ट्रातील एकूण सूत गिरण्यापैकी २० सूतगिरण्या समाविष्ट केल्या आहेत. केलेल्या अहवालानुसार २५ हजार चात्याचा प्रकल्प आहे. [२]

**●सामाजिक कार्य :**

सुतगिरणीच्या संस्थेमार्फत दरवर्षी आळंदीहून पंढरपूरकडे श्री. विठ्ठलाचे भेटीस जाणाऱ्या श्री. संत शिरोमणी ज्ञानेश्वर माऊली पालखी विसावा सूतगिरणी विसावा, सूतगिरणी स्थळावर सुतगिरणी पदाधिकाऱ्यांच्या वतीने विधीवत पूजन केले जाते. पालखी पूजनानंतर दिंडी सोहळयातील तीन हजार वारकऱ्यांना जाताना दिले जाते. व पालखी वेळी सोबतचे वारकऱ्यांना अल्पोपहार चहा देण्यात येतो. तसेच पालखी मार्गावर संस्थेच्या वतीने वृक्षारोपन करणेत आलेले आहे.[३]

**●बचत सूतगिरणी :**

गिरणीचे सेवकांना बचतीची सवय लागावी या उद्देशाने जिल्हाधिकारी कार्यालयाचे अल्पबचत विभागामार्फत सर्व सेवकांची पोस्टल रिकरींग डीपॉझीट खाती उघडली असून जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आपले गिरणीस १००ऽ बचत सूतगिरणी म्हणून प्रशस्तीपत्र

मिळालेले आहे. सुतगिरणीचे मेनगेट समोर १००९ बचत सूतगिरणी म्हणून फलक जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत लावण्यात आला असून त्याचे अनावरण व प्रशिस्तीपत्र प्रदान सोहळा सोलापूरचे जिल्हाधिकारी मा. श्री. दिपक कपूर यांचे हस्ते दि.१६/११/१९९९ रोजी झाला.[४]

**●कामगार विभाग :**

सूतगिरणीमधील कामगार व व्यवस्थापन यांचे संबंध सुरूवातीपासूनच अत्यंत जिव्हाळयाचे व सलोख्याचे आहेत.

**●सेवक कल्याण निधी ट्रस्ट :**

गिरणीमधील कामगारासाठी सेवक कल्याण निधी ट्रस्ट स्थापन करण्यात आला असून त्याद्वारे गरजू कामगारांना आजारपणासाठी व लग्नकार्यासाठी प्रंसंगी विना व्याज आर्थिक मदत करण्यात येते.

**●कामगार संघटना :**

सन- १९९५-९६ मध्ये शंकरराव मोहिते सहकारी सूत गिरणी कामगार संघटना लि. अकलूज (पिसेवाडी) स्थापन करण्यात आली आहे. या संघटनेचे व व्यवस्थापनाचे संबंध जिव्हाळयाचे व सलोख्याचे आहेत.

**●धार्मिक कार्य :**

गिरणीमधील सेवकांना धार्मिक दृष्टीकोनातून शंकर सूत गणेश मंडळाची स्थापना केली आहे. दरवर्षी गणपतीच्या मुर्तीची भाद्रपद महिन्यात प्रतिष्ठापना करण्यात येते. यामध्ये सर्व अधिकारी व कर्मचारी , कामगार भक्तीभावाने सहभागी होतात.

**●भागभांडवल :**

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, सूतगिरणीचे सन १९९३-९४ मध्ये ५७८२ सभासद, १९९४-९५ मध्ये ७१३४ सभासद, १९९५-९६ मध्ये ७६२६ सभासद, १९९७-९८ मध्ये ७६५६ सभासद, १९९९-२००० मध्ये ७६६० इतके सभासद होते. यावरुन असे लक्षात येते की, संस्थेच्या सभासद संख्येत प्रतिवर्षी भर पडत आहे व सभासद संख्या वाढत आहे.

तसेच १९९३-९४ मध्ये ९९.७८ लाख, सन १९९४-९५ मध्ये २७१.८८ लाख व १९९५-९६ मध्ये २२६.२९ लाख, १९९७-९८ मध्ये २२६.५३ लाख, १९९९-२००० मध्ये २२६.८१ लाख इतकी आहे. यावरुन असे लक्षात येते की, सूतगिरणीच्या सुरूवातीचे भागभांडवल ९९.७८ लाख होते. ते सन १९९९-२००० मध्ये २२६.८१ लाख इतकी झाली म्हणजे भागभांडवल वाढले आहे.

सहकारी संस्था सभासद संख्या सभासद संख्या सरासरी २४ इतकी स्थिर राहिली आहे. महाराष्ट्र शासनाचे भागभांडवल ३२४.१४ लाख इतके आहे.

**●तक्ता क्र. १२: कापूस खरेदी** [५]

| सन | १९९३-९४ | १९९४-९५ | १९९५-९६ | १९९८-९९ | ९९-२००० |
|---|---|---|---|---|---|
| कापूस गाठी | १५४९५ | १४११० | १२६५४ | १८४८६ | १११७१ |
| लाखात | ६५४.५० | १००३.९७ | ९६२.३३ | १३०२.८१ | ७१०.०५ |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९९३-९४ मध्ये संस्थेने १५४९५ एवढया कापसाच्या गाठी खरेदी केलेल्या असून त्याची किंमत ६५४.५० लाख इतकी होती. १९९४-९५ मध्ये १४१३० एवढया कापसाच्या गाठी खरेदी केल्या असून त्याची एकूण किंमत १००३.९७ लाख रुपये इतकी होती. सन १९९५-९६ मध्ये संस्थेने १२६५४ एवढया कापसाच्या गाठी खरेदी केलेल्या असून त्यांची एकूण किंमत ९६२.३३ लाख रुपये होती. सन १९९८-९९ मध्ये संस्थेने १८४८६ एवढया कापसाच्या गाठी खरेदी केलेल्या असून त्याची किंमत १३०२.८१ लाख रुपये इतकी होती. तर १९९९-२००० मध्ये संस्थेने १११७१ एवढया कापसाच्या गाठी खरेदी केलेल्या असून त्याची किंमत ७१०.५ लाख रुपये होती.

एकंदरीत वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, संस्थेची कापूस खरेदी मध्ये प्रत्येक वर्षी वाढ कमी जास्त झालेली आहे.

## ● शिवामृत दूध उत्पादक संघ मर्यादित विजयनगर-अकलूज :

**●प्रास्ताविक :**

माळशिरस तालुक्यामध्ये निरा भाटगरचे पाणी आणून शंकरराव मोहिते पाटील यानी हरीतक्रांती घडवून १९६० मध्ये साखर कारखान्याची उभारणी केली. त्यानंतर माळशिरस तालुक्यात धवलक्रांती घडवून आणण्याचा संकल्प केला. कारण पुर्वी तालुक्यामध्ये दुधाची गरज भागवण्याइतपत दूध उत्पादन होत नव्हते. म्हणून त्यांनी प्रत्येक शेतकऱ्याच्या घरोघरी जाऊन दुधाचे महत्त्व पटवूर दिले. इतर राज्यातील अधिक दुध उत्पादन देणाऱ्या संकरीत गाई आणून त्यांचे दुधाच्या क्षमतेचे प्रात्यक्षिके तालुक्यातील शेतकऱ्यांना दाखवून या गाई पाळण्यास प्रवृत्त केले. व तालुक्यातील दुग्धोत्पादन वाढवून धवलक्रांतीचा पाया रचला. दुधाचे उत्पादन वाढल्यामुळे स्थानिक गरज भागुन शेतकऱ्यांकडे दूध शिल्लक राहू लागले. या वाढीव दुधाची विल्हेवाट कशी लावावी, हा प्रश्न शेतकऱ्यांपुढे उभा राहिला. हे शिल्लक दूध टिकवण्यासाठी एखादी यंत्रणा असावी व या वाढीव दुधापासून शेतकऱ्यास आर्थिक उत्पन्न मिळावे म्हणून शंकरराव मोहिते पाटील यांनी २७/०१/१९७६ रोजी सहकारी तत्त्वावर 'शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ' स्थापन केला. व शेतकऱ्यांच्या दुग्धोत्पादनास चालना दिली.

**●स्थापना व उद्देश :**

माळशिरस तालुका स्वातंत्र्य पूर्व काळापासून महाराष्ट्रात दुष्काळी म्हणून सन १९६० पर्यंत ओळखण्यात येत होता. सन १९६० च्या सुमारास या माळरानावरती हरितक्रांती घडवून आणण्याचे स्वप्न साकार करण्याचा विचार सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांनी व्यक्त केला. यासाठी त्यांनी सहकार हे समाजसेवेचे व विकासाचे साधन समजून अनेक छोटया मोठया सहकारी संस्थाची स्थापना केली.

या सहकारी संस्थाच्या माध्यमातून अनेक व्यवसाय सुरू करण्यात आले. शहरी लोकांना मोठ्या प्रमाणावर दूधाची गरज असल्याने दूध उत्पादन ग्रामीण भागात सुरू करावे

त्यान्वये समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल अशा लोकांना व्यवसाय मिळून त्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये क्रांती घडवून आणण्याच्या उद्देशाने शंकरराव मोहिते-पाटील यांनी भारतीय कृषी औद्योगिक प्रतिष्ठान यांचे तांत्रिक मार्गदर्शनाखाली व त्यावेळच्या यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या सहकार्याने दूग्ध विकास व्यवसाच्या विविध योजना सुरु करण्यात आल्या. त्याचा परिणाम सन १९७३-७४ पासून सुमारे २००० ते३००० लिटर दूध उत्पादन होऊ लागले. या व्यवसायास  चालना मिळावी, परिसरातील दूग्ध व्यवसायाचा विकास व्हावा म्हणून मा. शंकरराव मोहिते-पाटील यांनी गोपाल क्षेत्रातील अग्रगण्य व 'भारतीय कृषी प्रतिष्ठान पूणे.' या संस्थेचे संस्थापक पद्‌मश्री, मणिभाई देसाई यांचे मार्गदर्शनाखाली दूग्धव्यवसायाचा अभ्यास केला. परिसरातील दूग्धोत्पादन वाढविण्यासाठी त्यांचेवर जास्त दूध देणाऱ्या परदेशी गायीच्या जातीच्या विर्यमात्रेचा संकर करुन दूग्धोत्पादन वाढविले.

शास्त्रोक्त पध्दतीने व नवीन तंत्राचा वापर करून दूग्धोत्पादन वाढविलेमुळे माळशिरस भागातील स्थानिक गरज भागून दूध शिल्लक राहू लागले. दूध नाशवंत असलेने शिल्लक दूध वाया जाऊन उत्पादकांचे आर्थिक नुकसान होऊ लागले. दूध उत्पादकांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी त्यांचे दूधाचे शहरी भागाकडे वितरण करणे अपरिहार्य होते. यासाठी स्वतंत्र्य संस्थेची आवश्यकता असलेने दि.२७ जानेवारी १९७६ रोजी "शिवामृत दूध उत्पादक संघ" या संघाची स्थापना केली.[६]

**●सभासद :**

शिवामृत दूध संघाचे कार्यक्षेत्र माळशिरस तालुक्यापुरते मर्यादित आहे. संघाने कार्यक्षेत्रामधील दूध उत्पादक शेतकऱ्यांना संघटित करुन गावागावामध्ये दूध उत्पादकांच्या सोयीनुसार वाडया, वस्त्यांवर सहकारी दूध व्यवसायिक संस्था स्थापन केलेल्या आहेत. या संस्थाना संघाने सभासदत्त्व दिलेले आहे. संघ स्थापनेपासून सभासद संस्थामध्ये १९७६ मध्ये २८ ते २०००-०१ मध्ये १७६ दूध उत्पादक संस्था आहेत. तर २० विकास संस्था, १ प्रक्रिया संस्था, ४ शासन व इतर संस्था असे एकूण २०१ सभासद आहेत.

तक्ता क्रः १३

**●दूध उत्पादक संस्था सभासद.**[७]

| वर्ष | दूध संस्था | विकास संस्था | प्रक्रिया संस्था | इतर | शासन | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १९७६-७७ | २८ | २० | १ | २ | - | ५१ |
| १९७७-७८ | २८ | २० | १ | २ | - | ५१ |
| १९७८-७९ | ३१ | २० | १ | २ | - | ५४ |
| १९७९-८० | ३५ | २० | १ | २ | - | ५८ |
| १९८०-८१ | ३६ | २० | १ | २ | १ | ६० |
| १९८१-८२ | ४० | २० | १ | २ | १ | ६४ |
| १९८२-८३ | ५३ | २० | १ | ३ | १ | ७८ |
| १९८३-८४ | ७२ | २० | १ | ३ | १ | ९७ |
| १९८४-८५ | ७७ | २० | १ | ३ | १ | १०२ |
| १९८५-८६ | ७९ | २० | १ | ३ | १ | १०४ |
| १९८६-८७ | १०० | २० | १ | ३ | १ | १२५ |
| १९८७-८८ | १०३ | २० | १ | ३ | १ | १२८ |
| १९८८-८९ | ११० | २० | १ | ३ | १ | १३५ |
| १९८९-९० | ११४ | २० | १ | ३ | १ | १३९ |
| १९९०-९१ | ११८ | २० | १ | ३ | १ | १४३ |
| १९९१-९२ | १३८ | २० | १ | ३ | १ | १६३ |
| १९९२-९३ | १५१ | २० | १ | ३ | १ | १७६ |
| १९९३-९४ | १५९ | २० | १ | ३ | १ | १८४ |
| १९९४-९५ | १६३ | २० | १ | ३ | १ | १८८ |
| १९९५-९६ | १७० | २० | १ | ३ | १ | १९५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १९९६-९७ | १७४ | २० | १ | ३ | १ | १९९ |
| १९९७-९८ | १७६ | २० | १ | ३ | १ | २०१ |
| १९९८-९९ | १७६ | २० | १ | ३ | १ | २०१ |
| १९९९-२००० | १७६ | २० | १ | ३ | १ | २०१ |

**●दूध संकलन :**

संघाचे कार्यक्षेत्र माळशिरस तालुक्यापुरते मर्यादित असल्याने तालुक्यातील सर्व गावामधुन, वाडया , वस्त्यावरुन प्राथमिक दुध व्यावसायिक सहकारी संस्था त्यांचे कार्यक्षेत्रातील दूध उत्पादक सभासदांकडून दूध संकलीत केले जाते. संकलीत केले दूध शितकरण केंद्रावर पोहोचविणेसाठी विजयसिंह मोहिते पाटील वाहतूक सहकारी संघाचे ४५ वाहनामधून भाडेपध्दतीने पोहोच केले जाते. सन- १९९२-९३ मध्ये १२१०५६ लिटर, सन १९९९-२००० मध्ये १,५१,७९२ लिटर, सन २०००-०१ मध्ये १,४९,५५२ लिटर दैनंदिन सरासरी दूध संकलित केले गेले.[९]

**●पशुखाद्य उत्पादन :**

दूध व्यवसायामध्ये संतुलित पशु आहाराची मागणी अनन्यसाधारण आहे. चांगल्या पशुआहारामुळे जनावरांची वाढ होते. त्याचप्रमाणे जनावरांचा भाकडकाळ कमी होतो. संकरित गायीपासून जास्तीत जास्त दूध उत्पादन मिळविणेसाठी त्यांना सकस, संतुलित योग्य प्रमाणात पशुआहाराचा पुरवठा होणे, आवश्यक होते. बाजारपेठेमध्ये उपलब्ध असणाऱ्या पशुआहाराच्या भरमसाठ वाढत्या किंमतीमुळे दूध उत्पादन खर्च वाढतो. व दूध उत्पादकाचे आर्थिक नुकसान होत होते. त्यामुळे संघाने विचार करून सन १९८२ साली, ८० मे. टन क्षमतेचा स्वतःचा सकस पशुखाद्य निर्मिती कारखाना उभारला आहे.[९]

या कारखान्यामध्ये तयार केलेले पशुखाद्य शेतकऱ्यांना वाजवी किंमतीमध्ये विजयसिंह मोहिते पाटील वाहतूक संघाचे भाडोत्री वाहनाद्वारे त्यांचे संस्थेवर पोहोच केले जाते. संघ उच्च दर्जाचे पशुखाद्य निर्माण करीत असल्याने व दुध उत्पादकांस उधारीवर

त्यांचे दूध संस्थेवर पोहोच पशुखाद्य दिले जात असल्याने सभासदांकडून शिवामृत पशुखाद्याची मागणी वाढत आहे. संघाचे कारखान्यामधून तयार होणारे पशुखाद्य अपुरे पडत आहे. त्यामुळे सांगली व पारे येथील पशुखाद्य कारखान्यामधून चांगले प्रतीचे पशुखाद्य तयार करुन घेऊन संघ त्याचा दूध उत्पादकांना पुरवठा करते.[९]

**●वैरण विस्तार कार्यक्रम :**

शिवामृत दूध संघाने दुभत्या जनावरांना बारमाही ओल्या वैरणीची गरज लक्षात घेऊन वैरण विस्तार कार्यक्रम राबविला आहे. याचा मुख्य उद्देश दूध उत्पादकांचे जनावरांना हिरवा चारा सतत वर्षभर उवलब्ध व्हावा. तसेच वाढत्या पशुखाद्याचा वापर थोडा कमी करुन आर्थिकदृष्टया हा व्यवसाय किफायतशीर व्हावा म्हणजे, दूध उत्पादकांचा खर्च कमी व्हावा या उद्देशाने चवळी, मका, बाजरी तसेच यशवंत गवत अशा अनेक हिरव्या चाऱ्याची पिके , घेण्यासाठी कृषी पदवीधरांच्या मार्गदर्शनाखाली प्रोत्साहन देण्यात येते.

**●पशुवैद्यकिय सेवा :**

संघाने दूध उत्पादकांचे जनावरांवर वेळेत कृत्रिमरित्या व औषधोपचार होणेसाठी स्वतंत्र्य पशवैद्यकिय सेवा विभाग सुरू केलेला आहे. संघाचा कार्यक्षेत्रातील दूध उत्पादकांना दूध उत्पादन खर्च कमीत कमी व्हावा व अधिकाधिक उत्पादन मिळावे व हा व्यवसाय शास्त्रपध्दतीने वाढीस लागावा यासाठी आवश्यकता सर्व माहिती पशुसेवा विभागामार्फत दिली जाते. संघाने या विभागामार्फत आपल्या कार्यक्षेत्रातील दूध उत्पादक सभासदांच्या गायी व म्हशी आजारी पडलेस त्यांना वेळच्या वेळी कमीत कमी खर्चात औषधोपचार मिळावा विविध आजारांपासून संरक्षण करणेसाठी, जनावर माजावर आलेस त्याचे वेळेत कृतिमरेतन होणेसाठी (संघाचे तज्ञ पशुवैद्यकिय अधिकारी) दूध उत्पादक सभासदास कमीत कमी आर्थिक व शारीरिक त्रास व्हावा यासाठी संघाचे तज्ञ पशुवैद्यकिय अधिकारी व कृत्रिमरेतन तंत्रज्ञ त्यांचे जनावरास गोठयावर जाऊन घरपोच पशुवैद्यकिय सेवा देतात. संघाने राबविलेल्या अशा प्रकारच्या कृत्रिमरेतन व औषधोपचार सेवेचा “राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड, आणंद (गुजरात)” या राष्ट्रीय पातळीवर कार्य करणाऱ्या संस्थेने प्रशंसा

करून कृत्रिमरेतन व औषधोपचार पध्दतीस “अकलुज पॅटर्न” हे नाव देऊन संघाचा राष्ट्रीय पातळीवर गौरव केलेला आहे. तसेच अकलूज पॅटर्न प्रमाणे सर्व संघानी पशुसेवा देणेसंबंधी अनुकरण करावे असे महासंघाने सुचविले आहे.

संघाने आपले कार्यक्षेत्राचे भौगोलिक विभाग पाडून या विभागामार्फत दूध उत्पादकांचे जनावरांना वेळेत कृत्रिमरेतन व औषधोपचार सेवा, पुरविण्यासाठी २४ कृत्रिमरेतन केंद्र व २१ औषधोपचार सेवा केंद्रे उभारलेली आहेत. संघाने चांगल्या जातीच्या संकरित गायींसाठी परदेशातून विर्य आयात करुन त्याचा पुरवठा दुध उत्पादकांच्या जनावरांना केला जात आहे. तज्ञ पशुवैद्यकिय अधिकारी, व तंत्रज्ञ यांच्यामार्फत कार्यक्षेत्रातील जनावरांना लाळ खुरकत सारख्या रोगाचे लसीकरण केंद्राद्वारे प्रतिवर्षी दोन वेळा केले जाते. तसेच जरुर त्या औषधांचा पुरवठा केला जातो.

सन १९९२-९३ मध्ये एकुण रेतन कॉल ६८२१० व औषधोपचार कॉल-३२६३५, लाळ खुरकत लसीकरण-३३४००, झाले आहे. सन १९९९-२००० मध्ये ६६४८३ जनावरांना कृत्रिमरेतन, व ५२६६० औषधोपचार कॉल करण्यात आले. सन २००० मध्ये ६३४४७ म्हशीवर कृत्रिमरेतन व ४८२५६ गायी व म्हशींवर औषधोपचार केले आहेत.

औषधोपचार केंद्रामार्फत तात्काळ घरपोच पशुवैद्यकिय सेवा उपलब्ध होणेसाठी संघाने या विभागामध्ये २० पशुवैद्यकिय अधिकारी, २६ कृत्रिमरेतन तज्ञ, २ पशुधन पर्यवेक्षक, १ व्हॅक्सीनेटर, ३६ असिस्टंट, १ लिपिक, १ कॉम्पुटर ऑपरेटर, १ ड्रायव्हर कम सहाय्यक ऑपरेटर अशा एकूण ८८ कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे.[१०]

**तक्ता क्र.१४**

**संघाचे कृत्रिम रेतन व औषधोपचार केंद्रे.**

| अ. नं. | कृत्रिमरेतन केंद्र | अ. नं. | औषधोपचार केंद्र |
|---|---|---|---|
| १. | शंकरनगर १ | १. | शंकरनगर १ |
| २. | शंकरनगर २ | २. | शंकरनगर २ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | अकलूज १ | ३. | अकलूज |
| ४. | अकलूज २ | ४. | वेळापूर १ |
| ५. | वेळापूर १ | ५. | वेळापूर २ |
| ६. | वेळापूर २ | ६. | तांदुळवाडी |
| ७. | सदाशिवनगर | ७. | सदाशिवनगर १ |
| ८. | तांदुळवाडी | ८. | सदाशिवनगर २ |
| ९. | सवतगाव | ९. | सवतगाव |
| १०. | दहिगाव | १०. | दहिगाव |
| ११. | पिलीव | ११. | पिलीव |
| १२. | नातेपुते | १२. | नातेपुते |
| १३. | लवंग २५/४ | १३. | लवंग २५/४ |
| १४. | श्रीपूर | १४. | शिंदेवाडी |
| १५. | फोंडशिरस | १५. | तोंडले |
| १६. | विजयनगर | १६. | ६१ फाटा (माळशिरस) |
| १७. | मोरोची | १७. | श्रीपूर |
| १८. | कण्हेर | १८. | खंडाळी |
| १९. | माळशिरस | १९. | फळवणी |
| २०. | फळवणी | २०. | मोरोची |
| २१. | शिंदेवाडी | २१. | फोंडशिरस |
| २२. | ६१ फाटा (माळशिरस) | | |
| २३. | खंडाळी | | |
| २४. | तोंडले | | |

वरिल सेवा पुरविण्यासाठी सन १९९९-२००० मध्ये संघाने ५१,१७,८३८.४२ रुपये एवढा खर्च केलेला आहे.[११]

● **औषधपुरवठा :**

शिवामृत संघाने आपल्या कार्यक्षेत्रातील सभासदांच्या जनावरांसाठी वेळचे वेळी औषधोपचार करणे आवश्यकत्येप्रमाणे औषध पुरवठा करण्यासाठी दोन स्वतंत्र्य औषध दुकाने सुरू केली आहेत. या दुकानामधून नामांकित कंपन्यांची औषधे माफक दरात दूध उत्पादक सभासदांना पुरविली जातात. लाळ खुरकत हा रोग संसर्गाने फोफावला जातो व त्यामुळे दूध उत्पादकांचे फार मोठया प्रमाणावर नुकसान होत असे. नुकसान होऊ नये म्हणून आपल्या भागातील असणाऱ्या सर्व प्रकारच्या जनावरांसाठी लाळ खूरकत प्रतिबंधक लस कार्यक्रम राबवत आहे. प्रत्यक्षात प्रत्येक जनावरास १३.४५ पैसे इतका खर्च असून त्यापैकी संघ प्रतिडोस ५.४५ पैसे इतके अनुदान देत असून जनावरांपाठीमागे प्रतिडोस रु.८ घेतले जातात.

सन १९९२-९३ मध्ये औषध दुकानामधून रुपये १८,१७,६०१.७४ पैसे औषधाची विक्री व लाळखुरकत लसीची विक्री रु.२,५५,१५०.८० एवढी झाली आहे. सन १९९९-२००० मध्ये २३,९५,०२७.८१ रुपयाची औषधे तर सन २०००-०१ मध्ये २४,९८,१७४.०६ रुपये औषधाची विक्री करण्यात आली.[१२]

● **मिल्को टेस्टर :**

संघ आपले कार्यक्षेत्रातील दूध उत्पादकांना त्याचे दूध गुणत्पतीप्रमाणे, त्यांना योग्य दर मिळावा म्हणून दुधाची योग्य प्रकारे तपासणी करण्यासाठी आधुनिक इलेक्ट्रॉनिक मिल्कोटेस्टर दुध व्यवसायिक संस्थांना पुरवत आहे. या मशीद्वारे दुधाची कमीत कमी वेळेत व अचूक गुणप्रत तपासली जाते. मिल्कोटेस्टरना अखंड विद्युतपुरवठा मिळणेसाठी संघाने मिल्कोटेस्टरबरोबर जनरेटर सेंटर व बेट यांचाही पुरवठा केला आहे. तसेच दूध संस्थांना संकलन व बिलिंगमध्ये अत्यंत उपयुक्त अशा संपुर्ण कॉम्प्युटराइज्ड दूध सचिव यंत्राचा पुरवठा केला आहे. सन १९९९-२००० मध्ये ३३१ संस्था मिल्कोटेस्टरचा वापर करीत होत्या.[१३]

● **विस्तार सेवा :**

नॅशनल डेव्हलपमेंट बोर्ड आणंद गुजरात यांचे धोरणानुसार दूध उत्पादकांनी पुरविलेल्या दुधाच्या गुणप्रतिप्रमाणे, त्यांना दर मिळणेसाठी शिवामृत संघाने वेगवेगळी गुणप्रतीप्रमाणे त्यांना दर मिळणेसाठी शिवामृत संघाने वेळोवेळी वेगवेगळया उपाययोजना राबविल्या आहेत. जास्तीत जास्त चांगल्या गुणप्रतीचे दुधाचा पुरवठा करणाऱ्या दूध संघांना प्रोत्साहित करण्यासाठी दरवर्षी संघ त्यांना बक्षिसे देऊन त्यांचा गौरव करतो. व उच्च गुणप्रतिचे दुग्धोत्पादन करण्यास प्रोत्साहित करीत असतो. विस्तारसेवा विभागामार्फत दूध संकलन वाढीसाठी कार्यक्षेत्रातील दूध संघाशी प्रत्यक्ष संपर्क साधून त्यांना येणाऱ्या अडचणी समजाऊन घेणे, त्यांचा सखोल अभ्यास करणे व त्यावर उपाययोजना करणे. दुधाची गुणप्रत सुधारण्यास प्रेरणा देणे. स्वच्छ दूध उत्पादन व गुणप्रत वाढ करणे, जनावरांना कृत्रिमरेतन व औषधोपचार करणे, संतुलित पशुआहारांचा वापर करणे व हिरवा चारा उत्पादन करणे, दुग्धोत्पादन वाढीसाठी गायी खरेदी करणे, शासकीय योजना व सवलतीचा दूध उत्पादकांना लाभ मिळवून देणे इत्यादी साठी संस्थापातळीवर दूध उत्पादकांशी प्रत्यक्ष संपर्क साधून त्यांना दुग्धोत्पादनामध्ये येणाऱ्या अडचणी वैयक्तिकरित्या, गटागटाने किंवा सभा, संमेलनाने व चर्चासत्रे आयोजित करून सोडविली जातात.

संघाचे विस्तार कार्यक्रमांतर्गत तालुक्यातील नातेपूते, मांडवे, माळशिरस, अकलूज, महाळूंग, वेळापूर असे सहा गट पाडून गट कर्मचाऱ्यांची नेमणूक करून त्यांचेकडून दूध उत्पादन वाढीसाठी चालना देणे. चारा, बियाणे, ठोंबे माहिती देणे, दूध संकलनासाठी लागणाऱ्या कॅन्सचे वाटप हिशोब, वापर  तसेच वर्ष पुरवठा, संकलन मार्गातील वाहनांच्या वेळा, डिस्पॅच नोंदी, दूधाची गुणप्रत त्याचबरोबर दुभत्या जनावरांचे शास्त्रीय पध्दतीने संगोपन, व्यवस्थापन इत्यादी बाबतची माहिती दूध उत्पादकांना पुरविली जाते.

● **प्रशिक्षण कार्यक्रम :**

शिवामृत दूध संघाने प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत संकलन सुपरवाझर्स व फिल्ड सुपरवायझर्स यांना राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड, वैकुंठभाई मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध

संस्था इत्यादी नामांकित संस्थांमध्ये प्रशिक्षणासाठी पाठविले जाते. त्यांचेकडून दूध उत्पादन सभासद, महिला सभासद, संस्थांचे संचालक संस्थेवर प्रत्यक्ष काम करणारे सचिव कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले जाते.

प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सन १९९९-२००० मध्ये पद्‌मजादेवी महिला दुध संस्था, पिंपरी, रत्नप्रभादेवी महिला दूध संस्था मानेवस्ती (खळवे) या संस्थांचे महिला सचिवांना सहकार प्रशिक्षण केंद्र कोल्हापूर येथे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच या संस्थांचे संचालकांना सहकार प्रशिक्षण केंद्र अहमदनगर येथे संस्थेचे व्यवस्थापनाबाबतचे प्रशिक्षण देण्यात आले. व्यक्ती विकास व दूध संस्था मजबुती करण्याबाबतचे प्रशिक्षणासाठी संघाचे संकलन सुपरवाझर व फिल्ड सुपरवाझर यांना नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड, आणंद (गुजरात) येथे पाठविण्यात आले होते. या प्रशिक्षण कर्मचाऱ्यांकडून पवनसुत माळखांबी, गिरजापती नातेपुते, नंदेश्वर लवंग, उद्यराज शेंडेचिंच या संस्थाचे संचालक मंडळ, सदस्य चेअरमन, सेक्रेटरी यांना संस्था मजबुतीकरण व व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षित करण्यात आले. संघाचे डेअरी विभाग, संकलन विभाग, पशुवैद्यकिय सेवा विभाग, व प्रयोगशाळा विभागाकडील कर्मचाऱ्यांना ॲक्युमेन मॅनेजमेंट सव्हिसेस पुणे. या संस्थेमार्फतच दूध उत्पादकांना स्वच्छ व निर्मळ संकलनाबाबत प्रशिक्षित करण्यात आले. [१४]

- **चॉपकटर योजना :**

दुभत्या जनावरांपासून जास्तीत जास्त दुग्धोत्पादन मिळविणेसाठी त्यांना ओल्या व सुक्या चाऱ्याचा योग्य प्रतीचा व योग्य प्रमाणात पुरवठा करणे, आवश्यक असते. जनावरांना योग्य प्रकारे चारा कापून खाण्यासाठी पुरविल्यास त्यांचे ते व्यवस्थित पचन करु शकतात. त्यामुळे दुग्धोत्पदनातही वाढ होते. चॉपकटरमुळे कमीत कमी वेळेत चाऱ्याचे लहान लहान तुकडे करता येतात. व त्यास शारिरीक कष्ट कमी लागतात. व चारा वाया जाण्याचे प्रमाण कमी होऊन त्यामध्ये ५० टक्के बचत होते. म्हणून संघाने सन २००० पर्यंत ४०२ चॉपकटर ३७,९९,१७७/- रुपये गुंतवणूक करून दूध उत्पादक संस्थांना

उधारीवर पुरविली आहेत. ही किंमत संस्थांचे सोयीनुसार दीड वर्षाच्या कालावधीत हप्त्याने वसूल केला जातो.[१५]

**बिजप्रक्रिया बी-बीयाणे पुरवठा :**

संघाने दूध उत्पादक सभासदांना आर्थिक लाभ मिळवून देण्याबरोबरच त्यांना त्यांचे शेतीउत्पादनातून आर्थिक लाभ मिळावा, या उद्देशाने संघाने स्वतंत्र्य बिजप्रक्रिया केंद्र शंकरराव मोहिते पाटील मार्केट यार्ड अकलूज येथे उभारलेले आहे. या केंद्रामार्फत शेतकऱ्यांनी उत्पादीत केलेल्या शेतीमालावर आवश्यक त्या प्रक्रिया करुन त्यांचे मालास बाजारपेठेमध्ये जास्तीत जास्त दर मिळवून दिला जातो. तसेच महाबीजसारख्या नामांकित बी-बीयाणे उत्पादन करणाऱ्या संस्थेचे बियाणांचे प्रात्यक्षिक प्लॉट शेतकऱ्यांच्या शेतामध्ये देऊन त्यापासून त्यांचा आर्थिक लाभ करुन दिला जातो.

शेतकऱ्याने त्यांचे शेतीमध्ये उच्च प्रतिचे बियाणांचा वापर करुन भरघोस उत्पादन घेण्यासाठी या पिकांना योग्य प्रमाणात योग्य त्या खतांची आवश्यकता असते. त्याचबरोबर योग्य किटकनाशकांची आवश्यकता असते. ही खते, व किटकनाशकांच्या किंमती जास्त असतात व योग्य वेळी किटकनाशकांचा वापर करणे हेही तेवढेच महत्त्वाचे असते. त्यासाठी संघाने स्वतंत्र्य बी-बीयाणे, औषधविक्री केंद्र सुरू केलेले आहे. या केंद्रामार्फत नामांकित कंपन्यांचे बी-बियाणे व औषधांचा शेतकऱ्यांना पुरवठा केला जातो. शेतकऱ्यांना पिकांचे उत्पादनाबाबत माहिती देण्यासाठी शेतीविषयक तज्ञ कामगारांची नेमणूक केलेली आहे. सन २००० मध्ये संघाचे बी-बियाणे औषधे विक्री दुकानामार्फत ८८,५६ ,०९६.८० रुपयांची बी-बियाणे व औषधोपचार खरेदी असून, त्यापैकी ९६,७३,८२५.८६ रुपयांची बी-बीयाणे व औषधांची विक्री केली आहे.[१६]

**●विजयनगर डेअरी प्रकल्प :**

शिवामृत दूध संघाने जास्तीत जास्त दुग्धोत्पदानासाठी राबविलेल्या नवनविन योजनामुळे संघाचे कार्यक्षेत्रातील दुग्धोत्पदनामध्ये वरचेवर वाढ होत गेली. त्यामुळे पुर्वीची एक लाख लिटर क्षमतेची डेअरी कमी पडू लागली. वाढत्या दुधाच्या प्रक्रियेची व्यवस्था न

झाल्यास दूध उत्पादकांचे मोठे नुकसान होणार असल्यामुळे या वाढी व दुधावर प्रक्रिया करण्यासाठी संघाने सन १९९९-२००० मध्ये ११ कोटी रुपयाची गुंतवणूक करुन नवीन अद्ययावत प्रशस्त डेअरीची उभारणी केली आहे. या डेअरीमध्ये देशात दूध व्यवसायात प्रथमच वापरण्यात आलेली व्हेपर ॲब्सोपर्शन सिस्टीमसारख्या आधुनिक तंत्राबरोबर चिज, घी, बटर इत्यादी पदार्थ उत्पादन व पॅकींगसाठी आवश्यक आधुनिक मशिनरींची उभारणी केलेली आहे. दूध व दुग्धजन्य पदार्थाचे गुणवत्तेची योग्य तपासणी होणेसाठी अद्यावत प्रयोगशाळा उभारली आहे. डेअरीमध्ये उत्पादीत होणाऱ्या दूध व दूग्धजन्य पदार्थांचे विक्री होईपर्यंतचे कालावधीत सुस्थीतीत राहणेसाठी १५,००० लिटर क्षमतेची कोल्डस्टोअरेजस उभारलेली आहेत. त्याचबरोबर खुल्या, वातावरणात ४५ दिवस टिकणाऱ्या दुधाच्या टेट्रापॅंकींगचे मशिनरीची उभारणी केलेली आहे.[१८]

**●कामकाज व कर्मचारी वर्ग :**

औद्योगिक क्षेत्रात कामगार हा महत्त्वाचा घटक असून उद्योगधंद्याचा विकास कामगारावर अवलंबुन असतो. त्याप्रमाणे संघाने कामगारास संस्थेचा केंद्रबिंदू मानला आहे. संघाकडील कर्मचारी व कामगार यांचे, संघाचे व्यवस्थापनासोबत अत्यंत सौहार्दपुर्ण हितसंबंध आहेत. कामगारवर्गास त्यांचे दैनंदिन कामकाजात येणाऱ्या अडचणी व प्रश्नांची सोडवणूक केली जाते. त्यामुळे कर्मचाऱ्यांना संघाबद्दल आत्मियता असल्यामुळे या भागात नेहमीच औद्योगिक शांतता राहिलेली आहे.

संघाचे सर्व विभागाकडील अधिकारी व सेवक वर्ग हे आपले काम अत्यंत जबाबदारीने व कर्तव्यदक्षतेने पार पाडीत आहेत. त्यामुळे संघाचे कामकाजात सुसूत्रता निर्माण झालेली आहे. संघास प्रगतीपथावर नेण्यासाठी कामगारांचा सिंहाचा वाटा आहे. संघाचे कर्मचारी वर्गाने संघास प्रगतीपथावर नेण्यासाठी १९९९-२००० मध्ये केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांना त्यांचे कामाचे बक्षिस म्हणून संचालक मंडळाने त्यांचे एकूण वार्षिक पगारावर ८.३३ टक्के बोनस दिला आहे. सन १९९२-९३ मध्ये कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट

कामगिरी बजावल्याबद्दल संचालक मंडळाने एकूण पगारावर २० टक्के बोनस व ५ टक्के सानुग्रह अनुदान दिले आहे.[१८]

**● दूध वितरण :**

**१) मुंबई दूध विक्री विभागः**

संघाने आपल्या शेतकऱ्यांना व शेतमजूरांना शेतीस दूग्ध व्यवसायाच्या माध्यमातून जोड व्यवसाय मिळावा आणि मुंबई, पुणे इत्यादी भागातील पैसा ग्रामीण भागात दुर्बल घटकापर्यंत मिळावा. या सहकार महर्षी यांच्या स्वप्नाचा पाठपुरावा करुन मा. आमदार विजयसिंह शंकरराव मोहिते पाटील यांचे कुशल मार्गदर्शनाखाली आपले संघाने दि. २६/०५/१९८८ पासून (नवी मुंबई) वाशी येथे भाडोत्री जागेमध्ये दूध पॅकिंग व वितरण व्यवस्था सुरू केलेली आहे.

आद्योगिक व व्यापाराची राजधानी असणाऱ्या मुंबई महानगरामध्ये महाराष्ट्र शासन इतर दुध संघ त्याचबरोबर खाजगी दूध डेअरी मार्फत दूध विक्री केली जाते. त्यांच्याबरोबर स्पर्धा करुन संघाने दूधाचा दर्जा उच्च ठेऊन मुंबईवासीयांना निर्मळ दुध वेळेत उपलब्ध करुन देण्यासाठी स्वतःच्या मालकीच्या उच्च तंत्रज्ञानाची अद्ययावत दूध डेअरीची उभारणी करुन मुंबईवासीयांना पॅकींग दूधाचा पुरवठा करीत आहे. सन १९९२-९३ मध्ये या विभागामार्फत २,०४,३७,१८५ लिटर गाईच्या दुधाची विक्री केली तर सन १९९९-२००० मध्ये ८६,६६,६५४ लिटर दूधाची विक्री केलेली आहे.

**२) पुणे दूध विक्री विभाग :**

संघाने मुंबई महानगर बरोबरच औद्योगिक, व्यवसायीक व शैक्षणिक क्षेत्रात प्रसिध्द असणऱ्या पुणे महानगरामध्ये दि.२८/०६/१९९३ रोजी पासून पॅकिंग दूधाची विक्री सुरू केलेली आहे. सन १९९९-२००० मध्ये या विभागांतर्गत ३२,१०,५३१ लिटर, सन २०००-०१ मध्ये ३५,७७,०५७ लिटर दूध विक्री केलेली आहे.

**३) लातूर दूध विक्री विभाग :**

संघाने मुंबई  पूणे बरोबरच लातूरमध्ये दि. २४/०४/१९९५ पासून रेफ्रीजरेशन व्हॅनमधून सुरुवातीस ५०० लिटर पॅकिंग दूध  विक्री पासून सुरुवात केली आहे. इतर स्थानिक दुधाबरोबर स्पर्धा करीत संघाने आपले दुध विक्रीमध्ये वाढ केली आहे. मुंबई, पुणे प्रमाणे लातूरवासीयांनाही निर्भेळ, सकस दुधाचा पुरवठा करण्याचे उद्देशाने संघाने ६/१२/१९९५ पासून लातूरमध्ये भाडोत्री दुध पॅकींग युनिटमध्ये दुधाचे पॅकींग करुन दुधाचा पुरवठा करीत आहे. सन १९९९ मध्ये १७,३१,८९६लिटर, २००० मध्ये ३६,७४,४१६ लिटर विक्री केली आहे.

वरील शहराशिवाय खामगाव, बुलढाणा, सोलापूर, गुलबर्गा या ठिकाणी दुध पुरवठा केला जातो. त्याचबरोबर बार्शी, कुर्डूवाडी, जेऊर, परांडा, टेंभूर्णी, करमाळा या स्थानिक ठिकाणी दुध विक्री करण्यात येते. तसेच शासनाच्या महानंद कुर्ला, वरळी, आरे, मिरज इत्यादी डेअऱ्यांना पुरवठा ३७  टॅकर्सद्वारे केला जातो.

**पुरस्कार :**

दुध उत्पादक सभासद त्याचबरोबर संघाकडील सर्व कर्मचारी वर्ग व अधिकारी वर्गाने सचोटीने प्रयत्न करुन संघास महाराष्ट्रामध्ये सर्वप्रथम एकत्रितरित्या आंतर्राष्ट्रीय दर्जाची निर्भेळ उच्च गुणप्रतिच्या दुधासाठी आय. एस. ओ. ९००२ व एच.ए. सी. सी. पी. प्रमाणपत्र त्याचबरोबर संघाचे डेअरीकडील हवा, ध्वनी, पाणी, इत्यादी बाबींमधील पर्यावरणास बाधा न येण्यासाठी केलेल्या प्रयत्नामुळे आय. एस. ओ. १४००१ ही प्रमाणपत्रे मिळालेली आहेत.[१९]

● **यशवंत सहकारी साखर कारखाना, यशवंतनगर-अकलूज.**

● **प्रास्ताविक :**

माळशिरस तालुक्यामध्ये सहकार चळवळीमध्ये यशवंत सहकार सहकारी साखर काखान्याचे महत्त्वाचे स्थान आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यास योग्य वाजवी मोबदला मिळावा. म्हणून कै. शंकरराव नारायणराव मोहिते पाटील यांनी २०/०६/१९६० मध्ये यशवंत सहकारी कारखान्याची स्थापना केली. कारखान्याचा रजि. नं. जी-२८० आहे. इंडस्ट्रियल लायसेन्स नं.-ता. १) नं.एल./२५/इन-३०/दि.०९/१२/१९६० २) एल./२५इन/२०२/६८/दि.२०/०८/१९६८ ३) आय. एल ४७ /७३दि.१०/१२/१९७३ ४) सी.आय.एल./१६/९७/दि.०७/०४/१९९७ अर्कशाळा परवाना क्र. डिस्टीलरी लायसेन्स फॉर्म आय.नं.२८ नुतनीकरण ता. २०/०५/२०००. ॲसिटीक ॲसिड परवाना क्र. वाय.आर./एम.एफ.जी.१/९२ ता०८/०१/१९९३. तारेचा पत्ता ‘यशवंत’ यशवंतनगर पो. यशवंतनगर-४१३११८. ता. माळशिरस जि. सोलापूर रेल्वेस्टेशन कुर्डुवाडी.[२०]

● **पेट्रोल पंप विभाग :**

कारखान्यास शाश्वत स्वरुपात ऊस पुरवठा होण्यासाठी ऊस वाहतूक यंत्रणा उत्तम प्रकारे चालावी, सभासदांच्या सोयीकरीता तालुका परिसरातील बँका, सहकारी संस्था व परिसरातील सर्व ग्राहकांना चांगल्या प्रकारे पेट्रोल, डिझेल, ऑइल मिळावे यादृष्टीने शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ लिमिटेड अकलूज यांच्या मालकीचा दि. २४/१०/१९८३ पासूल कारखान्याने हा पंप सुरु केला आहे. पेट्रोल, डिझेल विक्रीत वाढ झाल्यामुळे १९८९ मध्ये पेट्रोल साठविण्याकरीत १०,००० लिटर क्षमता व डिझेल साठवणुकीसाठी ३०,००० लिटर क्षमता असलेल्या टाक्या बसविण्यात आल्या. त्यानंतर १९९२ मध्ये पेट्रोल साठवण क्षमता १५,००० लिटर तर डिझेल साठवणूक क्षमता ४०,००० लिटर करण्यात आली. तसेच पेट्रोल व डिझेल वाहतुकीसाठी १२,००० लिटर क्षमता असणाने दोन टॅकर कार्यान्वीत करण्यात आले आहेत.

पेट्रोल व डिझेल पंप वाटपासाठी प्रत्येकी दहा असे दोन युनिट आहेत. या विभागातर्फे दैनंदिन पेट्रोल विक्री सरासरी ५.५ हजार लिटर व डिझेल विक्री सरासरी १३ ते १४ हजार लिटर होत आहे. हा पेट्रोल पंप विभाग विभाग आर्थिकदृष्ट्या किफायतशीरपणे चालत आहे. [२१]

- **सर्व्हिसिंग सेंटर :**

कारखान्यातर्फे पेट्रोल पंप विभागास पूरक धंदा या दृष्टीकोनातून वहनाचे देखभालीकरीता सर्व्हिसिंग युनिट कार्यरत आहे. या युनिटमुळे वाहन धारकांची वाहने माफक दरामध्ये सर्व्हिसिंग केली जातात. त्याचा फायदा वाहनधारकांना होत आहे. साधारणपणे माफक दरात सेवा सुविधा देऊन सामाजिक कार्याला हातभार हा विभाग करीत आहे.

- **विजय प्रिंटींग प्रेस :**

कारखान्यातर्फे संस्थेने समाजातील निराधार, गरीब, होतकरु महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सन १९६८ मध्ये विजय प्रिंटींग प्रेस चालू करण्यात आली. प्रिंटींग प्रेस विभागामध्ये गौरीशंकर महिला उद्योग सहकारी संस्थेच्या महिलांना प्रिंटींग, बाईडींग, कंपोझिंगची कामे दिली जातात. प्रिंटींग क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब होत असल्याने काळाच्या गरजेनुसार प्रेसमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानावर विकसित झालेली ऑफसेट व जलद गतीने होत आहेत. त्यामुळे कारखाना, प्रशासन विभागासाठी लागणारी फॉर्म, बुक, रजिस्टर इतर प्रकाशने त्वरीत व किफायतशीर दरात मिळत आहेत. या विभागामुळे प्रिंटींग क्षेत्रातील कुशल व्यक्तींना काम व आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत उपलब्ध झाला आहे.

- **कामगार कल्याण केंद्र :**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे संयोगाने कामगारांच्या शैक्षणिक, बौधिक शारीरिक व आर्थिक विकास साधण्यासाठी कारखान्याने सन १९८२ मध्ये "कामगार कल्याण केंद्र" स्थापन केले आहे. या केंद्रास कारखान्याने जागा इमारत, फर्निचर, कर्मचारीवर्ग व इतर सोयी उपलब्ध करुन दिले आहेत. या केंद्रातर्फे देशी विदेशी खेळाचे साहित्य वाचनालये,

यामध्ये दैनिक, वर्तमानपत्राखेरीज विविध विषयांची पुस्तके, वाचनालय, शिशुमंदीर तसेच अत्याधुनिक दुरदर्शन संचही बसवून देण्यात आले आहेत. महिलांसाठी शिवणकला वर्ग सुरु असून केंद्राकडे चार शिलाई मशीन आहेत. याखेरीज महिलांकरीता पूरक उद्योग, गृहउद्योग व इतर सांस्कृतिक, क्रिडा विषयक कार्यक्रम आखण्यात आले होते. तसेच कामगारांच्या मुलांकरीता बालक मंदीर चालविले जाते. कारखाना व कामगार यांचे संबंध अत्यंत खेळीमेळीचे व सलोख्याचे असल्याने कारखान्याचा कारभार कार्यक्षमपणे चालविला जातो. कामगारांना पहिल्या हंगामापासून आजतागायत कारखाना व्यवस्थापनाने २० टक्के बोनस दिलेला आहे. याशिवाय प्रा.फंड, फॅमिली पेन्शन, लिकंड, इन्शुरन्स स्कीम व ग्रुज्युटी स्कीम इत्यादींचा लाभ मिळत आहे.[२२]

- **मनोरंजन विभाग :**

कामगार कल्याण केंद्राचे नाट्यविभाग स्थापन केला आहे. या विभागातर्फे कामगारांच्या मधील सुप्त कलागुणांना संधी देण्यात येते. नाटयविभागाने कामगारांचे बसविलेले ‘मुंबईची माणसे’ या नाटकाचे प्रयोगास महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ मुंबई. यांचे विद्यमाने आयोजित केलेल्या ३२ व्या नागरी नाटयमहोत्सवामध्ये सोलापूर गटात द्वितीय क्रंमांक मिळविला होता. या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट अभिनयाचे प्रथम पारितोषिक व बक्षिस श्री. कमल अब्बास शेख यांना मिळाले. तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघाने आयोजित केलेल्या प्रथम नाटयमहोत्सवासाठी ही कामगार कलाकारांनी भाग घेतला व त्यामध्ये कु. कमल पालवे या महिला कलाकारास उत्कृष्ट अभिनयाचे पारितोषिक मिळाले.[२३]

- **सेवक कल्याण निधी ट्रस्ट :**

कारखान्यातर्फे कामगारांसाठी ‘सेवक कल्याण निधी ट्रस्ट’ स्थापन करण्यात आला असून त्याद्वारे गरजू कामगारांना आजारपणासाठी व लग्न कार्यासाठी आर्थिक मदत करण्यात येते. सन १९९७-९८ मध्ये ट्रस्ट तर्फे ८३ कामगारांना रु.२,६३,६००/- रुपये आजारपणाकरीता व १४९ कामगारांना लग्न कार्यासाठी १६,२१,०००/- रुपये आर्थिक मदत

देण्यात आली. सन १९९८-९९ मध्ये ७९ कामगारांना आजारपणाकरीता २,५९,१००/- रुपये व १८ कामगारांना लग्नकार्यासाठी २९,१४,०००/- आर्थिक मदत देण्यात आली.

- **शिवतीर्थ शॉपिंग सेंटर :**

कारखान्याचे संस्थापक सहकार महर्षी कै. शंकरराव मोहिते पाटील यांचे कारखान्याच्या मालकीचे सर्व सोयीने युक्त शॉपिंग सेंटर असावे तसेच परिसरातील व्यापाऱ्यांना, सुशिक्षित बेरोजगारांना व्यवसाय करण्यासाठी हक्कची जागा असावी, असे स्वप्न होते. ते पुर्ण करण्याच्या दृष्टीने शॉपिंग सेंटरची उभारणी केली आहे. पहिल्या टप्प्यात कारखाना रस्ता पूर्व बाजूस ७० गाळयाची बांधणी करुन गाळयांचे व्यावसायिकांना वाटप करण्यात आले आहेत. व्यावसायिकांचा वाढता प्रतिसाद मागणी, विचारात घेता दुसऱ्या योजनेमध्ये कारखाना रस्ता पश्चिमेकडील जागेत ४८ गाळे बांधून ते व्यावसायिकांना देण्यात आले. या शिस्तबध्द शॉपिंग सेंटरमुळे परिसरातील समाजमंदीराची, कामगारांची व ग्राहकांची चांगली मार्केट व्यवस्था निर्माण झाली आहे. गाळयाचे डिपॉझीट व मासिक शुल्क यामुळे कारखान्यास भांडवल व उत्पन्नामध्ये वाढ झाली आहे.

- **वृक्षरोपन व फळझाडे :**

कारखाना व्यवस्थापनाने पर्यावरणाचा समतोल राहावा, यासाठी वृक्षसंवर्धनाकडे लक्ष दिले आहे. कारखान्यामार्फत संभासदांच्या मागणीप्रमाणे डाळींब , नारळ, चिक्कु, बोरी, इत्यादी फळझाडांची रोपे व शोभेच्या, सावलीच्या झाडांची रोपे इतर ठिकाणच्या संशोधन केंद्रांकडूनआणून पुरविली जातात. कारखाना परिसरात ६८,००० निरनिराळया जातीची झाडे आहेत. याशिवाय यशवंतनगर येथील कारखाना परिसरात सुमारे ४५,००० सुबाभळीची झाडे आहेत. नवीन वृक्ष लागवडीसाठी कारखान्यातर्फे सातत्याने प्रयत्न चालू असतात. वृक्षरोपनाच्या राष्ट्रीय कार्यक्रमात सभासदांनी सक्रीय सहभाग नोंदविला होता. सन १९८२ मध्ये कारखान्यातर्फे ९११० फळझाडांची रोपे, पुरविली गेली.

सन १९९२-९३ मध्ये देहू, आळंदी, पंढरपूर या रस्त्यावर श्री. संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी मार्गावर कारखान्याचे विजयनगर शेती फार्मजवळ ३ कि.मी. अंतरावर

३०० खड्डे खोदून त्यामध्ये वड, पिंपळ, लिंब या जातीचे वृक्षारोपन केले असून वृक्ष संवर्धन होत आहे. त्या वृक्षामुळे पालखी महामार्गावरील वारकरी लोकांना व प्रवाशांच्या विसाव्यासाठी सावली उपलब्ध होत आहे.

- **विश्वस्थ संस्था :**

**अ) शंकरराव चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पीटल ट्रस्ट :**

दि.२०/०६/१९८५ रोजी शंकरराव मोहिते पाटील चॅरिटेबल हॉस्पीटल ट्रस्टची स्थापना करण्यात आली आहे. या हॉस्पीटलमुळे सर्व सामान्य जनता, कारखान्याचे सभासद, कामगार यांना सर्व प्रकारची वैद्यकिय सेवा माफक दरात ट्रस्टमार्फत उपलब्ध होणार आहे. आरोग्य व समाजस्वास्थ्य राखण्याच्या दृष्टीने ज्ञान प्रसारण करणे, कुटूंब कल्याण नियोजन करणे वगैरे प्रकारचे उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत. हॉस्पीटलसाठी आवश्यक असणारी जमीन रत्नाई विहार, शंकरनगर  अकलूज येथे खरेदी केली आहे. या ट्रस्टमार्फत अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेतलेला असून याकरीता शंकरराव मोहिते पाटील सहकारी सूत गिरणी मर्या. पिसेवाडीची जमीन खरेदी केली आहे. तसेच आभियांत्रिकी महाविद्यालय संलग्नीकरण करण्याकरीता अर्ज सोलापूर विद्यापीठाकडे सादर केलेला असून लवकरच महाविद्यालय कार्यान्वित होईल. या दृष्टीने पुढील कार्यवाही चालू आहे.

**ब) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील शेतकरी कल्याण निधी ट्रस्ट:**

या  ट्रस्टची स्थापना सन १९९५ मध्ये झाली. या ट्रस्टमार्फत कारखान्याच्या सभासदांना व त्यांच कुटूंबीयांना औषधोपचारासाठी आर्थिक मदत दिली जाते. ट्रस्टमार्फत सभासदांच्या  ऊस बिलातून जमा झालेल्या रकमेतून सन १९९४ ते २००९ पर्यंत २७८० सभासदांना १,५१,२४,०००/- रूपये इतकी आर्थिक मदत देऊ केली आहे.[२४]

- **कॉम्प्युटर विभाग :**

साखर  उद्योगातील संगणकीकरणाचे महत्त्व व त्यापासुन मिळणारे फायदे ग्राहय धरुन कारखान्यामध्ये कार्यालयीन विविध खात्यांचे कामकाजांमध्ये ई. आर. पी. या

अत्याधुनिक संगणक प्रणालीचा वापर करून सर्व विभाग संगणकामार्फत एकमेकास जोडून संगणकीकरण योजना ऑनलाईन पध्दतीने जोडण्यात आलेली आहे. यासाठी वसंतदादा शुगर इन्स्टिटयुट, मांजरी बु. पुणे. यांनी साखर कारखान्यास सर्वकष उपयुक्त अशी विकसित केलेली ईआरपी संगणक प्रणालीच्या वापरामुळे पुढील फायदे होत आहेत.

१) व्यवस्थापनास तत्पर माहिती उपलब्ध होऊन निर्णय घेणे सोयीचे झाले आहे. ज्या ज्या विभागात कामाच्या ठिकाणी संगणक बसविल्यामुळे सर्व कामकाज संगणकावर चालत असल्यामुळे कामे अचूक वेळेत होण्यास मदत होत आहे.

२) डुप्लीकेशन वर्क संपुर्णपणे कमी झालेमुळे स्टेशनरी व कर्मचारी खर्चात बचत होण्यास मदत झाली आहे.

३) सभासदांना विविध प्रकारची माहिती तात्काळ देणे सोयीचे झाले आहे.

४) कार्यालयीन कामकाज अचूक, सुबक व सुलभ होण्यासाठी मदत होत आहे.

५) विविध शासकिय कार्यालयातील माहिती व विवरण पत्रे वेळेत पाठविणे सोयीचे झाले आहे.

६) टाईम अटेंन्डन्स रेकॉर्डींग सिस्टीममुळे कर्मचारी दैनिक हजेरी घेणे सोयीचे झाले आहे.

७) डोअर लॉकिंग सिस्टीममुळे ऑफिस कामकाजात शिस्त व वक्तशिरपणा आला आहे.

८) इंटरनेट व ई-मेल सुविधांमुळे आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत चालू घडामोडी तसेच कारखाना १३५ पदार्थ संदर्भात माहिती घेण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. व सेवेचा कारखान्यास फायदा होत आहे.

९) कारखान्याची स्वतःची वेबसाईट तयार करुन इंटरनेटवर टाकलेली आहे. त्यामुळे सभासदांना करखान्याविषयी माहिती घबसल्या इंटरनेटच्या माध्यमातून मिळत आहे.[२५]

● **ऊस विकास योजना :**

सभासदाचे दर एकरी उत्पादनामध्ये वाढ व्हावी व कारखान्यात चांगल्या प्रतीचा ऊस उपलब्ध होऊन साखर उतारात वाढ व्हावी, ११९७ पासून ऊस विकास योजना राबविण्यात येत आहे. या योजनेस प्रोत्साहन मिळावे म्हणून ऊस विकास निधीतून अनुदान देण्यात येत आहे. सदर योजनेस सभासदाचा उत्तम प्रतिसाद मिळाल्याने दर एकरी उत्पादनामध्ये वाढ होऊन चांगल्या प्रतीचे ऊस उत्पादन होऊन कारखान्याचे सरासरी साखर वाढ झालेली आढळून आलेली आहे.

**तक्ता क्र. १५ : ऊस विकास योजना अ) जमीन सुधारणा :**

| अ.नं. | योजनेचे नाव | योजनेचा तपशिल | योजनेचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १) | हिरवळीचे खतासाठी ताग बी पुरवठा | जमिनीस सेंद्रीय खताचा पुरवठा होऊन जमीनीची सुपीकता वाढणेसाठी ताग बी देण्यात येणार येते. | ताग बी ५० टक्के अनुदान १५० टक्के उधारीने देण्यात येणार आहे. |
| २) | भूसुधारक पुरवठा | जमीनीची भौतिक सुपिकता वाढविणेसाठी फटर्हलेड देण्यात येते. | फर्टीलेड २५ऽ उधारीने देण्यात येणार आहे. |
| ३) | स्फुरद विरघळणारे जिवाणू खताचा पुरवठा | जमीनीतील अविद्राव्य स्थितील असणारा स्फुरद घटक विद्राव्य स्वरुपात करणेसाठी स्फुरद विरघळविणारे जीवाणू खताचा पुरवठा | जीवाणू खते ५०ऽ अनुदान व ५०ऽ उधार पुरविली जातात. |

**ब) रासायनिक खताचा पुरवठाः**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | लागवडपुर्व | कोसी ६७१ या जातीचे | रासायनिक खते |

| | | | |
|---|---|---|---|
| | डोसाकरीता खताचा पुरवठा | ऊस लागवड धोरणाप्रमाणे लागवड व ऊस खोडवा क्षेत्रास, प्रतीएकरी ४ पोती १०.१०.२६ प २ पोती सिंगल सुपर फॉस्फेट मात्र लागणपुर्व खताबरोबर स्फुरद विरघळणारी जिवाणू खते सक्तीने देण्यात येणार आहेत. | उधारीने देण्यात येणार आहेत. त्यावर व्याज आकारण्यात येणार आहे. |
| २) | सूक्ष्म अन्न घटक द्रव्ययुक्त खताचा पुरवठा | ऊस विकास नत्र, स्फुरद, पालाश या मुख्य अन्नघटकाव्यतिरिक्त लोह, जस्त, तांबे, बेरॉन, मॉलीबडेनम, मॅगनीज, या सूक्ष्म अन्न घटकांचा पुरवठा होण्यासाठी सूक्ष्म अन्न घटकद्रव्ये देण्यात येणार आहेत. तसेच ज्या जमिनीमध्ये जस्त लोह या घटकांचे प्रमाण कमी आहे अशा जमिनीतील ऊस पिवळा पडू नये म्हणून सल्फेट व फोरस सल्फेट देण्यात येणार आहे. | सदरची खते २५ टक्के अनुदान व २५ टक्के उधारीने देण्यात येणार येतात. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३) | गंधक खत पुरवठा | काही जमिनीमध्ये गंधक या घटकाची कमतरता आहे. तो घटक ऊसास उपलब्ध होण्यासाठी गंधक खताचा पुरवठा करणे. | सदरचे खत २५ टक्के अनुदान व ७५ टक्के उधारीने देण्यात येते. |

क) ऊस बेणे योजना :

| | | | |
|---|---|---|---|
| १) | त्रिस्तरीय बेणे योजनेतून बेणे पुरवठा | त्रिस्तरीय बेणे योजनेतून सभासदांना चांगल्या प्रतीची निरोगी ऊस बेणे पुरविण्यात येते. | ऊस बेणे उधारीने देण्यात येतात. |

ड) पिक संरक्षण :

| | | | |
|---|---|---|---|
| १) | किटक नाशकांचा पुरवठा | ऊसावर येणाऱ्या खोडकिडा, कांडीकिडा, शेंडे आळी, वाळवी, हुमणी या किडीचा बंदोवस्त करण्यासाठी रासायनिक किटकनाशकांचा पुरवठा करण्यात येतो. तसेच जैविक किड नियंत्रणासाठी टायकोग्रामा या परोपजीवी किटकाची अंडी पुरविणे. | किटकनाशके ५० टक्के अनुदान व ५० टक्के उधारीने देण्यात येतात. |

इ)पाणी व्यवस्थापन :

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ठिंबक जलसिंचन | उपलब्ध पाण्यामध्ये जास्तीत जास्त क्षेत्र | प्रति एकर २८०००/- प्रमाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ओलीताखाली येऊन चांगल्या प्रतीचा ऊस उपलब्ध होण्यासाठी प्रत्येक सभासदास जास्तीत जास्त ५ एकरांपर्यंत अनुदान देण्यात येते. | अनुदान देण्यात येते व उर्वरित खर्च सभासदांनी करणे. तणनाशके २५ टक्के अनुदान व ७५ टक्के रक्कम रोख देऊन देण्यात येतात. |

अशाप्रकारे ऊस विकास योजनेची माहिती आहे.[२६]

● **उपपदार्थ :**

**१) डिस्टीलरी :**

मळीपासून अल्कोहोल निर्मिती करण्यासाठी कारखान्याने १९८४ मध्ये 'यशवंत डिस्टीलरी' ची उभारणी केली. या डिस्टीलरीची दैनिक उत्पादन क्षमता ३०००० हजार लिटर क्षमतेच्या बायोस्टील डिस्टीलरी प्रकल्प उभारला आहे. त्यामुळे डिस्टीलरीची दैनिक उत्पादन क्षमता ६००००लिटर एवढी आहे. या प्रकल्पासाठी २१५ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत.

**२) ॲसिटीक ॲसिड :**

कारखान्याने प्रतिवर्षी ६००० मे. टन क्षमतेचा ॲसिटीक ॲसिड निर्मितीचा प्रकल्प १६/०८/१९९३ मध्ये उभारला आहे. त्या प्रकल्पातील उत्पादनः- **तक्ता क्र.१६**

| अ.नं. | सन | ग्लॅशियल ॲसिटीक ॲसिड | ॲसिड सल्फाईड | डायहयुट ॲसिड |
|---|---|---|---|---|
| १) | १९९३ | | | २७० टन |
| २) | १९९४ | ५८८० मे. टन | | ५८६ मे टन |
| ३) | १९९७ | ८३२० मे. टन | ६८१२ | ६३५ मे टन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४) | १९९९ | ८२९७ मे. टन | ६७९३ | ६०४ मे टन |
| ५) | २००० | ७९५३ मे. टन | ६४०७ | ६६६ मे टन |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, १९९३ मध्ये ॲसिटीक ॲसिड प्रकल्पातर्फे २७० मे. टन डायहयुट ॲसिड उत्पादन झाले. १९९४ मध्ये ग्लॅशिअल ॲसिटीक ॲसिड ५८६४ मे. टन डायहयुट ॲसिड ५८६ मे. टन झाले. सन १९९८ मध्ये ग्लॉसिअल ॲसिड ८३२० मे. टन, डायहयुट ॲसिड ६३५ मे. टन, व ॲसिटाईड ६८१२मे. टन उत्पादित झाले. सन १९९९ ग्लॅशिअल ॲसिड ८२९७ मे. टन., ॲसिटाईड ६७९३ मे. टन, हायटयुट ॲसिड ६०४ मे. टन झाले. सन २००० मध्ये ग्लॉशिअल ॲसिड ७९५३ मे. टन ॲसिटाईड ६४०७, डायहयुट ॲसिड ६६६ मे. टन झाले.[२७]

**३) सायलेंन्ट स्पिरीट :**

कारखान्याने सन १९९२-९३ मध्ये सायलेंन्ट स्पिरीट या प्रकल्पाची उभारणी केलेली आहे. सन १९९८ मध्ये ११५८७.४ लिटर सायलेन्ट स्पिरीटचे उत्पादन करण्यात आले. सन २००० पर्यंत मागणी अभावी सायलेंन्ट स्पिरीटचे उत्पादन करण्यात आले नाही.[२८]

**४) मिथेन गॅस :**

महाराष्ट्र शासनाने पोल्युशन बोर्डाचे आदेशान्वये पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने मिथेन गॅस प्रकल्पाची उभारणी केली असून प्रत्यक्ष गॅस निर्मिती होत आहे. सदर गॅस बॉयलर मध्ये जाळला जात असून त्या पासून स्टीम उत्पादन होत आहे. तसेच प्रक्रियेनंतर घाण पाण्याचा बी ओ डी कमी करून त्या एक लिटर पाण्यामध्ये २० लिटर चांगले पाणी मिसळून सदरचे पाणी खंडाळी, वेळापूर परिसरातील शेतकऱ्यांचे शेतीला वापरण्यात येते.

**●सभासद विमा योजना :**

कारखान्याच्या सर्व सभासदांच्या हिताचे दृष्टीने १८० टक्के या अत्यल्प वर्गणीमध्ये युनायटेड इंडीया इन्शुरन्स कंपनीकडून ५ वर्षे मुदतीची १ लाख रकमेची जनता वैयक्तीक अपघात विमा पॉलिसी सर्व सभासदांची काढण्यात येते. सदर अपघात विमा पॉलिसी अंतर्गत सर्पदंश, खून, विषबाधा, नैसर्गिक आपत्ती इत्यादीने कोणताही अपघात झाला तर

रुपये १ लाख विमा कंपनीकडून मिळतात. अपघाताने शरीराच्या कोणत्याही दोन अवयवांपैकी एक अवयव कायमचा निकामी झाल्यास विमा रकमेच्या ५० टक्के म्हणजे ५०,०००/-रूपये विमा कंमनीकडून मिळतात. त्यामुळे सभासदांच्या अचानक अपघाती निधनामुळे त्याच्या मागे असलेल्या कुटूंबियांना चांगल्या प्रकारचे आर्थिक सहाय्य मिळत आहे.[२९]

**●कार्यक्षेत्र :**

कारखान्याचे कार्यक्षेत्र सोलापूर जिल्हयातील माळशिरस, माढा, मोहोळ, करमाळा, पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा या तालुक्यातील १६९ गावे व पुणे जिल्हयातील इंदापूर तालुक्यातील ३५ गावे अशा एकूण २०४ गावाचा समावेश आहे.[३०]

**● कामगार विमा योजना :**

कारखान्याचे सर्व कामगारांसाठी सेवक कल्याण निधी ट्रस्टच्या वतीने सुमित्रा नागरी सहकारी पतसंस्थेकडे सुरक्षा ठेव योजने अंतर्गत रुपये ५०,०००/- ची विमा पॉलिसी प्रत्येक वर्षी काढण्यात येते. तसेच अत्यल्प रुपये ८४.५० वर्गणीमध्ये युनायटेड इंडीया इन्शुरन्स कंपनीकडून "जनता वैयक्तीक अपघात विमा पॉलीसी" रु. १ लाख रकमेची १ वर्षासाठी काढण्यात येते. सदर विमा पॉलिसी अंतर्गत सर्पदंश, खून, विषबाधा, नैसर्गिक आपत्ती इत्यादी अपघात झाला तर सुमित्रा पतसंस्थेकडून उतरविलेल्या विम्याचे रुपये ५०,०००/- व युनायटेड युन्शिरन्स कंपनीकडून १ लाख रुपये मिळू शकतात. अपघाताने शरीराच्या कोणत्याही दोन अवयवांपैकी एक अवयव कायमचा निकामी झाल्यास रकमेच्या ५० टक्के रक्कम कंपनीकडून मिळू शकते. विमा पॉलिसी दि. ०५/०५/१९८२ रोजी सदर विम्यानंतर कारखान्याचे कामगार राजाराम नारायण थोरात यांचे टॅक्टर अपघातामध्ये निधन झाले. त्यांच्या विम्याची रक्क्म रुपये १.५० लाख चेकद्वारे दि. ०४/०६/१९९९ रोजी युनायटेड कंपनीने मा. श्री. जयसिंह मोहिते पाटील संचालक यांचे हस्ते मयत कामगारांच्या पत्नी श्रीमती संगीता राजाराम थोरात यांना देण्यात आली. अशाप्रकारे कामगाराच्या अपघाती निधनानंतर त्यांचे कुटूंबियांना चांगल्या प्रकारचे आर्थिक सहाय्य मिळत आहे.

**तक्ता क्र.१७ : ● प्रतिटन ऊसाला दिलेला दरः**

| सन | दर (प्रति टन) |
|---|---|
| १९८०-८१ | २५५ |
| १९८१-८२ | २१७.५० |
| १९८२-८३ | २०६ |
| १९८३-८४ | २३२ |
| १९८४-८५ | २९३ |
| १९८५-८६ | ३१२ |
| १९८६-८७ | ३०७ |
| १९८७-८८ | ३२९ |
| १९८८-८९ | ३५६ |
| १९८९-९० | ४३४ |
| १९९०-९१ | ३९२ |
| १९९१-९२ | ३९५ |
| १९९२-९३ | ५२४ |
| १९९३-९४ | ७४५ |
| १९९४-९५ | ७४८ |
| १९९५-९६ | ५९१ |
| १९९६-९७ | ६८१ |
| १९९७-९८ | ८१० |
| १९९८-९९ | ७८५ |
| १९९९-२००० | १००१ |

यावरुन असे दिसून येते की, कारखान्याने ऊस उत्पादकांच्या ऊसास जास्तीत जास्त दर देऊन ऊस शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावण्याचा प्रयत्न केला आहे.१९८०-८१ मध्ये ऊसाचा दर २५५ इतका दिलेला होता. तो. १९९९-२००० मध्ये १००१ इतका दिला. यावरून असे लक्षात येते की, कारखान्याने प्रत्येकवर्षी ऊस दरामध्ये वाढ केली. याचा फायदा ऊस उत्पादक सभासदांना आपला आर्थिक स्तर उंचावण्यासाठी झाला.

● **सभासद साखर वाटप :**

कारखान्यांचे सभासदांना कार्डवर कारखान्यातर्फे प्रमिमहिन्यास ५ किलो प्रमाणे रेशन दरात साखर वाटप करण्यात येते. त्यामुळे सभासदांना घरगुती वापरासाठी लागणारी साखरेची गरज कमी किंमतीत भागली जाते.[३१]

● **जमिन लेव्हलिंग :**

सभासदांच्या जमिनी लेव्हलिंग करण्यासाठी कारखान्या दोन बुलडोझर्स खरेदी केलेले आहेत. तसेच कारखान्याने बोअरींग मशिन खरेदी केली आहे. त्या मशिनद्वारे सभासदांना कमी दरात बोअर करुन दिले जाते.

● **सेमिनार :**

सभासदांना ऊस उत्पादनासंबंधी शास्त्रोक्त पध्दतीने ज्ञान प्राप्त व्हावे. म्हणून कारखान्यातर्फे तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली विविध गावी सेमिनार घेण्यात येतात.

● **सभासद सहली :**

सभासदांना शेतीविषयक ज्ञानात भर पडावी या हेतूने विविध ठिकाणी सहली आयोजित करण्यात येतात. श्रीगोंदा, राहुरी, संजिवनी, निफाड, शेतकरी(सांगली), दत्त, वारणा, सह्याद्री साखरकारखाना नियमीतपणे सहलींच्या माध्यमातून भेट देण्यात येते. राहूरी कृषी विद्यापीठ, पुणे शेतकी कॉलेज, पाडेगाव ऊस संशोधन केंद्र, उरळी कांचन याठिकाणी भेट देण्यात येते.

● **बंधारे योजना :**

कारखाना कार्यक्षेत्रातील ओढे, नदी, नाले, यावर शासनाच्या सहाय्याने गिरझणी, निमगाव याठिकाणी बंधारे बांधण्यात आले आहेत. तसेच निरा नदीवर कोल्हापूर पध्दतीचे बंधारे

● **स्त्रिया व मुलांसाठी :**

कारखान्यातर्फे महिलांसाठी शिवणकला प्रिटींग प्रेस इ. व्यवसायाचे मार्गदर्शन करणारे प्रशिक्षित वर्ग चालविले जातात. तसेच बालकमंदीर वर्ग सुरू असून मुलांना शिक्षित केले जाते.

● **पिण्याचे पाणी पुरवठा :**

कारखाना परिसरातील नागरिकांसाठी पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी कारखान्याचे बोअरिंग मशिनद्वारे कुपनलिका घेऊन सोय केली जाते.

● **संपर्क दौरा :**

कारखान्याचे कार्यक्षेत्रातील निरनिराळया गावी कारखान्याचे संचालक व अधिकारी वर्ग भेटी देतात. त्या भागातील लोकांच्या रस्ते, वीजपुरवठा, शेतीवाडीसाठी पाणी योजना, पिण्याचे पाणी योजना वगैरे अडी अडचणीबाबत माहिती घेऊन त्या सोडविण्याबाबत कारखाना पातळीवर प्रयत्न केले जातात.

● **अल्पबचत गुंतवणूक :**

शासनाने राष्ट्राचे सर्वांगीण हितासाठी केलेल्या आवाहनास अनुसरून कारखान्याने सभासदांचे ऊस बीलातून अल्पबचत गुंतवणूकीत एकूण रक्कम रूपये ३२.५० लाख गुंतविली आहे.

● **कामगार सोयी सुविधा :**

कामगार व सभासदांच्या कुटूंबीयांसाठी अल्प मोबदल्यामध्ये कारखान्यातर्फे औषधोपचाराची सोय करण्यात आली आहे. तसेच कामगारांनी सुरू केलेल्या पतसंस्थेमार्फत कर्जपुरवठा, धान्य, किराणासामान, कापड वगैरे देण्याची सोय केली.

**●कारखान्याच्या योजना :**

कारखान्याचे सभासद, कार्यकर्ते यांना विश्वासात घेऊन त्यांच्या सहकार्याने सहकार महर्षीनी कारखान्याच्या पहिल्या वर्षापासून प्रतिवर्षास एक विकास योजना राबविली. त्या योजनेद्वारे सभासदांना जोडधंदे मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. कारखान्याच्या विविध योजना पुढीलप्रमाणे,

**तक्ता क्र. १८ : वाटचाल**

| वर्ष | योजनेचे नाव |
|---|---|
| १९६४ | ट्रक्स व ट्रॅक्टर वाहतूक योजना, कामगरांची सहकारी पतसंस्था |
| १९६५ | राजहंस सहकारी कुक्कुटपालन संघ टेक्निकल हायस्कूल |
| १९६६ | आर्टस, सायन्स व कॉमर्स कॉलेज बेरडवाडी, सहकारी लिफ्ट इरिगेशन योजना. |
| १९६७ | श्री. शंकर सहकारी साखर कारखाना लि. सदाशिवनगर. |
| १९६८ | यशवंत सहकारी साखर कारखाना लि. शंकरनगर, अकलूज. १७५० मे. टन विस्तारवाढ विजय प्रिटींग प्रेस. |
| १९६९ | जवाहर को ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मेकॅनिकल वर्कशॉप, विजय गणेशोत्सव मंडळ ट्रस्ट. |
| १९७० | संकरित गो पैदास केंद्र, दूध योजना कामधेनू दूध प्रकल्प, नवीन आदर्श कार्यालयीन इमारत. |
| १९७१ | १) शुगर अनलोडर.<br>२) भू सर्वेक्षण लॅबोरेटरी.<br>३) श्री. शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट. |
| १९७२ | १) श्री. शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट.<br>२) दूध संकलन केंद्र.<br>३) दुष्काळग्रस्तांसाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा. |

| | |
|---|---|
| १९७३ | १) सामुदायिक विहिर.<br>२) दुष्काळग्रस्तांचे जनावरांना बॅगोमॉलॅसेस पुरवठा.<br>३) यशवंत सहकारी साखर कारखाना लि. शंकरनगर अकलूजची २००० मे. टन विस्तारवाढ.<br>४) उन्हाळयाचे कालावधीत निरा नदीवर बंधारे उभारून पाणी सिंचन योजना.<br>५) गिरीजा सहकारी दूध उत्पादक व्यावसायिक संस्था मर्या. शंकरनगर. |
| १९७४ | १) सिमेंट पाईप फॅक्टरी.<br>२) डिस्को लॅड.<br>३) तलाव व विहीरीमध्ये मत्य उद्योग योजना. |
| १९७५ | १) शेतकरी सहकारी बँक.<br>२) शिवपार्वती मंदीर जिर्णोध्दार.<br>३) गोबर गॅस प्लॅन्ट.<br>४) ग्रीन फिंगर रेसिडेंसियल स्कुल.<br>५) पायलट व पॅरलल गहू योजना. |
| १९७६ | १) शिवामृत दूध उत्पादक सह संघ मर्या.अकलूज.<br>२) दूध संकलन सोसायटी स्थापना.<br>३) गौरीशंकर महिला उद्योग सह. संस्था मर्यादित शंकरनगर, अकलूज.<br>४) पायलट ज्वारी योजना.<br>५) भूमीहिनांना घरकुले वाटप. |
| १९७७ | घरटी गाय योजना तांदुळवाडी. |
| १९७८ | १) यशवंत सहकारी साखर कारखाना लि. शंकरनगर, |

| | |
|---|---|
| | अकलूजचा ३००० मे. टन विस्तार वाढ.<br>२) शिवपार्वती बाल वाद्यवृंद. |
| १९७९ | यशवंत कामगार पतसंस्थेचे शिवकृपा भांडार. |
| १९८० | शंकरराव मोहिते सहकारी सूत गिरणी लि. अकलूज. |
| १९८१ | शंकरराव मोहिते पाटील इंग्लीश स्कूल |
| १९८२ | शंकरराव मोहिते पाटील औद्योगिक वसाहत. |
| १९८३ | कामगार कल्याण केंद्र. |
| १९८४ | प्रतिदिन ३०००० लिटर्स क्षमतेची डिस्टीलरी |
| १९८५ | शिवामृत फलोत्पादन सहाकारी संस्था लि. अकलूज. |
| १९८६ | विजय सहकारी कुक्कूट पालन संघ लि. विजयनगर |

अशाप्रकारे साखर कारखान्याने विविध योजना अंमलात आणून सहकारी चळवळीची विकासाची घोडदौड चालु ठेवलेली आहे. [३२]

● **गांडूळ शेती :**

वारंवार त्याच त्या जमिनीमध्ये उसाचे पिक घेतल्यामुळे व रासायनिक खते व पाण्याचा सतत वापर केल्याने जमीनीचा पोत कमी होतो. त्यासाठी सेंद्रीय खतांचा वापर केल्याशिवाय पर्याय नाही. परंतु सेंद्रीय खते उपलब्ध हात नाहीत म्हणून जमीनीचा पोत सुधारण्यासाठी व अन्नद्रव्ये पिकास उपलब्ध होण्यासाठी गांडूळ शेती योजना कारन्यातर्फे प्रायोगिक तत्वावर विजयनगर फार्मवर चालू करण्यात आली आहे.[३३]

● **कामगार मदत :**

कामगारांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांना यथाशक्ती मदत करण्याचे धोरण संचालक मंडळाचे आहे. त्यामुळे अत्यंत कार्यक्षमपणे कारखान्याचा कारभार चालविला जातो. कारखाना परिसरामध्ये कामगार व अधिकारी वर्गांना निवासासाठी सर्व सोयींनीयुक्त अशी घरजागा सवलतीमध्ये देण्यात आली आहे. तसेच संस्थेने पहिल्या हंगामापासून २० टक्के कामगारांना सातत्याने वाटला आहे. याशिवाय प्रॉव्हीडंड फंड, ग्रॅज्यूटी, फॅमिली पेन्शन

इत्यादी योजनाही कार्यान्वित आहेत. कामगार व सभासदांच्या कुटुंबियांसाठी अल्प मोबदल्यामध्ये औषधोपचाराची सोय करण्यात आली आहे. तसेच कामगारांनी सुरू केलेल्या पतसंस्थेमार्फत कर्जपुरवठा, धान्य, किराणा सामान, कापड वगैरे देण्याची सोय केली आहे. तसेच कामगार गायी योजनाही चालू आहे. स्वयंचलित वाहने कामगारांना बँकेमार्फत दिली गेली आहे. [३४]

**● मागासवर्गिय अल्पभुधारक शेतकरी यांना कारखान्याचे शेअर्स खरेदीसाठी शासकीय कर्ज व अनुदान देण्याची योजनाः**

शासनाने ही योजना १९८५-८६ पासून सुरु केलीअसून या योजनेद्यारे मागासवर्गीय शेतकऱ्यांना प्रत्येकी एक शेअर उत्पादक सभासद होण्यासाठी ५० टक्के बिनव्याजी कर्ज १५० अनुदान देण्यात येते. या योजनेनुसार १९८५-८६ मध्ये कारखान्याने १५ शेतकऱ्यांना १५ शेअर्ससाठी रुपये ७५०/- अनुदानाची रक्कम व रुपये ३,७५०/- बिनव्याजी कर्जाची रक्कमेतून सभासदत्व देण्यात आले आहे.

**● मागासवर्गीय अल्पभूधारकांना उस लागवडीखाली अनुदान-**

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेली मागासवर्गीय अल्पभूधारकांना उस उत्पादनासाठी अनुदान योजना कारखान्यामार्फत १९८१-८२ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेतून सन १९८१-८२ ते १९८५-८६ अखेर खालीलप्रमाणे ऊस लागवडीसाठी शासकीय अनुदानाचे वाटप करण्यात आले.

**तक्ता क्र. १९ : मागासवर्गीय अनुदान योजना :**

| सन | शेतकरी संख्या | वाटप केलेले अनुदान रक्कम | ऊस क्षेत्र (एकरी) |
|---|---|---|---|
| १९८१-८२ | १११ | २,३३,४३७.५० | १०३.३० |
| १९८२-८३ | १५७ | २,३४,३०६.२५ | १३०.२५ |
| १९८३-८४ | १५२ | १,८९,९५०.०० | १२३.०० |
| १९८४-८५ | १३१ | १,१७,०२५.०० | १०७.२० |

| | | | |
|---|---|---|---|
| १९८५-८६ | १३० | ७१,१२५.०० | ८४.०५ |

अशाप्रकारे मागासवर्गीयांना देखील सहकार सामाऊन घेतलेले आहे. [३५]

● **राज्यस्तरीय गुलाब व सर्व पुष्पप्रदर्शनः**

दि.१७/१२/१९९० ते१९/१२/१९९० या कालावधीमध्ये रोझ क्लब सोलापूर यांनी भरविलेल्या राज्यस्तरीय गुलाब व सर्व पुष्प प्रदर्शनामध्ये कारखान्याने व्यावसायिक गटामध्ये सहभाग नोंदविला होता. सदर पुष्पप्रदर्शनामध्ये कारखान्यास ९ गटामध्ये खालीलप्रमाणे बक्षिस मिळालेली आहेत.

१) पहिल्या क्रमांकाची ५बक्षिसे

२) दुसऱ्या क्रमांकाची ७ बक्षिसे

३) तिसऱ्या क्रमांकाची ५ बक्षिसे

४) उत्तेजनार्थ ६ बक्षिसे

एकूणः २३ बक्षिसे.

तसेच कारखान्यास सर्वाधिक गुण मिळाले असल्यामुळे जनरल चँपीयनशिप फिरता चषक मिळाला आहे. ही बाब कारखान्याचे भुषण वाढविणारी आहे.[३६]

● **स्मृतीभवनः**

सहकार महर्षि कै. शंकरराव मोहिते नारायणराव मोहिते पाटील यांचे स्मरणार्थ कारखाना कार्यस्थळावर 'स्मृतीभवन' नावाने बांधकाम बांधण्यात आले आहे. स्मृतीभवनचा उपयोग लग्न कार्यासाठी, सेमिनार्स, शिबीरे, सभा, व्याख्यानमाला, सांस्कृतिक कार्यक्रम यांच्यासाठी केला जातो.

● **पुरस्कारः**

कारखान्यास १९८८ वर्षाकरीता स्टीम बचत व तांत्रिक कार्यक्षमतेसाठी 'अतिउत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता' असल्याचे प्रशस्तीपत्रक मिळाले आहे. कारखान्यास पुढील पुरस्कार मिळाले आहेत.

वसंतदादा शुगर इन्स्टिटयुट मांजरी बुद्रुक जि. पुणे यांचेकडून कारखान्यास सन १९९९-२००० मध्ये पुढील पुरस्कार मिळाले आहेत.

१) उत्कृष्ट ऊस विकास आणि संवर्धन (मध्य महाराष्ट्र झोन)

२) उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता (मध्य महाराष्ट्र झोन)

३) श्री. डी. जी. माने यांना राज्यस्तरीय 'उत्कृष्ट कार्यकारी संचालक' पुरस्कार.

४) श्री. व्ही. बी. बनकर यांना राज्यस्तरीय 'उत्कृष्ट मुख्य कार्यकारी अधिकारी' पुरस्कार.

५) श्री. एस. एस. जाधव यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट चिफ केमिस्ट पुरस्कार. [३७]

कारखाना "AH ISO GOOD" २०००- आंतरराष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणित आहे.

**तक्ता क्रः २०**

**सभासद संख्या**

| अ.क्र. | वर्ष | सभासद संख्या | अ.क्र. | वर्ष | सभासद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | १९६२-६३ | १३५६ | २. | १९६४-६५ | १५९२ |
| ३. | १९६९-७० | २२६२ | ४. | १९७४-७५ | ३५९४ |
| ५. | १९७५-७६ | ३७११ | ६. | १९७६-७७ | ३९१५ |
| ७. | १९७७-७८ | ४५४६ | ८. | १९७८-७९ | ४६८३ |
| ९. | १९७९-८० | ४९२१ | १०. | १९८०-८१ | ५२४९ |
| ११. | १९८१-८२ | ५६८८ | १२. | १९८२-८३ | ६९२१ |
| १३. | १९८३-८४ | ७३२१ | १४. | १९८४-८५ | ७४३६ |
| १५. | १९८५-८६ | ७५७० | १६. | १९८६-८७ | ७९७७ |
| १७. | १९८७-८८ | ९२१६ | १८. | १९८८-८९ | ९३०७ |
| १९. | १९८९-९० | ९५३९ | २०. | १९९०-९१ | ९९७० |
| २१. | १९९१-९२ | १०५७० | २२. | १९९२-९३ | १११४७ |
| २३. | १९९३-९४ | १४३०६ | २४. | १९९४-९५ | १४५५८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २५. | १९९५-९६ | १४७०८ | २६. | १९९६-९७ | १४८०७ |
| २७. | १९९७-९८ | १४९०१ | २८. | १९९८-९९ | १७०५९ |
| २९. | १९९९-२००० | १७६२२ | | | |

वरील तक्त्यातील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, कारखान्याच्या अहवाल वर्ष १९६२-६३ मध्ये सभासद संख्या १३५६ इतकी होती. तर सन १९९९-२००० मध्ये १७६२२ इतकी होती. यावरुन असे लक्षात येते की, कारखान्याच्या प्रत्येक अहवाल वर्षात सभासद संख्या वाढत जाऊन सहकार चळवळीचा लाभ घेणारांचे प्रमाण वाढले. आहे. [३८]

● **तक्ता क्रः २१**

**सभासद भागभांडवल** (लाखामध्ये )

| अ.क्र. | वर्ष | भागभांडवल | अ.क्र. | वर्ष | भागभांडवल |
|---|---|---|---|---|---|
| १. | १९६२-६३ | १६,०५,१२० | १०. | १९८०-८१ | ६७,६१,६९४ |
| २. | १९६४-६५ | १८०३४५९ | ११. | १९८१-८२ | ६९७७३८२ |
| ३. | १९६९-७० | ३९१३०४० | १२. | १९८२-८३ | ७६१६११६ |
| ४. | १९७४-७५ | ६०६२८५८ | १३. | १९८३-८४ | ७७९०४०५ |
| ५. | १९७५-७६ | ६१३५७८० | १४. | १९८४-८५ | ७८५१४५७ |
| ६. | १९७६-७७ | ६२१३८७८ | १५. | १९८७-८८ | ८६९७१८१.९० |
| ७. | १९७७-७८ | ६४४०७५३ | १६. | १९८८-८९ | ८८२१४८६.९० |
| ८. | १९७८-७९ | ६५४०७५३ | १७. | १९८९-९० | ८९७८८९२.७४ |
| ९. | १९७९-८० | ६६२७३६७ | | | |

वरील तक्यातील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, १९६२-६३ मध्ये कारखान्याचे भागभांडवल रु.१६,०५,१२० इतके होते, ते प्रत्येक अहवाल वर्षात वाढत

जाऊन सन १९८९-९० मध्ये रु.८९,७८,८९२.७४ इतके झाले. यावरुन कारखान्याच्या भागभांडवलामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.[३९]

● **तक्ता क्रः २२**

**साखर उतारा**

| अ.क्र. | वर्ष | साखर उतारा | अ.क्र. | वर्ष | साखर उतारा |
|---|---|---|---|---|---|
| १. | १९८०-८१ | १०.८० | ११. | १९९०-९१ | १०.१७ |
| २. | १९८१-८२ | १०.५५ | १२. | १९९१-९२ | १०.७३ |
| ३. | १९८२-८३ | १०.४४ | १३. | १९९२-९३ | १०.५३ |
| ४. | १९८३-८४ | १०.८५ | १४. | १९९३-९४ | १०.५५ |
| ५. | १९८४-८५ | १०.४२ | १५. | १९९४-९५ | १०.६८ |
| ६. | १९८५-८६ | १०.४५ | १६. | १९९५-९६ | ९.७७ |
| ७. | १९८६-८७ | १०.०८ | १७. | १९९६-९७ | १०.४९ |
| ८. | १९८७-८८ | १०.२२ | १८. | १९९७-९८ | १०.३२ |
| ९. | १९८८.८९ | १०.७४ | १९. | १९९८-९९ | १०.६५ |
| १०. | १९८९-९० | १०.६५ | २०. | १९९९-२००० | १२.१८ |

वरील तक्यातील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, सन १९९५-९६ मधील साखरेचा ९.७७ उताऱ्याचा अपवाद वगळता सन १९८०-८१ ते १९९९-२००० या अहवाल वर्षापर्यंत सरासरी १० च्या पुढे साखर उतार पडला आहे. [४०]

● **तक्ता क्रः २३**

**निव्वळ उत्पादित साखर पोती**

| अ.क्र. | वर्ष | साखर पोती | अ.क्र. | वर्ष | साखर पोती |
|---|---|---|---|---|---|
| १. | १९८०-८१ | ४८९७८४ | ११. | १९९०-९१ | ८०४३३९ |
| २. | १९८१-८२ | ६३४३४० | १२. | १९९१-९२ | ७८७०९५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | १९८२-८३ | ६४१५१७ | १३. | १९९२-९३ | ६६४४७७ |
| ४. | १९८३-८४ | ४९५०४६ | १४. | १९९३-९४ | ६२६८४६ |
| ५. | १९८४-८५ | ५४३३०८ | १५. | १९९४-९५ | १००३२६६ |
| ६. | १९८५-८६ | ५३२०१७ | १६. | १९९५-९६ | १०५८००० |
| ७. | १९८६-८७ | ५२३४५३ | १७. | १९९६-९७ | ७७४९६८ |
| ८. | १९८७-८८ | ५२०७९३ | १८. | १९९७-९८ | ९४९७१४ |
| ९. | १९८८-८९ | ४६६४२३ | १९. | १९९८-९९ | ९१५७५३ |
| १०. | १९८९-९० | ५६७६५० | २०. | १९९९९-२००० | ९८४८८९ |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, सन १९८०-८१ मध्ये कारखान्याचे ४,८९,७८४ इतकी साखर पोती उत्पादित झाली. हे प्रमाण प्रत्येक अहवाल वर्षात कमी-जास्त होते. सन.१९९९-२००० मध्ये ९,८४,८८९ इतकी साखर पोती उत्पादन वाढण्यात झाले. यावरुन कारखान्याच्या साखर उत्पादनात जास्त प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते.

## ● शंकरराव मोहिते पाटील सहकारी बँक लि. अकलूज :
## (शेतकरी सहकारी बँक)

शंकरराव मोहिते पाटील सहकारी बँक लि. अकलूजची स्थापना दि. रोजी झाली. एस. यू. आर. बी. एन. के. २७/०९/०७/१९७५ या अन्वये बँकेची सरकार दरबारी नोंदणी झालेली आहे. रिझर्व्ह बॅकेकडून लायसेन्स नंबर एम.एच.५८ पी. दि.१८/११/१९७५ नंबर आहे. शंकरराव मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली बँकेची स्थापना झाली.[४१]

● संचालक मंडळ (स्थापनेच्या वेळी )

१) मा.श्री. शंकरराव नारायण मोहिते पाटील

२) मा.श्री. विजयसिंह शंकरराव मोहिते पाटील

३) मा.श्री. मुधोजीराव भोजराव देशमुख

४) मा.श्री. ज्ञानेश्वर संतराम सालगुडे पाटील

५) मा.श्री. रत्नकांत रुपचंद फडे

६) मा.श्री. सुर्यकांत दत्तात्रय माने देशमुख

७) मा.श्री. विष्णूपंत विठ्ठलराव कुलकर्णी

८) मा.श्री. शहाजीराव बाजीराव पाटील

९) मा.श्री. वसंतराव शंकरराव पाटील

१०)मा.श्री. सुखदेव जनार्दन शिंदे

११)मा.श्री. दिनकरराव गुलाबराव माने

या बॅंकेची उद्दीष्टये थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत.

१) ग्रामीण भागात सर्वसाधारण जनतेच्या विकासकार्यात कर्जरुपाने आर्थिक मदत उपलब्ध करुन देणे.

२) लघुउद्योगास चालना मिळावी म्हणून लहान-लहान उद्योग निर्माण करण्यासाठी कर्ज पुरवठा करणे.

३) शेतीकार्यास कर्जपुरवठा करणे.

४) यांत्रिक पध्दतीने शेती करण्यास कर्ज देणे.

५) शैक्षणिक व सार्वजनिक हित साध्य करण्यासाठी कर्ज स्वरुपात आर्थिक मदत देणे.

- **बॅँकेचे घोषवाक्य :**

‘सर्वोत्कर्षाय संपदा’ हे बॅकेसाठी बोधवाक्य निवडण्यात आले.

- **बॅँकेचे विविध उपक्रम :**

बॅँकेने खालील कामांमधून सामाजिक, शैक्षणिक कार्य केले.

१) मोफत सर्व रोगनिदान शिबीर दि. २५/०६/२००० रोजी ७५०० रुग्नांना तज्ञ रुग्नांकडून मोफत तपासून मोफत चष्मे व औषध वाटली.

२) डोळे तपासून मोफत चष्मे वाटप केले.

३) कुपट रोग्यांना कपडे व चप्पल वाटप केली.

४) ४३ हृदय रुग्नांना रुबी हॉस्पीटलला मोफत शस्त्रक्रिया करण्याची सोय केली.

५) शालेय विद्यार्थ्यांना वही व पेन वाटप केले.

६) महिलांच्या पाककला  व रांगोळी स्पर्धा घेतल्या.

७) स्लो सायकलिंग स्पर्धा घेतल्या.

८) सदृढ बालक स्पर्धा घेतल्या.

९) मोफत रोगनिदान शिबीरात भाग घेतलेल्या तज्ञ डॉक्टरांना बॅकेचे स्मृतीचिन्ह भेट दिले.

१०)सभासदांना ५० टक्के डिपॉझिट वाटप केले.

११)शेतकऱ्यांसाठी विविध कर्ज वाटपाच्या विविध योजना सुरू केल्या.

१२) व्यापाऱ्यांना शॉर्ट टर्म कॅश क्रेडीट देण्यास सुरूवात केली.

१३) व्यापाऱ्याना भारतातील कोणत्याही शहरावर डिमांड ड्राफ्टने रक्कम पाठविण्याची सोय सुरू केली.

- **सभासदः**


बँकेचा सर्वसामान्य जनतेला घेता येईल असा सुरूवातीला शेअर करण्यात आला. प्रथम सभासद २५X४६९ एवढे होते. सन २००६ मध्ये ४२०२ सभासद संख्येत वाढ झाली आहे.

- **बोनसः**

सभासदांना बँकेने सुरूवातीच्या वर्षी ३ टक्के ने डिव्हीडंड दिला होता. तर सन २००० मध्ये रौप्य महोत्सवी वर्षात ५०टक्के डिव्हीडंड देऊन उच्चांक निर्माण केला आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रातील सर्व स्तरावरील सभासद बँकेबद्दल समाधानी आहेत.[४२]

**तक्ता क्र. २४ :** **बँकेतील ठेवी** (रुपये लाखात)


| १९७५-७६ | १९८०-८१ | १९८५-८६ | १९९०-९१ | १९९५-९६ | ९९-२००० |
|---|---|---|---|---|---|
| ५.३ | ३८.२७ | १२७.८३ | ३८२.२२ | २३८.३२ | ३३७३.६२ |




वरील आलेखावरुन असे दिसून येते की, बँकेची सन १९७५-७६ वर्षातील ५.३ लाख रुपये ठेवी होत्या. १९८०-८१ मध्ये त्यात ३३.२४ लाखाने वाढ होऊन ३८-२७ लाख रुपये झाली. अशाप्रकारे बँकेतील ठेवीत वाढ होत १९९९-२००० मध्ये ३३७३.६२ लाख रुपये झाल्या. यावरुन बँकेच्या सभासदांनी बँकेवर विश्वास ठेऊन आपल्या ठेवी बँकेमध्ये ठेवल्या. त्यामुळे सहकार क्षेत्राला सभासदांची मान्यता असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र. २५ : बँकेने दिलेले कर्ज (रुपये लाखात)**


| १९७५-७६ | १९८०-८१ | १९८५-८६ | १९९०-९१ | १९९५-९६ | ९९-२००० |
|---|---|---|---|---|---|
| १२.९२ | ३१.७४ | ७८.३७ | २७३.७२ | ८५२.०६ | २४९३.३५ |




वरील आलेखावरुन असे दिसून येते की, सन १९७५-७६ या सुरूवातीच्या वर्षात बँकेने १२.९२ लाख रुपये सभासदांना कर्ज दिले. त्यानंतर प्रत्येक अहवाल वर्षात कर्ज रक्कम वाढत जाऊन सन १९९९-२००० मध्ये २४९३.३५ लाख रुपये कर्ज वाटप केले. यावरुन असे दिसून येते की, बँकेने सभासदांना विविध उद्योगधंद्यांच्या कारणास्तव वाढीव कर्ज दिल्यामुळे सहकारी बँकेच्या माध्यमातुन सभासदांना विकासाची संधी मिळाली.

**तक्ता क्र. २६ : निव्वळ नफा (रुपये लाखात)**


| १९७५-७६ | १९७९-८० | १९८४-८५ | १९८९-९० | १९९४-९५ | ९९-२००० |
|---|---|---|---|---|---|
| | ०.११ | २.५६ | ७.४६ | ४७.२९ | १००.७७ |




वरील आलेखावरुन असे दिसून येते की बँकेला १९७५-७६ मध्ये निव्वळ नफा झालेलाच नव्हता परंतु १९७९-८० मध्ये ०.११ लाख रुपये इतका निव्वळ नफा झाला. त्यानंतरच्या प्रत्येक अहवाल वर्षात हा नफावाढत जाऊन १९९९-२००० मध्ये १००.७७ लाख रुपये इतका झाला. एकंदरीत सहकार चळवळींच्या माध्यमातुन चालु झालेल्या या बँकेच्या नफ्यात दरवर्षी वाढ होत गेली.

**तक्ता क्र. २७ खेळते भागभांडवल (रु.लाखात)**

| १९७५-७६ | १९७९-८० | १९८४-८५ | १९८९-९० | १९९४-९५ | ९९-२००० |
|---|---|---|---|---|---|
| ४.५४ | ५.४२ | ७.८५ | १२.४५ | १४.५३ | १६.७८ |





वरील आलेखावरुन असे दिसून येते की, बँकेचे भागभांडवल ४.५४ लाख रुपये इतके होते. त्या भागभांडवलामध्ये प्रत्येक वर्षी वाढ होत जाऊन सन १९९९-२००० मध्ये १६.७८ लाख रुपये इतके भागभांडवल झाले. यावरुन आपणास असे दिसून येते की,

बँकेने २५ वर्षात सहकारी चळवळीच्या माध्यमातुन आपल्या भागभांडवलामध्ये वाढ केली आहे.

**तक्ता क्र. २८ :** **सभासद लाभांश (टक्केवारी)**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९७६-७७ | १९८१-८२ | १९८६-८७ | १९९०-९१ | १९९४-९५ | ९९-२००० |
| ३ | ९ | १२ | १२ | १५ | ५० |




वरील आलेखावरुन असे दिसून येते की, बँकेने सभासदांना लाभांश सन १९७६-७७ मध्ये ३ टक्के इतका दिला आहे. यामध्ये वाढ होत जाऊन सन १९९९-२००० मध्ये बँकेने सहकारी क्षेत्रातील बँकेमध्ये सर्वात जास्त ५० टक्के इतका लाभांश दिला. हा सहकारी बँकेच्या क्षेत्रातील उच्चांक आहे. यावरुन आपणास असे दिसून येते की, सहकारी बँकेने सभासदांच्या हिताच्या दृष्टीकोनातुन झालेल्या नफ्याचा वाटा सभासदांपर्यंत पोहचविणेचा प्रयत्न केलेला आहे. हे सहकारी चळवळीच्या यशस्वीतेचे गमक आहे.[४३]

## ● विजय सहकारी कुक्कुटपालन संघ लि. विजयनगर-विझोरी :

### ● प्रास्ताविक :

१९६० पुर्वी माळशिरस तालुक्यातील लोकांची उपजिवीका ही सर्वस्वी शेतीवर अवलंबुन होती. शेतीतील अत्यल्प व अनिश्चित उत्पन्नामुळे बहुतांश जनता दारिद्रयात जगत होती. यावर उपाय म्हणून मा. शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील यांनी शेतीला जोडधंदा म्हणून दुग्धपालन व कुक्कुटपालन संघ सुरू करणेवर भर दिला. १९६५मध्ये संकरीत कोंबडयांची पैदास करणेसाठी यशवंतनगर अकलूज ता. माळशिरस जि. सोलापूर

येथे तालुक्यातील पहिला राजहंस कुक्कुटपालन संघ स्थापन केला. त्यानंतर त्यांचे पुत्र मा. ना. विजयसिंह मोहिते-पाटील यांनी विजय सह. कुक्कुटपालन संघाची स्थापना केली. या संघाने सर्वाधिक उत्पादनक्षमतेबद्दल राष्ट्रपती पारितोषिक मिळविले आहे.

● **स्थापना :**

अल्पभुधारक, शेतमजुर, निराधार महिला,सुशिक्षित बेरोजगार, विधवा महिलांचा आर्थिक विकास त्यांच्या मोकळया हातांना काम व राबणाऱ्या हातांना मोबदला मिळवून देणेसाठी सहकाराच्या माध्यमातुन कुक्कुटपालन व्यवसाय वाढीस लागावा म्हणून १४/०१/१९८१ रोजी श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांनी या संस्थेची स्थापना केली. संस्थेचा रजि. नोंद नं. /एस.यु.आर./एम.आर.एस./ए.जी.ओ. १२४१ असा आहे. [४४]

● **उद्दीष्टये :**

१) कोंबडीपालन व्यवसाय उभारणे. त्यांची शासकीय पध्दतीने वाढ करणे व विकास करणे.

२) सभासदांना कोंबडया, पिल्ले, खाद्यवस्तु, औषधे, पिंजरे यासारखी लागणारी तत्सम साधणे पुरवठा करणे. तसेच त्यांना त्याप्रित्यर्थ कर्ज पुरविणे.

३) कोंबडी विक्री व अंडी विक्री करणे. नविन सुधारणाविषयक ज्ञानाचा प्रसार सभासदांमध्ये करणे.

४) कोंबडी पालन व्यवसायासंबंधी संशोधन करणे.

**तक्ता क्र.२९**

## विजय सहकारी कुक्कुटपालन संस्था लि विजयनगर विझोरी

| अ.नं. | तपशिल | १९८७-८८ | १९८८-८९ | १९८९-९० | १९९६-९७ |
|---|---|---|---|---|---|
| १) | शेअर्स भांडवल | १९,३२,३८० | १९,४१,६०० | २३,७२,३०० | २४,२५,८०० |
| २) | सभासद संख्या | १५८१ | १५८१ | १५८१ | १५७८ |
| ३) | एकूण फंड्स | ७,५३० | ६,२०,३५७ | ११,७१,८३१ | ३४,९२,५४६ |
| ४) | कायम कर्जे | ३२,०१,४५६ | ३०,००,०४३ | ३६,९९,२७४ | ५२,२६,६२० |
| ५) | कायम जिदंगी | ३३,५६,०७४ | ४९,२२,५४४ | ६०,७३,१७१ | ८८,५०,४९९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६) | चाल जिदंगी | १६,३३,००४ | २४,९३,८६४ | २४,४४,७२५ | २२,५२,६७४ |
| ७) | अंडी खरेदी नग | २९,३०,२०६ | ९९,५१,४९७ | १,०४,२१,०८७ | |
| ८) | अंडी विक्री दर | ५५.८५ | ५५.६८ | ५२.७२ | ११३.५ |
| ९) | पक्षी संख्या नग | ३८,७१२ | ६०,१२९ | ५९,७९८ | ३८,७३५ |
| १०) | वार्षिक उलाढाल | ४२,२२,१८ | १,१५,६१,३७८ | १,३६,५४,२८८ | २,५६,३४,००० |
| ११) | अंडी विक्री रुपये | १६,२०,९२९ | ५५,०३,९३८ | ५४,४०,०९२ | १,०७,५८,५५८ |
| १२) | व्यापारी नफा | ३,८०,४३६ | १३,५४,१८३ | १३,१६,८६६ | १५,०२,३२४ |
| | ऑडीट वर्ग | अ | अ | - | - |

| १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ |
|---|---|---|---|
| २४,२५,२०० | २४,२५,२०० | २४,२५,२०० | २४,२५,३०० |
| १५७८ | १५७७ | १५७७ | १५७८ |
| ३७,६९,३३५ | ४१,२०,३७७ | ४४,४३,९१३ | ४६,६४,४५६ |
| ९०,४६,९९७ | ९१,८७,३८२ | ८०,६४,३३६ | ७५,५५,६४८ |
| ८८,४९,७६४ | ८८,५०,९४४ | ८८,५३,३१४ | ८८,५३,९५४ |
| २९,५२,२११ | १०३,९५,५८२ | ३८,६४,९६५ | २५,३८,४४२ |
| | | | |
| ११७.५ | १०६.६ | १११.८५ | ११६.९ |
| ३४,३३६ | ५२,२०९ | ३४,७८० | १६,३५० |
| १,९१,०१,७०० | २,३७,८६,६०० | १,५०,२४,७०० | १,०८,९९,८०० |
| ८०,६७,८४८ | १,०४,१५,४७७ | १,३७,२४,५२४ | १,०१,९०,०८७ |
| १६,२६,९०० | २१,३४,२४९ | ४९,६४० | ४,४४,७५५ |
| - | - | - | |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, कुक्कुटपालन संस्थेचे १९८७ मध्ये शेअर्स भांडवल १९३२३८० एवढे होते ते वाढत जाऊन सन २००० मध्ये २४२५३०० एवढे झाले. सभासद संख्या १९८७ ते २००० सर्वसाधारण १५७८ एवढी राहिली. १९८७ मध्ये एकूण फंड ७५३० एवढा होता. तो २००० मध्ये ४६६४४५६ एवढा झाला. १९८७ मध्ये कर्जे ३२०१४५६ एवढे होते ते २००० मध्ये ७५५५६४८ एवढे झाले. सन १९८७ मध्ये कायम

जिंदगी मिळकत ३३५६०७४ इतकी होत. ती सन २००० मध्ये ८८५३९५४ इतकी वाढत गेली. सन १९८७ मध्ये चालु जिंदगी १६३३००४ इतकी होती. त्यामध्ये वाढ होत सन २००० मध्ये २५३८४४२ इतकी झाली.

सन १९८७ मध्ये कुक्कुटपालन संघाने २९३०२०६ इतकी अंडी नग खरेदी केले. सन २००० मध्ये १९५०० इतके अंडी नग खरेदी केले. अंडी खरेदी नगामध्ये घट झालेली दिसून येते. अंडी उत्पादन कमी झाल्याचा हा परिणाम असल्याचे जाणवते. १९८७ मध्ये अंडी विक्री दर प्रति १०० नग ५५.८५ पैसे होता. तो सन २००० मध्ये ११६.९० पैसे इतका झाला. सन १९८७ मध्ये संघाची पक्षी नग संख्या ३८७१२ इतकी होती. ती सन २००० मध्ये १६३५० इतकी झाली. यावरून संघाचे पक्षी उत्पादन संख्येमध्ये घट झाले असे म्हणता येते. १९८७ मध्ये संघाची वार्षिक उलाढाल ४२२२८१८ इतकी होती. ती २००० मध्ये १०८९९८०० इतकी झाली. यावरून संघाची वार्षिक उलाढाल फारमोठया प्रमाणात वाढली आहे. सन १९८७ मध्ये संघाला व्यापारी नफा ३८०४३६ एवढा झाला. सन २००० मध्ये १०१९००८७ इतका व्यापारी नफा झाला. यावरून असा निष्कर्ष निघतो की, संघाच्या व्यापारी नफ्यात दरवर्षी वाढ झाली. सन १९८७-८८ पासून ते सन २०००-०१ पर्यंत संघाच्या संस्था तपासणीमध्ये ऑडीट अ दर्जा मिळालेला आहे.

एकंदरीत संघाने सातत्याने आपले उत्पादन, विक्री नफा यामध्ये वाढ करुन सहकार चळवळीला आणखी बळकटी आणण्यास सुरूवात केली. [४५]

- **संस्थेच्या प्रगतीची वाटचाल :**

१) १४/०१/१९८६ : संस्थेची स्थापना

२) १४/०१/१९८७ : पक्षीसंगोपन शुभारंभ

३) ०२/१०/१९८७ : विजयनगर येथील एन.सी.डी.सी. पोल्ट्री सुरूवात.

४) ११/०२/१९८८ : फिड प्लॅन्ट चे उद्घाटन समारंभ

५) १५/०२/१९८९ : अंडी स्टोअर इमारतीचा भुमीपूजन समारंभ.

६) १५/०२/१९८९ : नवीन ऑफिस इमारत व कामगार निवास वास्तुशांती समारंभ

७) २६/०२/१९८९ : नवीन ऑफिस इमारतीचा उद्‌घाटन समारंभ

८) १२/०१/१९८९ : अंडी स्टोअर इमारत उद्‌घाटन समारंभ

९) २९/०६/१९८९ : लेअर हाऊस नं.५ चे भुमीपूजन

१०) १२/०१/१९९० : लेअरहाऊस नं.६ चे भुमीपूजन

११) ०४/०४/१९९० : लेअरहाऊस नं.५ मध्ये पक्षी सोडण्याचा कार्यक्रम

१२) ०१/०९/१९९० : लेअरहाऊस नं.६ मध्ये पक्षी सोडण्याचा कार्यक्रम [४६]

## तक्ता क्र. ३० माळशिरस तालुक्यातील सहकारी संस्थांची माहितीः

| अ.क्र. | संस्थेचे नाव | सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि. अकलूज (१) | श्र शंकर साखर कारखाना लि. सदाशिवनगर (२) | शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज (३) | अकलूज विविध कार्यकारी सहकारी सोसायठी लि. अकलूज (४) |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्थापना | इ. २०/०६/१९६० | दि.२२/०४/१९६८ | इ. २६/१०/१९४७ | दि.२१/११/१९१५ |
| २. | सभासद संख्या<br>सुरूवातीची<br>१९९७ अखेर | <br>१०००<br>१४८०४ | <br>३९६<br>९१३२ | <br>-<br>७६ | <br>२७<br>१४५४ |
| ३. | भागभांडवल<br>सुरूवातीचे<br>१९९७ अखेर | <br>४०.००<br>५२५.०० | <br>२४.४०<br>२५८.१४ | <br>-<br>- | <br>०.०१<br>२९.८५ |
| ४. | सुरूवातीची कामगार संख्या<br>प्रत्यक्ष<br>अप्रत्यक्ष | <br>६२०<br>१००० | <br>६५०<br>१००० | <br>१<br>१ | <br>१<br>- |
| ५. | १९९७अखेर कामगार संख्या<br>प्रत्यक्ष<br>अप्रत्यक्ष | १४८७<br>११०००<br>१२४८७ एकूण | ९७५<br>६०००<br>६९७५ एकूण | १००४<br>१००<br>११०४ एकूण | २८<br>-<br>२८ एकूण |
| ६. | क्षमता<br>सुरूवातीची<br>१९९७ अखेर | <br>१०००मे. टन<br>४५०० मे. टन | <br>८०० मे. टन<br>२५०० मे. टन | <br>११ विद्यार्थीएक शाखा<br>२२३२६ विद्यार्थी ८२ शाखा | <br>०.०.०१ कर्जवाटप<br>८६.३६ कर्जवाटप |
| ७. | वार्षिक उलाढाल रु. लाखात<br>सुरूवातीची<br>१९९७ अखेर | <br>२००.००<br>२००००.०० | <br>११२.००<br>६७३४.०९ | <br>००.०५<br>१०५२.८४ | <br>०.०१<br>१८१.०० |

| अ.क्र. | संस्थेचे नाव | कृषी उत्पन्न बाजार समिती अकलूज (५) | शेतकरी सहकारी खरेदी विक्री संध लि. अकलूज (६) | राजहंस कुक्कुटपालन संघ लि. अकलूज (७) | जवाहर को-ऑप इंजि. अॅन्ड मॅकॅनिकल वर्क लि. अकलूज (८) |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्थापना | दि. ०१/११/१९५१ | दि. २७/०४/१९५९ | दि.२२/०३/१९६५ | दि. १९/०१/१६६८ |
| २. | सभासद संख्या | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | सुरूवातीची<br>१९९७ अखेर | -<br>- | ५२<br>९५९ | ६९२<br>२१९२ | १००<br>१८२ |
| ३. | भागभांडवल<br>सुरूवातीचे<br>१९९७ अखेर | -<br>- | ००.८<br>७.६७ | २.५०<br>२२.५५ | १.५१<br>२.४३ |
| ४. | सुरूवातीची कामगार संख्या<br>प्रत्यक्ष<br>अप्रत्यक्ष | ८<br>१०० | ५<br>- | १७<br>३० | १०<br>५ |
| ५. | १९९७अखेर कामगार संख्या<br>प्रत्यक्ष<br>अप्रत्यक्ष | ३४<br>४४<br>७८ एकूण | १३<br>-<br>१३ एकूण | ५१<br>१२०<br>१७१ एकूण | ११<br>०६<br>१७ एकूण |
| ६. | क्षमता<br>सुरूवातीची<br>१९९७ अखेर | -<br>- | -<br>- | अंडी दै.१५००० पक्षी २००००<br>अंडी दै. ११०००० पक्षी २६२००० | -<br>- |
| ७. | वार्षिक उलाढाल रु. लाखात<br>सुरूवातीची<br>१९९७ अखेर | १०.००<br>४५००.०० | २.५९<br>१३६.०० | ०.८३<br>६८४.३८ | २.८७<br>२५.१६ |

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट अकलूज (९) | शिवामृत दूध उत्पादक सह. संघ मर्या. अकलूज (१०) | शंकरराव मोहिते-पाटील सह. बँक लि. अकलूज(११) | शिवरत्न शिक्षण संस्था अकलूज (१२) |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्थापना | दि. १५/०७/१९७५ | दि. २७/०१/१९७६ | दि. २७/०२/१९७६ | दि. १८/०६/१९५९ |
| २. | सभासद संख्या<br>सुरूवातीची<br>१९९७ अखेर | -<br>- | ५१<br>३१५ | ४६९<br>४३०९ | -<br>- |
| ३. | भागभांडवल<br>सुरूवातीचे<br>१९९७ अखेर | -<br>- | ०.५४<br>७४४.११ | ३.२६<br>१५.५८ | -<br>- |
| ४. | सुरूवातीची कामगार संख्या<br>प्रत्यक्ष<br>अप्रत्यक्ष | ५<br>५ | ४५<br>१०१ | ४<br>- | ५<br>१ |
| ५. | १९९७अखेर कामगार संख्या<br>प्रत्यक्ष<br>अप्रत्यक्ष | २१<br>४९<br>७० एकूण | ६५०<br>११००<br>१७५० एकूण | ३८<br>-<br>३८ एकूण | २१<br>०५<br>२६ एकूण |
| ६. | क्षमता<br>सुरूवातीची<br>१९९७ अखेर | ७४ विद्यार्थी<br>४३२ विद्यार्थी | ५०००लिटर<br>२०००००लिटर | ५.०३ लाख ठेवी<br>२.४९ लाख कर्ज वाटप | १०६ विद्यार्थी<br>४३५ विद्यार्थी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७. | वार्षिक उलाढाल रु. लाखात<br>सुरूवातीची<br>१९९७ अखेर | २.२२<br>४२.०० | १००.००<br>९६६७.०० | ३.३१<br>१८५८.४७ | ०.२९<br>१२.८५ |

| अ.क्र. | संस्थेचे नाव | प्रताप क्रिडा मंडळ शंकरनगर अकलूज (१३) | शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना ऊस वाहतूक संघ अकलूज (१४) | शंकरराव मोहिते-पाटील सह. सूतगिरणी अकलूज (१५) | रणजित सह. कुक्कूट पालन संघ लि. सदाशिवनगर (१६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्थापना | दि. २०/०३/१९७८ | दि. १४/०१/१९७९ | दि. १८/०१/१९८० | दि. १०/०१/१९८४ |
| २. | सभासद संख्या<br>सुरूवातीची<br>१९९७ अखेर | ११ पु. - म.<br>८०पु. ३३म. | १५०<br>३१० | ५०६७<br>७६६९ | २०८०<br>२६०२ |
| ३. | भागभांडवल<br>सुरूवातीचे<br>१९९७ अखेर | -<br>- | १.५०<br>४९०० | २९१.४४<br>६०९.७४ | ३.०२<br>१६.५६ |
| ४. | सुरूवातीची कामगार संख्या<br>प्रत्यक्ष<br>अप्रत्यक्ष | -<br>- | १<br>२ | ५२<br>- | २<br>१० |
| ५. | १९९७अखेर कामगार संख्या<br>प्रत्यक्ष<br>अप्रत्यक्ष | -<br>-<br>- | १<br>२ | १५९<br>- | १६<br>५२ |
| ६. | क्षमता<br>सुरूवातीची<br>१९९७ अखेर | -<br>- | १५० वाहने<br>३१० वाहने | ५७८रोटर्स ६०००कि.<br>५७८रोटर्स ६०००कि. | ७००० अंडी, ७५००पक्षी<br>४०००० अंडी, ७००००पक्षी |
| ७. | वार्षिक उलाढाल रु. लाखात<br>सुरूवातीची<br>१९९७ अखेर | ०.०२५<br>४.५० | ३.००<br>५२.०० | २४२.३१<br>१४३९.४७ | ४.०६<br>३३६.०० |

| अ.क्र. | संस्थेचे नाव | विजय सह. कुक्कुट पालन संघ लि. विजयनगर (१७) | शिवस्मृती फलोत्पादन सह. संघ लि. अकलूज (१८) | शिवकृपा कुकूटपालन उद्योजक सह. संघ मर्या लि. अकलूज (१९) | विजयसिंह मोहिते-पाटील दूध वाहतूक सह. संघ लि. अकलूज (२०) |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्थापना | दि. १४/०१/१९८६ | दि. १२/०१/१९८६ | दि.११/०२/१९८७ | १४/०१/१९९३ |
| २. | सभासद संख्या<br>सुरूवातीची<br>१९९७ अखेर | १५७५<br>१५७८ | १२२<br>८०० | १८८<br>६०२ | ५३<br>११३ |
| ३. | भागभांडवल<br>सुरूवातीचे<br>१९९७ अखेर | १९.३२<br>२४.२० | ००.१४<br>८.४८ | ०.८६<br>४३.०० | २.११<br>५.११ |
| ४. | सुरूवातीची कामगार संख्या<br>प्रत्यक्ष | ० | ४ | १० | ६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | अप्रत्यक्ष | ५ | ५० | १४० | १८४ |
| ५. | १९९७अखेर कामगार संख्या<br>प्रत्यक्ष<br>अप्रत्यक्ष | १०<br>३० | ७<br>२०० | ७०<br>७८८ | १३<br>२०९ |
| ६. | क्षमता<br>सुरूवातीची<br>१९९७ अखेर | ८०००अंडी, १००००पक्षी<br>१७०००अंडी, ४००००पक्षी | ५०००० वार्षिक फळेडाग<br>९९८६२ डाग | १८००० अंडी, २२५०० पक्षी<br>१६०००० अंडी, २९५००० पक्षी | ६४ वाहने<br>९८ वाहने |
| ७. | वार्षिक उलाढाल रु. लाखात<br>सुरूवातीची<br>१९९७ अखेर | ४२.२२<br>३२७.१८ | ५३.५०<br>३२५.२६ | ०.८७<br>२१००.०० | -<br>३८१.०० |
| अ.क्र. | संस्थेचे नाव | विजयरत्न सहकारी पशुपक्षी संवर्धन संघ लि. शंकरनगर अकलूज(२१) | शिवशंकर मध्यवर्ती सहकारी संस्था मर्या अकलूज (२२) | सुमित्रा नागरी पतसंस्था अकलूज (२३) | स.म.शंकरराव मोहिते-पाटील प्रतिष्ठान संचलित वि.मो.पाटील महा. नातेपूते (२४) |
| १ | स्थापना | १२/११/१९९३ | २९/०६/१९९५ | ०६/१२/१९८८ | १९/११/१९९१ |
| २. | सभासद संख्या<br>सुरूवातीची<br>१९९७ अखेर | ५<br>५ | ४००<br>३२११ | ८०१<br>१२४५ | -<br>- |
| ३. | भागभांडवल<br>सुरूवातीचे<br>१९९७ अखेर | ००.५०<br>११.०० | ००.१०<br>३२.११ | ४.११<br>९.५ | -<br>- |
| ४. | सुरूवातीची कामगार संख्या<br>प्रत्यक्ष<br>अप्रत्यक्ष | २<br>- | १<br>- | २<br>- | १२<br>३ |
| ५. | १९९७अखेर कामगार संख्या<br>प्रत्यक्ष<br>अप्रत्यक्ष | १३<br>- | ८५<br>- | २९<br>- | २५<br>५ |
| ६. | क्षमता<br>सुरूवातीची<br>१९९७ अखेर | -<br>- | -<br>- | ३.०७ ठेवी, ६.८३ कर्जे<br>११६६.००कर्ज १३६१.०० ठेवी | १२० विद्यार्थी<br>४४३ विद्यार्थी |
| ७. | वार्षिक उलाढाल रु. लाखात<br>सुरूवातीची<br>१९९७ अखेर | ९८.७७<br>११५.०० | ००.१०<br>३८८.४० | ८८३.००<br>१४८२.०० | ७.३०<br>३९.५८ |

| अ.क्र. | संस्थेचे नाव | श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील माळशिरस तालुका बिगरशेती ग्रामीण सह पतसंस्था मर्या शंकरनगर (२५) |
|---|---|---|
| १ | स्थापना | ११/०२/१९८६ |
| २. | सभासद संख्या<br>सुरूवातीची | १२५ |

| | | |
|---|---|---|
| | १९९७ अखेर | २७६४ |
| ३. | भागभांडवल<br>सुरूवातीचे<br>१९९७ अखेर | <br>०.२५<br>२३.०६ |
| ४. | सुरूवातीची कामगार संख्या<br>प्रत्यक्ष<br>अप्रत्यक्ष | <br>२<br>३ |
| ५. | १९९७अखेर कामगार संख्या<br>प्रत्यक्ष<br>अप्रत्यक्ष | <br>११<br>५ |
| ६. | क्षमता<br>सुरूवातीची<br>१९९७ अखेर | १.१५ कर्जवाटप, १.०० ठेवी<br>२११.०० कर्जवाटप, २३४.०० ठेवी |
| ७. | वार्षिक उलाढाल रु. लाखात<br>सुरूवातीची<br>१९९७ अखेर | <br>७.००<br>८०७.०० |

वरील तक्त्यातील आकडेवरीतील माहितीवरुन असे दिसून येते की, माळशिरस तालुक्यातील सहकारी संस्थातील एकूण सभासदांची सुरूवातीची संख्या १३३६४ इतकी होती. ती वाढत जाऊन १९९७ च्या अखेर ५४,४२८ इतकी झाली असल्याचे दिसून येते.

तसेच माळशिरस तालुक्यातील सहकारी संस्थातील एकूण सुरूवातीचे भागभांडवल ३९७.६५ लाख रुपये इतके होते. ते भागभांडवल १९९७ अखेर २४३६.६४ इतके झाले आहे. यावरुन भागभांडवलात देखील फार मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते.

याशिवाय वरील सहकारी संस्थातील सुरूवातीची कामगार संख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष म्हणून ४०६० इतकी होती. ती १९९७ अखेर २४४८७ इतकी झाली. तसेच वरील सहकारी संस्थांमधील सुरूवातीची वार्षिक उलाढाल १४६४.२७ लाख रुपये इतकी होती. ती एकूण १९९७ मध्ये ५२६९१.१८ लाख रुपये इतकी झाली.[४७,४८]

## • माळशिरस तालुक्यातील सहकार चळवळीची वैशिष्टे :

१) **शेतकऱ्यांसाठी सहकारी संस्था :** शेतकऱ्यांचे हित संवर्धन करणे, शेतकऱ्यांच्या उत्पादित शेतमालाची रास्तभावात विक्री करुन देणे, शेतमालाला वाजवी मान

मिळवून देणे, शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारे बी-बीयाणे, औषधे, खते व अवजारे योग्य भावात पुरविणे. लेव्ही साखरेचे वितरण करणे.

**शेतकरी वाहन मालकांची संस्था :** ऊस वाहतुक रास्त दरात करणे, दुध उत्पादनाच्या वाढीसाठी पुरक योजना राबविणे, दुध उत्पादन वाढीसाठी आवश्यक

२) योजना पशुवैद्यकिय मदत, कृत्रिम गर्भधारणेची सोय व तांत्रिक सहाय्य उत्पन्न करुन देणे. सभासदांचा ५० हजाराचा विमा उतरविला आहे. जागेवर दुध कलेक्शन, खाद्य पुरवठा व तात्काळ वैद्यकिय सेवा यामुळे नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड गुजरात यांनी 'आनंद पॅटर्न' ऐवजी अकलूज पॅटर्नचे अवलोकन करावे. असे देशातील सहकारी दुध उत्पादक संघास आवाहन केले आहे.

३) सहकारी बँक, पतसंस्था, सोसायटी : शेतकरी, व्यापारी, लघुउद्योजक यांना उद्योगधंद्यासाठी लागणारे कर्ज सुविधा उपलब्ध करुन देणे. छोटे शेतकरी, हातगाडीवाले, फेरीवाले, छोटे व्यापारी यांना त्वरीत कर्ज पुरवठा उपलब्ध करुन देणे. सभासद ठेवीदार यांच्या ठेवीवर आकर्षक व्याजदर सोनेतारण शेफ डिपॉझिट ची सोय सहकार विश्व कोल्हापूर यांचेकडून अहवाल स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक सन १९९३-९४ साली ठेवलेल्या बक्षिस योजनेत पश्चिम महाराष्ट्रात प्रथम क्रमांकाचे कै. वसंतदादा ट्रॉफी व प्रशस्ती प्रमाणपत्र मिळाले आहे. सभासदांच्या आर्थिक समस्यांचे निवारण करणे. संस्थेच्या सभासदांना काटकसर चिकाटी, स्वावलंबन, परस्पर सहकार्य निर्माण करुन शेतीविषयक गरजा भागविणे. सुधारित बी.बीयाणे पुरविणे, अल्पदरात कर्ज देणे.

४) कुक्कुटपालन सहकारी संस्था : शेतकऱ्यांच्या शेतीला जोडव्यवसाय मिळावा म्हणून संस्थेची स्थापना शेतकऱ्यांचे घरटी पोल्ट्री युनिट मोफत वैद्यकिय सेवा, अंडी व पक्षी विक्री व्यवस्था, खाद्यपुरवठा तसेच पिलांचा पुरवठा करणे. सहकारी संस्थेतील कर्मचाऱ्यांना आर्थिक फायदा मिळावा म्हणून उभारलेली कुक्कुटपालन संस्था सभासदांना १२ आठवडयाचे पक्षी पुरविणे. अंडी खाऊक विक्री करणे, शास्त्रीय पध्दतीने तयार केलेले खाद्य पुरविणे, वैद्यकिय मदत देणे.

५) **सहकारी ग्राहक संस्था व तांत्रिक सहकारी संस्था :** स्वच्छ निर्भेळ माल, विविध वस्तु, उत्तम दर्जा, योग्य वजन, रास्त किंमत, विनम्र सेवा सण व उत्सवाकरीता सवलतीचे दरात स्वतंत्र्य दालन कुशल कारागीर यांना काम मिळवून देणे. विविध संस्थांमधील तसेच शेतकऱ्यांची तांत्रिक कामे योग्य दरात करुन दिली जातात.

६) **शैक्षणिक संस्था :** विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक संस्था दोन शाखा हायस्कुल, इंग्लिश मिडीयम, कॉलेज इत्यादी विद्यार्थी साधारणपणे ३०००० शिक्षकांना जिल्हा व राज्य शासन पुरस्कार मिळालेले आहेत. १० व १२ वी पदवी परिक्षेत विद्यार्थी गुणवत्ता यादीत सातत्त्याने येतात. तसेच वेगवेगळया राज्य व केंद्रशासनाची प्रोत्साहनपर अनुदाने मिळाली आहेत. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलांना उच्चस्तरीय शिक्षणाची सोय अगदी कमी फिमध्ये उपलब्ध करुन दिली आहे.

७) **क्रिडा मंडळ :** सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतुन कला, क्रिडा व बौध्दीक क्षेत्रात मुले, मुली , महिला, पुरुष यांचा विकास साधण्याचा प्रयत्न करणे. राष्ट्रीय, शालेय, क्रिडा स्पर्धेचे दोन वेळा व राज्य रौप्य महोत्सवी क्रिडा स्पर्धेचे यशस्वी आयोजन.

एकंदरीत माळशिरस तालुक्यातील सहकारी संस्थांमधील सभासद, भागभांडवल कामगार यांच्या संख्येत वाढ मोठया प्रमाणात झाली आहे. तसेच उत्पादनक्षमतेत, कर्जवाटप, ठेवी यामध्ये वाढ झाली आहे. यावरुन आपणास असे म्हणता येते की, माळशिरस तालुक्यातील सहकार चळवळीचा सभासदांना कामगारांना लाभ होऊन त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झालेली आहे. आर्थिक स्तर उंचावल्यामुळे शैक्षणिक विकासाची संधी मिळाली गेली. तसेच सामाजिक सांस्कृतिक राहणीमान जीवनमान उंचावले आहे. माळशिरस तालुक्यातील सहकार चळवळीच्या पसरलेल्या जाळयामुळे व यशस्वीतेमुळे माळशिरस तालुक्याचे नाव सर्वत्र झालेले आहे. येथील सहकार चळवळीच्या यशस्वीतेच्या जोरावर राजकीय नेतृत्व निर्माण झाले. सहकाराच्या पाठिंब्यामुळे येथील नेतृत्त्वाला राज्यमंत्रीमंडळामध्ये मंत्री, उपमुख्यमंत्री पदाची संधी मिळाली गेली. या राजकीय

सत्तेचा लाभ देखील माळशिरस तालुक्यातील सहकार चळवळीला शासनाचे सहाय्य मिळवून देण्यात झाला.

सारांश माळशिरस तालुक्यात सहकार चळवळीचा उगम होऊन तिचा विकास होऊन चळवळ यशस्वी झाल्याचे आपणास दिसून येते.

● **संदर्भ सूची :**


१) शंकरराव मोहिते पाटील सह. सुत गिरणी लि. अकलूज वार्षिक अहवाल सन १९९३-९४ पृ.४

२) शंकरराव मोहिते पाटील सह. सुत गिरणी लि. अकलूज वार्षिक अहवाल सन १९९९-२००० पृ.७

३) शंकरराव मोहिते पाटील सह. सुत गिरणी लि. अकलूज वार्षिक अहवाल सन १९९९-२००० पृ.८

४) शंकरराव मोहिते पाटील सह. सुत गिरणी लि. अकलूज वार्षिक अहवाल सन १९९९-२००० पृ.८

५) शंकरराव मोहिते पाटील सह. सुत गिरणी लि. अकलूज वार्षिक अहवाल सन १९९९-२००० पृ.७

६) शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघ मर्या. विजयनगर. वार्षिक अहवाल सनः १९९२-९३ पृ. २

७) शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघ मर्या. विजयनगर. वार्षिक अहवाल सनः १९९९-२०००पृ. ८

८) शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघ मर्या. विजयनगर. वार्षिक अहवाल सनः १९९२-९३,१९९९-२००० पृ.८,१२

९) शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघ मर्या. विजयनगर. वार्षिक अहवाल सनः १९९२ ९३ पृ. २

१०) शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघ मर्या. विजयनगर. वार्षिक अहवाल सनः १९९९-२००० पृ. ११

११) शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघ मर्या. विजयनगर. वार्षिक अहवाल सनः १९९९-२०००पृ. १०

१२) शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघ मर्या. विजयनगर. वार्षिक अहवाल सनः १९९९-२००० पृ. ११

१३) शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघ मर्या. विजयनगर. वार्षिक अहवाल सनः १९९२-९३ पृ. ८

१४) शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघ मर्या. विजयनगर. वार्षिक अहवाल सनः १९९९-२००० पृ. १३

१५) शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघ मर्या. विजयनगर. वार्षिक अहवाल सनः १९९९-२००० पृ.१३

१६) शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघ मर्या. विजयनगर. वार्षिक अहवाल सनः १९९९-२००० पृ.६

१७) शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघ मर्या. विजयनगर. वार्षिक अहवाल सनः १९९२-९३ पृ. १४

१८) शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघ मर्या. विजयनगर. वार्षिक अहवाल सनः १९९२-९३ व १९९९-२००० पृ. २

१९) शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघ मर्या. विजयनगर. वार्षिक अहवाल सनः २००१ पृ. ९

२०) यशवंत सहकारी साखर कारखाना यशवंतनगर-अकलूज. वार्षिक अहवाल, १९८२-८३

२१) यशवंत सहकारी साखर कारखाना यशवंतनगर-अकलूज. वार्षिक अहवाल, १९८३-८४

२२) यशवंत सहकारी साखर कारखाना यशवंतनगर-अकलूज. वार्षिक अहवाल, १९८४-८५

२३) यशवंत सहकारी साखर कारखाना यशवंतनगर-अकलूज. वार्षिक अहवाल, १९८५-८६ पृ.१९

२४) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सह. साखर कारखाना लि. यशवंतनगर वार्षिक अहवाल, १९९८-९९ पृ७

२५) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सह. साखर कारखाना लि. शंकरनगर अकलूज, वार्षिक अहवाल सन-२००० पृ.१३

२६) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सह. साखर कारखाना लि. शंकरनगर अकलूज वार्षिक अहवाल, २००० पृ.८,९ व सन १९९८-९९ पृ.४

२७) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सह. साखर कारखाना लि. शंकरनगर अकलूज वार्षिक अहवाल, १९९४पृ.२०,१९९३/पृ.८, १९९४ पृ.८, १९९७ पृ.६, १९९९ पृ.८, २००० पृ.१२

२८) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सह. साखर कारखाना लि. शंकरनगर अकलूज वार्षिक अहवाल, १९९३-९४ पृ.८, २०००पृ.१२

२९) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सह. साखर कारखाना लि. शंकरनगर अकलूज वार्षिक अहवाल, १९९८-९९ पृ.६

३०) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सह. साखर कारखाना लि. शंकरनगर अकलूज वार्षिक अहवाल, १९९८-९९ पृ.६

३१) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सह. साखर कारखाना लि. शंकरनगर अकलूज वार्षिक अहवाल, १९८३-८४ प.१२.

३२) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सह. साखर कारखाना लि. शंकरनगर अकलूज वार्षिक अहवाल, १९८६-८७पृ.१

३३) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सह. साखर कारखाना लि. शंकरनगर अकलूज वार्षिक अहवाल, १९९३-९४ पृ.५

३४) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सह. साखर कारखाना लि. शंकरनगर अकलूज वार्षिक अहवाल, १९९३-९४ पृ.१४

३५) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सह. साखर कारखाना लि. शंकरनगर अकलूज वार्षिक अहवाल, १९८६-८७ पृ.७

३६) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सह. साखर कारखाना लि. शंकरनगर अकलूज वार्षिक अहवाल, १९८९-९० पृ.९

३७) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सह. साखर कारखाना लि. शंकरनगर अकलूज वार्षिक अहवाल, १९८९-९० पृ.११

३८) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सह. साखर कारखाना लि. शंकरनगर अकलूज वार्षिक अहवाल, १९९२-९३पृ.२,३,१९८३-८४ पृ.६,७

३९) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सह. साखर कारखाना लि. शंकरनगर अकलूज वार्षिक अहवाल, १९८३-८४ पृ.६,७

४०) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सह. साखर कारखाना लि. शंकरनगर अकलूज वार्षिक अहवाल, १९८०-८१ ते १९९९-२०००

४१) शंकरराव मोहिते पाटील सहकारी बँक लि. अकलूज १९ वा वार्षिक अहवाल १९९२-९३ पृ.७

४२) शिवधन रौप्य महोत्सव स्मरणिका शंकरराव मोहिते पाटील सहकारी बँक लि. अकलूज सन २०००-०१ पृ.६

४३) शिवधन रौप्यमहोत्सव स्मरणिका, शंकरराव मोहिते पाटील सहकारी बँक लि. अकलूज सन २०००-०१ पृ.१११

४४) विजय सहकारी कुक्कूटपालन संस्था लि. विजयनगर विझोरी ता. माळशिरस जि.सोलापूर वार्षिक अहवाल सन १९८९-९० पृ.२

४५) विजय सहकारी कुक्कूटपालन संस्था लि. विजयनगर विझोरी ता. माळशिरस जि.सोलापूर वार्षिक अहवाल सन २०००-०१ पृ.१

४६) विजय सहकारी कुक्कूटपालन संस्था लि. विजयनगर विझोरी ता. माळशिरस जि.सोलापूर वार्षिक अहवाल सन १९८९-९० पृ.१

४७) जोशी प्रमोद, परिसस्पर्श प्रकाशकः सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील स्मरणिका समिती अकलूज पृ३९०, ४०२

४८) शिवधन रौप्य महोत्सव स्मरणिका, शंकरराव मोहिते पाटील सह. बँक लि. अकलूज पृ.११२,११५

## प्रकरण. ४ थे :

# ● माळशिरस तालुक्यातील सहकारी चळवळीचे नेतृत्त्व ●

### ● प्रास्ताविक :

जगामध्ये आजपर्यंत अनेक चळवळी झालेल्या आहेत. त्यातील काही यशस्वी झाल्या तर काही अयशस्वी झाल्या. ज्या चळवळी यशस्वी झाल्या त्याचे कारण म्हणजे त्यांना लाभलेले योग्य नेतृत्त्व. म्हणूनच कोणत्याही संस्थेची चळवळीची प्रगती अखंडीतपणे होण्यासाठी योग्य नेतृत्त्वाची आवश्यकता असते. हे नेतृत्त्व चळवळीतील सर्वांना सामावून नेणारे असावे. चळवळीला जर योग्य नेतृत्त्व लाभले तर चळवळ निश्चितपणे आपल्या कार्यात यशस्वी होते.

त्याचप्रमाणे सहकारी चळवळीचा विकास घडवून आणण्यासाठी निष्ठावान अशा नेतृत्त्वाची आवश्यकता असते. ज्यांना सहककाराचे ज्ञान आहे. त्यांची तत्त्वे माहित आहेत. ज्यांना सहकारी चळवळीविषयी आस्था वाटते, असे नेतृत्त्वच सहकारी चळवळीचा विकास घडविते. महाराष्ट्रामध्ये डॉ. धनाजीराव गाडगीळ, वैकुठभाई मेहता, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, रत्नाप्पा कुंभार, तात्यासाहेब कोरे, शंकरराव मोहिते पाटील इत्यादी कर्तुत्त्ववान नेतृत्त्वामुळे महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा मोठया प्रमाणात विकास झाला आहे. माळशिरस तालुक्यातील सहकारी चळवळीच्या वाढीस व विकासास ज्यांचे नेतृत्त्व लाभले आहे. त्यांचा आढावा घेणे गरजेचे आहे.

### ● कै. शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील :-

माळशिरस तालुक्यात सहकारी चळवळीचा पाया ज्यांनी घातला ते म्हणजे शंकरराव नारायण मोहिते पाटील त्यांचा जन्म ‘मकर संक्राती’च्या शुभदिनी १४ जानेवारी १९१८ रोजी अकलूज येथे झाला. सोलापूर व पुणे जिल्हयाच्या सीमेवर नीरा नदीच्या काठी वसलेले ऐतिहासिक वारसा लाभलेले त्यांचे अकलूज हे गाव. त्यांचे शिक्षण इयत्ता  सातवी पर्यंत झाले.

१९३० मध्ये महात्मा गांधींनी सुरू केलेल्या 'सविनय कायदेभंग' चळवळीमध्ये सहभाग घेऊन ब्रिटीश सत्तेविरोधात काम सुरू केले. १९४२ साली चलेजाव आंदोलनामध्ये क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या कार्याने प्रेरीत होऊन अकलूज परिसरात शंकररावांनी सरकार विरोधात रान उठविले. अकलूज हे भूमिगत देशभक्तांचे आश्रयस्थान बनले होते. अकलूज मध्ये शंकररावांनी क्रांतीसिंह नाना पाटील यांची दि. २० मे १९४६ रोजी सभा घेतली.

त्यांच्या सहकारी चळवळीच्या कार्याची सुरूवात सुपरवाझिंग युनियनच्या अध्यपदाच्या निवडणुकीत झाली. अकलुज मधील विविध कार्यकारी विकास सोसायटीने त्यांची पंच म्हणून निवड केली. त्यानंतर अकलूज ग्रामपंचायतीच्या सरपंच, कृषी उत्पन्न बाजार समितीचे पहिले सभापती म्हणून निवड झाली. १९५२, १९५७ मध्ये विधानसभेच्या निवडणुकीत विजयी झाले.

त्यांनी माळशिरस तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कष्टाला, गाळलेल्या घामाला, मोल मिळावे म्हणून अतिशय परिश्रम घेऊन दि. २० जून १९६० मध्ये यशवंत सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली. त्यानंतर जपानचा दौरा करुन जपानमधील शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाने शेतातुन खुप मोठया प्रमाणात उत्पादन घेतो, औद्योगिक, यांत्रिक प्रगती या त्यांनी जवळून अनुभवल्या.

शेतकऱ्यांच्या, शेतमजुरांच्या, बाराबलुतेदारांच्या, मागाससमाजातील लोकांच्या हाताला रोजगार, स्वयंरोजगार मिळावा म्हणून २६/०३/१९६५ रोजी राजहंस कुक्कुट पालन संघाची स्थापना केली. कोंबडयांची खादय निर्मिती संघातच केली. अंडी उत्पादन वाढले. अनेक बेरोजगारांना काम मिळाले. नफ्याचे प्रमाण वाढले.

● **जवाहर को - ऑपरेटिव्ह मेकॅनिकल वर्कशॉप :**

शेती व शेतकऱ्यांशी संबंधित वस्तुची निर्मिती करणे व त्यांच्या जीवनात क्रांती घडविणे हेच त्यांचे ध्येय्य होते. बाराबलुतेदारांच्या मुलांना तांत्रिक मिळून कुशल कामगार तयार व्हावे, मोठे उद्योजक निर्माण व्हावेत म्हणून १९ जानेवारी १९६८ रोजी त्यांनी जवाहर

को-ऑपरेटीव्ह इंजिनियरिंग मेकॅनिकल वर्कशॉपची स्थापना केली. या वर्कशॉपमधुन आसपासच्या परिसरातील गोबरगॅस टाक्या, आवश्यक सुटे लोखंडी भाग, नागरिकांना पुरविण्यात येतात.[१]

● **श्री. शंकर सहकारी साखर कारखाना :-**

'मे. चितळे शुगर वर्क्स लिमिटेड' या नावाचा कारखाना नोंदणीनंतर सुमारे १४ वर्षे न सुरू झाल्यामुळे १९६७ मध्ये लिक्वीडेशनमध्ये निघाला होता. तालुक्याच्या पश्चिम भागातील पुढाऱ्यांच्या आग्रहास्तव शेतकऱ्यांच्या मालकीचा कारखाना बनविण्याचे ठरविले. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या मदतीने सभासदांकडून भागभांडवल जमा करुन ३१ डिसेंबर १९६८ रोजी ताब्यात घेतला. तो यशस्वीपणे चालवून दाखवला.[२]

● **विजय प्रिटींग प्रेस :-**

स्त्रीयांमधील सामर्थ्याची जाणीव शंकररावांना होती. म्हणून कारखान्याच्या माध्यमातुन आजच्या महिला विकासाच्या धोरणाचा पाया शंकररावांनी ४ दशकांपुर्वीच घातला होता.

● **शिवपार्वती सार्वजनिक ट्रस्टची स्थापना :-**

शंकररावांनी १९७२ यशवंत कारखान्याच्या माध्यमातुन शिवपार्वती सार्वजनिक ट्रस्टची स्थापना केली. १९७२ मध्ये मोठा दुष्काळ पडला. पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी १३ नविन टँकर घेऊन सोलापूर जिल्हा व इंदापूर तालुक्यात पाणी पुरवठा केले. छात्रालये सुरू केली. ठिकठिकाणी चारा छावण्या सुरू केल्या. एकंदरीत सहकाराच्या माध्यमातुन मानवतेचे दर्शन त्यांनी घडविले.

● **महाराष्ट्राच्या सामुदायिक 'विशाल विहिर' योजनेचे प्रणेते :-**

शेतील शाश्वत पाण्याची आवश्यकता असते. हे शंकररावांनी ओळखले. अल्पभुधारक शेतकऱ्यांना खोलवर विहिर खोदणे शक्य नव्हते. म्हणून शंकररावांनी स्वतः गणित मांडून सामुदायिक विहिर कल्पना मांडली. पहिली विशाल विहिर पानीव ता.

माळशिरस जि. सोलापूर येथे खोदली. १०० फुट लांब, ११०० फुट रुंद  तसेच ३० फुट खोलीची विहिर बांधली. या विहिरीसाठी एकूण खर्च दीड लाख रुपये येत होता. त्यावर २०० एकर क्षेत्र ओलीताखाली येत होते. याउलट वैयक्तिक विहिर खोदुन एवढे क्षेत्र भिजविण्यासाठी ७० विहीरी खोदाव्या लागतात. बारा हजार रुपयांची एक विहीर म्हणजे सुमारे आठ लाख चाळीस हजार एवढा खर्च येत. म्हणजे दीड लाखाच्या खर्चात साडे आठ लाखाचे काम होत होते. महाराष्ट्र सरकारने ही योजना अंमलात आणली. महाराष्ट्रभर ही योजना कार्यान्वित झाली होती.[३]

● **गौरीशंकर महिला सहकारी संस्था :-**

स्त्री शक्तीला वाव देण्यासाठी २४ जाने १९७६ रोजी 'गौरीशंकर महिला सहकारी संस्थेची स्थापना केली. सर्वच स्तरातील गरजु महिलांना विविध गृहोपयोगी वस्तु निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण देऊन उत्पादन सुरू केले.

● **संकरीत गोपालन व दुग्धपालन व्यवसायाचा प्रचार :-**

शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा व्हावी म्हणून शेतीला जोडधंदा रोख स्वरुपात पैसे मिळणे आवश्यक होते. त्यांनी उरळीकांचन व बेंगलोर येथे जाऊन संकरीत गायींचा अभ्यास केला. कारखान्याच्या जवळच संकरीत गो-पैदास केंद्राची स्थापना केली.

दुधाचे उत्पादन वाढावे म्हणून प्रसारासाठी तालुक्यातील पिलीव, नातेपूते, तांदुळवाडी, वेळापूर यासारख्या छोठया - मोठया गावांमध्ये आठवडे बाजारातुन ट्रकमधुन गायी नेऊन दुध काढण्याचे प्रात्यक्षिक दाखवून गायीविषयी माहिती देऊ लागले. 'पाळाल जर्सी तर जीवनात सरशी' 'ज्यांच्या घरी जर्सी गाय, त्यांच्या घरी लक्ष्मीचे पाय.' 'शेतात घरात ऐपत बाजारात पत.' असे फलकाच्या माध्यमातुन लोकांमध्ये ठसा उमटवित. जर्सी गायी विकत घेण्यासाठी लोकांना बॅंकेमार्फत  कर्जे मिळवून दिली.

● **शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ :-**

शंकररावांनी केलेल्या दुध वाढीच्या प्रयत्नामुळे दुध संकलन वाढत जाऊन १९७४ साली पाच हजारावर पोचले. १९७४ मध्ये ५ हजार लिटर क्षमतेची डेस्को प्लँट सुरू केला. पुढे दुध संकलनात वाढ होऊ लागल्यामुळे महाराष्ट्रातील एकमेव असा तालुका स्तरावरील शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघ २७ जानेवारी १९७६ साली स्थापन झाला. सुरूवातील ५ दूध उत्पादक संस्थांवर सुरू झाले. दुध संकलन संस्थात वाढ होऊन २०० संस्थांपर्यंत पोहोचली आहे. दुध उत्पादकांची संख्या फक्त ५१ होती. जी २० हजारांपर्यंत पोहचली आहे. वार्षिक उलाढाल एक कोटीवरुन हजार लिटरवरुन दिड लाख रुपये झाली आहे. १०१ कामगार संख्येवरुन दूध संघात पुढे २ हजार कामगारांना रोजगार मिळाला आहे. साधारण ४० हजार लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभ मिळाला आहे. गुजरातमधील आनंद पॅटर्नला अकलुज पॅटर्नने मागे टाकले आहे.

राजसिंह मोहिते पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली दुधापासून सुगंधी दुध, पेढे, टेबल बटर, श्रीखंड, आम्रखंड, तूप, पनीर, लस्सी, बासुंदी, बर्फी इत्यादी उपपदार्थ निर्माण केले आहेत. आय. एस. ओ. ९००१, आय. एस. ओ. १४००१, एच:ए.सी.टी.सी. व एच.एस.पी. आदी मानांकाने मिळविणारा भारतातील शिवामृत हा एकमेव संघ आहे.[४]

● **प्रताप क्रिडा मंडळ :-**

समाजाच्या विकासाच्या चोहोकडून झालेला सर्वांगिण विकास शंकररावांना अभिप्रत होता. गामीण भागातील तरुणांना विविध उपक्रम राबविण्यासाठी शंकररावांनी १९७७६ साली प्रताप क्रिडा मंडळाची स्थापना केली आणि अनेक विधायक अशा सांस्कृतिक व खेळाच्या उपक्रमांची सुरूवात केली.

● **महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद :**

शंकररावांना लहानपणापासून कुस्ती खेळाविषयी आवड होती. कुस्तीचे पंच म्हणूनही त्यांनी काम केले आहे. अकलूजमध्ये पर्वतीमंदीराजवळ कुस्तीचे प्रशस्त मैदान तयार करुन घेतले. १९७६ मध्ये महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे ते अध्यक्ष झाले. २२

ते २६ डिसेंबर शंकररावांच्या अधिपत्याखाली अकलूजमध्ये 'महराष्ट्र केसरी' स्पर्धा यशस्वीपणे पार पाडली. कुस्तीगीर परिषदेचे स्वागताध्यक्ष या नात्याने त्यांनी महत्त्वपुर्ण निर्णय घेतले. त्यामुळे तालुक्यातून १९७८ साली तानाजी बनकर, १९८८ साली छोटा रावसाहेब मगर यांनी महाराष्ट्र केसरी हा मानाचा किताब पटकाविला. [५]

- **तमाशा परिषदेचे अध्यक्ष :**

महाराष्ट्र राज्य तमाशा परिषदेचे अध्यक्ष रंगराव पाटील यांच्या निधनानंतर शंकरराव मोहिते पाटील हे तमाशा परिषदेचे अध्यक्ष झाले. अकलूजमध्ये तीन दिवस भरगच्च कार्यक्रम भरविण्यात आला. तमाशा कलाकारांच्या मुलांचे शिक्षण, वृध्द कलाकारांना मानधन, निवासी आश्रमशाळा या समस्यांविषयी मुख्यमंत्र्यांपर्यंत आवाज पोहोचविला.

- **शिवपार्वती बालवृंदावन :**

माळशिरस तालुका परिसरातील संगीतकलेच्या संवर्धनासाठी शिवपार्वती ट्रस्टच्या माध्यमातून शिवपार्वती बाल वादयवृंदाची सुरूवात १९७८ मध्ये केली. शंकरराव कुलकर्णी यांची संगीत शिक्षक म्हणून नियुक्ती केली. पंधरा वर्षापर्यंतची मुले पेटी, तबला, ड्रमसेट, संतूर, बेंझो, सियेंसायझर, बेंजो, खंजिरी इत्यादी अनेक वादये वाजवू लागली. [६]

- **पालखी सोहळा :**

संत ज्ञानेश्वर व तुकाराम यांच्या पालख्या समवेत येणाऱ्या वारकऱ्यांची पाणी, आरोग्य सुविधा, सावली, जेवण या सर्व सुविधा करीत असत. श्री. शंकर सहकारी साखर कारखाना सुरू केल्यानंतर तिथे पालखीच्या स्वागताची परंपरा शंकररावांनी सुरू केली.

## ● मा. नामदार विजयसिंह मोहिते पाटील

माळशिरस तालुक्यातील सहकार चळवळींच्या विकासाचे नेतृत्त्व म्हणून विजयसिंह शंकरराव मोहिते पाटील यांना ओळखले जाते. त्यांचा जन्म १२ जून १९४४ रोजी झाला. शंकरराव मोहिते पाटील हे त्यांचे वडील आहेत. वडीलांनी सहकार चळवळ सुरू केली तर

विजयदादांनी जुन्या संस्था कार्यक्षमपणे चालवून तालुक्यात नवीन सहकारी संस्थांची स्थापना करुन सहकाराचे नवीन जाळे विणले. त्यांचे शिक्षण दहावीपर्यंत झाले. त्यांच्या राजकीय जीवनाची सुरूवात कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून झाली. अकलूज ग्रामपंचायतीचे सरपंच पदापासून ते विविध खात्याचे मंत्री ते उपमुख्यमंत्री पदापर्यंत त्यांनी मजल मारली आहे.[७]

● **सहकार क्षेत्रातील कार्य :**

सन १९७१ ते १९८८ या चार वर्षाच्या काळात सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील यांनी सहकारी साखर कारखाना लि. शंकरनगर- अकलूज या संस्थेचे चेअरमन पद भुषविले आहे. या कालावधीत कारखान्याच्या गाळप संस्थेत वाढ केली. सन १९८४ मध्ये डिस्टिलरी, सन १९९३ मध्ये ॲसिटीक ॲसिड प्रकल्प, शंकरराव मोहिते पाटील स्मृतीभवन, कंपोस्टींग स्क्रिम, मिथेन गॅस प्रकल्प, सभासदासाठी ऊसविकासाच्या व जलसिंचनाच्या विविध योजना इत्यादी प्रकल्प उभारणी केली आहे. याशिवाय श्री. शंकर सहकारी साखर कारखाना लि. सदाशिवनगर या संस्थेचे सन १९७९ पासून सन २००२ पर्यंत गाळपक्षमता२५०० मे. टन प्रतिदिन वाढविण्यात त्यांचा महत्त्वाचा सहभाग आहे.

सोलापूर जिल्हयातील सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहाकारी बँकेचे मार्गदर्शक संचालक म्हणून सन १९७५ पासून काम करीत आहेत. या बँकेच्या तालुक्यामध्ये अनेक शाखा निर्माण करुन सभासदांची व सर्वसामान्य जनेतेची आर्थिक व्यवहारासाठी सोय उपलब्ध करुन दिली आहे.

तसेच शंकरराव मोहिते पाटील सहकारी बँकेचे सन १९७५ पासून मार्गदर्शक संचालक म्हणून काम पाहत आहेत. या बँकेच्या माध्यमातून दादांनी अल्पभुधारक शेतकरी, शेतमजूर, लघुउद्योजकांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन दिले आहे.[८]

● **त्यांनी पुढील सहकारी संस्थांमध्ये सदस्य व मार्गदर्शक म्हणून काम केले आहे.**

**अ) राष्ट्रीय संस्था :**

१)नॅशनल फेडरेशन ऑफ को. ऑप. शुगर फॅक्टरी लि. नवी दिल्ली या संस्थेचे सन १९७१ पासून आजतागायत सदस्य आहेत.

२)नॅशनल हेवी इंजि को.ऑपरटिव्ह लि.पुणे या संस्थेचे सदस्य म्हणून व जुलै १९९७ पासून संचालक म्हणून काम करीत आहेत.

३)वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट मांजरी पुणे या संस्थेचे जून १९८९ पासून मॅनजिंग ट्रस्टी म्हणून काम पाहत आहेत.

४)इंडियन फार्मसी फर्टिलायझर को.ऑप.लि.दिल्ली या संस्थेचे सदस्य व संचालक म्हणून काम पाहेत आहेत.

ब)राज्यस्तरीय संस्था :

१)महाराष्ट्र राज्य सहाकारी साखर कारखाना लिमिटेड मुंबई या संस्थेचे संचालक म्हणून १४ वर्षे काम पाहीले आहे व १९९५ ते डिसें १९९७ या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये साखर संघाचे चेअरमन पद भुषविले आहे.

२)महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.मुंबई या बँकेचे सन १९७१ ते १९८८ पर्यंत सदस्य म्हणून काम पाहत आहेत.

क)माळशिरस तुालक्यातील सहकारी संस्थामध्ये पुढील कार्य केले आहे.

अकलुज परिसरातील खालील सहकारी संस्थांमध्ये कार्य करीत आहे.

| अ.क्र. | तपशिल | पदाचे नाव | कालावधी पासून | पर्यंत |
|---|---|---|---|---|
| १) | स.म.शंकरराव मोहिते | चेअरमन | १/१०/१९७१ ते | १५/०७/१९७५ |
| | पाटील स.सा.कारखाना | चेअरमन | १९-७/१९७९ ते | ३१/५/१९८४ |
| | लि.शंकरनगर अकलूज | चेअरमन | १/६/१९८४ ते | २४/६/१९८८ |
| | | चेअरमन | १४/१०/१९९६ ते | १८/१०/१९९९ |
| | | संचालक | १९/१०/१९९९ पासून | |
| २) | श्री.शं.स.सा.कारखाना | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | सदाशिवनगर | संचालक | १/९/१९७१ ते २६/११/१९७५ |
| | | संचालक | १२/२/१९७९ पासून |
| ३) | राजहंस सहकारी कुक्कुट | संचालक | १/३/१९७३ ते ३१/१२/१९७८ |
| | संघ लि. पोल्ट्रीफार्म | संचालक | २७/४/१९७९ ते ३१/१२/१९८८ |
| ४) | शिवामृत दुध उत्पादक | | |
| | संघ लि.शंकरनगर,अकलूज | मार्गदर्शक | २७/१/१९७६ पासून |
| ५) | ग्रामपंचायत अकलूज | सरपंच | १९६९ ते १९७२ |
| ६) | शिक्षण प्रसारक मंडळ | सरपंच | ६/६/१९९९ ते ८/३/१९९२ |
| | अकलूज | अध्यक्ष | ११/२/१९७९ ते ८/३/१९९२ |
| | | सदस्य | ९/३/१९९२ पासून |
| ७) | शंकरराव मोहिते विद्यालय | सदस्य | ५/३/१९६७ ते ८/३/१९७९ |
| | कर्मचारी मंडळ | अध्यक्ष | ५/३/१९६७ ते ८/३/१९७९ |
| ८) | अकलूज कृषी उत्पन्न बाजार सदस्य | | २७/८/१९७१ ते २२/८/१९७९ |
| | समिती | सभापती | २३/८/१९७९ ते १५/५/१९९७ |
| ९) | सोलापूर जि. मध्यवर्ती | | |
| | सहकारी बँक सोलापूर | संचालक | १६/८/१९७९ पासून |
| १०) | सोलापूर जिल्हा परिषद | अध्यक्ष | १२/८/१९७२ ते १९/६/१९८२ |
| ११) | बेरडवाडी को-ऑ. लिफ्ट | | |
| | इरिगेशन सो. लि. बेरडवाडी | संचालक | १५/७/१९७२ ते ३१/७/१९८२ |
| १२) | विजय गणेशोत्सव मंडळ | | |
| | ट्रस्ट शंकरनगर,अकलूज | अध्यक्ष | १९७९ पासून |
| १३) | प्रा. शिवपार्वती सार्व.वि. | | |
| | ट्रस्ट शंकरनगर,अकलूज | ट्रस्टी | १९७५ ते १९९७ |
| १४) | दि.ग्रीन फिंगर्स स्कूल | | |
| | (रेसिडेन्शियल इंग्लिश स्कूल) | | |

| | | | |
|---|---|---|---|
| यशवंतनगर,अकलूज | चेअरमन | १९७९ | ते १९९६ |
| १५)गिरिजा सहकारी दूध | | | |
| उत्पादक संस्था लि.शंकर | | | |
| नगर | चेअरमन | ८/२/१९७२ | ते २३/९/१९७५ |
| १६)शंकरराव मोहिते-पाटील | | | |
| लि.यशवंतनगर | चेअरमन | ८/२/१९७२ | ते २३/९/१९७५ |
| १७)गौरीशंकर महिला उद्योग | | | |
| सहकारी संस्था लि.शंकरनगर | | | |
| अकलूज | सल्लागार | १९७६ पासून | |
| १८)अकलूज विविध कार्यकारी | चेअरमन | १९६७ | ते १९७५ |
| सहकारी (विकास)सेवा संस्था | संचालक | १९७६ पासून | |
| लि.अकलूज | | | |
| १९)शंकरराव मोहिते सहकारी | संस्थापक | १८/१/१९८० पासून | |
| सूत गिरणी लि.अकलूज | सल्लागार | | |
| २०)रणजित सहकारी कुक्कुट | संस्थापक | १०/१/१९८५ | ते आजतागायत |
| पालन संघ मर्यादित सदाशिवनगर | सल्लागार | | |
| २१)विजय सहाकारी कुक्कुट | | | |
| पालन संघ मर्यादित सदाशिव | | | |
| नगर | संस्थापक | १४/१/१९९८ | |
| २२)शिवस्मृति फलोत्पादक | | | |
| सहकारी संघ लि.अकलूज | संस्थापक | १२/२/१९८६ | |
| २३)शिवकृपा कुक्कुट पालन | संस्थापक | २१/२/१९८७ | |
| उद्योजक सह. सहकारी संघ | मुख्यप्रवर्तक | | |
| लि.अकलूज | संचालक | २१/२/१९८७ | ते २१/२/२००१ |
| २४)सहकार महर्षि शंकरराव | सल्लागार | ११/१/१९८९ | |

| | | |
|---|---|---|
| मोहिते-पाटिल सह.साखर | सदस्य | |
| कारखाना सेवक कल्याण | | |
| निधी | | |
| २५)विजयरत्न सहकारी पशु | संस्थापक | १२/११/१९९३ |
| पक्षी संवर्धन संघ लि.शंकर | मुख्यप्रवर्तक | |
| नगर-अकलूज | | |
| २६)विजयसिंह मोहिते-पाटील | | |
| वाहतूक सहकारी संघ लि. | | |
| अकलूज | संस्थापक | १४/१/१९९३ |
| २७)विजयसिंह मोहिते-पाटील | संस्थापक | ८/६/१९९४ |
| सहकारी संस्था अकलूज | संचालक | |
| २८)सहकार महर्षि शंकरराव | संस्थापक | २०/६/१९९५ ते १८/१०/१९९६ |
| मोहिते-पाटील शेतकरी कल्याण | संचालक | २०/६/१९९५ ते १८/१०/१९९६ |
| निधी ट्रस्ट शंकरनगर,अकलूज | | |
| २९)शंकरराव मोहिते-पाटील | संस्थापक | २०/६/१९९५ ते १८/१०/१९९६ |
| चॅरिटेबल हॉस्पिटल ट्रस्ट | संचालक | |
| शंकरनगर-अकलूज | | |
| ३०)शंकरराव मोहिते-पाटील | संस्थापक | १९/१०/१९९६ ते१९/१०/२००२ |
| सर्व सेवा संघ शंकरनगर- | | |
| अकलूज | | |
| ३१)शिवशंकर मध्यवर्ती सहकारी | संस्थापक व | १९८९ पासून |
| ग्राहक संस्था, अकलूज | सल्लागार [९] | |

**● जयसिंह शंकरराव मोहिते पाटील :-**

माळशिरस तालुक्यामध्ये सहकार चळवळ वाढविणे विकास करण्यामध्ये श्री. जयसिंह शंकरराव मोहिते पाटील यांचे कार्य देखील महत्त्वाचे आहे. त्यांचा जन्म दि. १ डिसें. १९४९ रोजी झाला. परंपरागत व्यवसाय शेती असल्यामुळे तो ते आवडीने जोपासतात. सन १९७२ मध्ये ते बी.ए. (ऑनर्स) ची परिक्षा पास झाले. त्यांच्या राजकीय जीवनाचा प्रारंभ नॅशनल स्टुडन्टस ऑफ इंडीया या आखिल भारतीय स्तरावरील विद्यार्थी संघटनेचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष या निमित्ताने झाला. ते सन १९७४-७६ या कालावधीत या पदावर कार्यरत होते.

त्यांच्या घरात वडील शंकरराव मोहिते पाटील यांच्यामुळे राजकीय व सहकाराचे वातावरण होते. अकलूज ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून १९७४ ते ७९ या काळात काम पाहिले. तसेच १९८५ ते १९९३ या दहा वर्षाच्या काळात काम पाहिले. त्यांना ग्रामपंचायतीच्या माध्यमातुन लोककल्याणाच्या विकासाचे काम कार्यक्षमतेने पार पाडली. कर्मवी बाबासाहेब उद्यान, जयशंकर सार्वजनिक उद्यान, खुले नाटयगृह व मंगल कार्यालये कर्मवीर बाबासाहेब पाटील पुतळा उभारणी, अकलूज नळ पाणीपुरवठा योजना, शॉपिंग सेंटर योजना, श्री छत्रपती शिवाजी महाराज जलतरण तलाव अशी विविध कामे त्यांनी समाजाच्या उपयोगासाठी पुर्ण केली.

**● सामाजिक संस्थाच्या स्थापनेतील कार्य :-**

त्यांनी विविध सामाजिक संस्थाची स्थापना केली आहे. त्या माध्यमातून सहाकाराचे महत्व वाढवून जनतेचा आर्थिक, सामाजिक क्षेत्रात विकास करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी १९६८ प्रताप क्रिडा मंडल, अकलाई देवी देवस्थान ट्रस्ट, शिक्षण प्रसारक मंडळ, सेवक कल्याण निधी ट्रस्ट, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी कारखाना लिमिटेड सेवक कल्याण निधी ट्रस्ट, अकलूज ग्रामपंचायत सेवक कल्याण निधी ट्रस्ट. १९८० मध्ये सहाकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जंयती समितीचे संस्थापक अध्यक्ष हमाल व व्यापारी समन्वय समितीचे अध्यक्ष, आंध्र प्रदेशातील श्री शैहयम येथील श्री

छत्रपती शिवाजी महाराज मेमोरियल ट्रस्ट व संस्थेचे विश्वत कारखाना सेवक कल्याण संस्थेचे संस्थापक, नोकरवर्गाची पतपेढीचे संस्थापक या संस्थेचे स्थापना करुन त्या यशस्वीरित्या चालू ठेवल्या आहेत.

● **सामाजिक संस्थाचे अध्यक्ष व सांस्कृतिक कार्य :-**

श्रीराम सेवा प्रतिपादन, मध्यवर्ती गणेशोत्सव समिती, मध्यवर्ती नवरात्र समिती, महाशिवरात्र यात्रा महोत्सव समिती, शंकरराव मोहिते पाटील सर्व सेवा संघ, गुमास्ता कॉलनी-संग्रामनगर. यावरील सामाजिक संस्थाचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे.

● **क्रिडा व सांस्कृतिक कार्य :-**

वरील ट्रस्ट समिती संस्थाच्या मदतीने श्री. जयसिंह मोहिते पाटील यांनी अनेक विविध प्रकारचे क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम राबविले आहेत. सन १९८२,१९९० मध्ये प्रताप क्रिडा मंडळाच्या वतीने ग्रामीण भागामध्ये प्रथमच राष्ट्रीय स्पर्धेचे नियोजन करुन पार पाडली. तसेच त्यांच्या नेतृत्वाखाली सन १९८५ मध्ये महाराष्ट्राच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त राज्य स्तरीय क्रिडा स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. १९९३ पासून लोककला लावणीस प्रोत्साहन मिळावे, प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून शंकरराव मोहिते पाटील जंयती समितीच्या वतीने जयसिंहाच्या (अधिपत्याखाली) मार्गदर्शनाखाली राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धा भरविल्या जात आहेत. महिला व मुलींसाठी विविध क्रिडा स्पर्धेचे आयोजन करतात. तसेच दरवर्षी बाळदादांच्या कुशल व्यवस्थापना नुसार कुस्त्यांचे मैदान व लेझीम स्पर्धा भरविल्या जातात.

● **सहकार क्षेत्र :-**

जयसिंह मोहिते पाटील यांना सहकाराचा वारसा त्यांचे वडील कै. शंकरराव मोहिते पाटील यांच्याकडून लाभला होता. शंकरराव मोहिते पाटील यांचा वारसा जपत विविध सामाजिक संस्था, सहकारी संस्था यांच्या माध्यमातून सहकाराचे कार्य त्यांनी चालू ठेवले. १९८६ ते १९९६ या काळात शंकरराव मोहिते पाटील या कारखान्याची चेअरमन पदाची धुरा त्यांनी सक्षमपणे पार पाडत सहकाराचा मुलमंत्र आणखीच दृढ करीत कारखान्याची

आधुनिकीकरण, विस्तारीकरण, नवीन डिस्ट्रलरी उभारणी, खत प्रकल्प उभारणी, सभासदांच्या सोयीसाठी गटसेंटर योजना राबविली व कारखान्याचे उत्पादन वाढवून नाव लौकीक वाढविला. सन १९९९-२००० या हंगामासाठी कारखान्यास ऊस विकासाचा उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमतेचा व अधिकारी वर्गास उत्कृष्ट कार्यक्षमतेचा पुरस्कार त्यांच्या सहकारी नेतृत्त्वाचा फायदा आहे.

तसेच जयसिंह यांनी श्री. शंकर सहकारी साखर कारखाना लि. सदाशिवनगर या संस्थेचे १९६३ पासून संचालक असून कारखाना प्रगतीसाठी वेळोवेळी लक्ष देऊन अडचणी सोडवून प्रशासनास योग्य ते कार्यनिर्देश देऊन त्यांना कारखाना यशस्वी होण्यासाठी मदत केली आहे. वन १९८८ मध्ये सुमित्रा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची स्थापना करुन महाराष्ट्र राज्यातील द्वितीय क्रमांकाची पतसंस्था म्हणून नावारुपाला आणली आहे. ते माळशिरस तालुका सहकरी संघाचे सन १९९२ पासून अध्यक्षपद भुषवित आहेत. विजय चर्म सहाकारी चर्मकार पतसंस्थेचे, स्वरुप राणी महिला पतसंस्थेचे, सुमित्रा औदयोगिक सहकारी संस्थेचे ते संस्थापक आहेत. माळशिरस तालुका सहकारी देखरेख संघाचे सन १९९२ पासून अध्यक्षपद भुषवित आहेत. विजय चर्मकार सहकारी पतसंस्थेचे संस्थापक, स्वरुपराणी महिला पतसंस्थेचे संस्थापक, सुमित्रा औदयोगिक सहकारी संस्थेचे संस्थापक आहेत. तसेच कृषिउत्पन्न बाजार समितीचे सभापती पदही त्यांनी भुषविले आहे.

● **शैक्षणिक क्षेत्र :-**

त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात पुढील योगदान दिले आहे.

१) सन १९६९ पासून शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य सन १९७९ पासून कार्यकारी मंडळावर सदऱ्यावर म्हणून काम पाहिले होते.

२) सन १९९२ पासून शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज या प्रतिष्ठित संस्थेचे अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. शिक्षण प्रसारक मंडळाच्या एकूण ७७ विविध शैक्षणिक शाखा कार्यरत असून त्यामध्ये सुमारे २९,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

- **शैक्षणिक व सहकारी क्षेत्रातील विशेष कार्यक्रम व सदस्य :-**

१) शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सन १९९९ मध्ये पिसेवाडी येथे भव्य प्रमाणात आंनदयात्रेचे नियोजन करण्यात जयसिंह मोहिते पाटलांनी परिश्रम घेतले. सद आंनदयात्रेची नोंद लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झालेली होती.

**२) विज्ञान यात्रा :-**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक शास्त्राची व तंत्रज्ञानाची माहिती होण्याचे दृष्टिने अकलूज येथे डिसेंबर १९९९ मध्ये विज्ञान यात्रेचे नियोजन त्यांनी केले.

३) महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि.मुंबई या संस्थेचे सदस्य.

४) महाराष्ट्र राज्य सहकारी सूत गिरणी लि. मुंबई या संस्थेचे सदस्य

५) शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन ऑफ इंडिया या नवी दिल्ली संस्थेचे सदस्य.

६) डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन पुणे या संस्थेचे माजी अध्यक्ष व सध्याचे सदस्य.

७) केंद्र शासनाच्या यार्न व थ्रेड टेकस्टाईल एक्सपोर्ट कमिटिचे सदस्य.

त्यांच्या वरील कार्यावरुन आपणास असे दिसून येते की, माळशिरस तालुक्यातील सहकारी संस्थाच्या स्थापनेत तिच्या विकासामध्ये जयसिंह मोहिते पाटिल यांचे महत्वाचे योगदान आहे.[१०]

## ● श्री. प्रतापसिंह शंकरराव मोहिते-पाटीलः-

माळशिरस तालुक्यातील सहकार चळवळीच्या विकासामध्ये श्री. प्रतापसिंह शंकरराव मोहिते पाटील यांचे योगदान आहे. त्यांचा जन्म २५/०७/१९५७ रोजी झाला. त्यांचे शिक्षण बी.ए.(ऑनर्स) अर्थशास्त्र झाले आहे. त्यांनी १९७५ मध्ये जनसेवा युवक संघटनेची स्थापना करुन तालुक्यात, जिल्हयामध्ये सामाजिक कार्य

उल्लेखनीय केले आहे. तसेच राजकारणाबरोबरच सहकार चळवळीला त्यांनी हातभार लावला आहे.

- **सहकारी संस्थामधील कार्य :-**

१) श्री. शंकर सहकारी साखर कारखाना लि.सदाशिवनगर ता. माळशिरस या कारखान्याचे १९८९ पासून ते २००० पर्यंत चेअरमन म्हणून काम पाहत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली श्री.शंकर सहकारी साखर कारखान्यास खालील पुरस्कार मिळाले.

अ) वसंतदादा शुगर इन्स्टीटयुट, पुणे यांचे सन १९९४-९५ चे जास्तीत जास्त कार्यक्षमतेबद्दल राज्यात पारितोषिक.

ब) सन १९९७-९८ करिता महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि.मुंबई व वसंतदादा शुगर इन्स्टीटयुट, पुणे यांचा उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमतेबद्दल प्रथम पुरस्कार.

रणजित सहकारी कुक्कुट पालन संघ मर्यादित सदाशिवनगर ता. माळशिरस या संघाचे १९८९-९२ या काळात चेअरमन पद भुषविले आहे. त्यांच्या कुशल व्यवस्थापनेमुळे संघास २००२-०३ मध्ये नवी दिल्ली येथे 'राष्ट्रीय रत्न' पुरस्कार मिळाला आहे.

२) शंकरराव मोहिते पाटील सहकारी बँक लि. अकलूज ता. माळशिरस या बँकेचे १९८८-८२ या काळात चेअरमन म्हणून तर १९९२ पासून मार्गदर्शक संचालक म्हणून काम पाहत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली बँकेने नेत्रदिपक प्रगती केली. बँकेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त प्रतापसिंह मोहिते पाटलांच्या सूचनेनुसार १९९९-२००० साठी सभासदांना ५० टक्के डिव्हीडंट वाटण्यात आला.

३) सोलापूर जिल्हा कार्यक्षेत्र असलेली श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील सहकारी पतसंस्थेची स्थापना प्रतापसिंह मोहिते पाटील यांना १९८६ मध्ये

केली. या पतसंस्थेस महाराष्ट्रातील ग्रामीण भागात पहिलाच "आंतरराष्ट्रीय गुणवत्ता आय.एस.ओ." पुरस्कार मिळाला.

४) धनश्री महिला पतसंस्थेची स्थापना १९९२ मध्ये त्यांनीच केली. या पतसंस्थेत सभासद, संचालक, कर्मचारी यासाठी फक्त महिलांना प्राधान्य देण्यात प्रतापसिंहांचा वाटा महत्त्वाचा होता.

५) स्वामी सर्वदानंद अध्यात्मिक ट्रस्ट शिंगणापूर, जि. सातारा येथील कार्यकारी विश्वस्त म्हणून १९९० पासून कार्यरत आहे.

६) सहकार महर्षी शंकरराव मोहिते प्रतिष्टान शंकरनगर अकलूज व याची स्थापना प्रतापसिंह मोहिते पाटील यांनी केली.

७) तसेच महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ पुणे (१९८८-१९९३), महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्यादित मुंबई(१९८९पासून), नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑफ शुगर फॅक्टरीज लि. नवी दिल्ली (१९८९) या संस्थांचे संचालक म्हणून कार्य पाहिले आहे.

**२) शेतकऱ्यांसाठी कार्य :**

त्यांनी शेतकऱ्यांसाठी ठिकठिकाणी कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, पाझर तलाव, बांधुन जलसंधारण कार्यक्रम यशस्वी केला आहे. सोलापूर जिल्हयात ३७६ पाणीपुरवठा व १५०० ठिबक सिंचन योजना कार्यान्वित केल्या आहेत. दुष्काळी परिस्थितीमध्ये जिल्हयात ठिकठिकाणी जनावरांसाठी छावण्या उभ्या केल्या व सेवाभावी संस्थेमार्फत पिण्यासाठीच्या पाण्याचे टँकर मोफत पुरविले. प्रत्येक वर्षी ११ फेब्रुवारी रोजी शेतकरी मेळाव्याचे आयोजन करुन शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतात.

**३) विद्यार्थ्यांसाठी कार्य :**

विद्यार्थ्यांच्या विकासाला वाव देण्यासाठी प्रतिवर्षी गरजु, गरीब विद्यार्थ्यांसाठी गणवेश व शालेय साहित्याचे वाटप योजना सुरू केली आहे. कुस्ती क्रिडा प्रकाराला प्रोत्साहन देण्यासाठी 'पहिलवान अनुदान योजना' सुरू केली. १९९१ मध्ये नातेपुते येथे

विजयसिंह मोहिते पाटील महाविद्यालय स्थापन करुन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी सोय उपलब्ध करुन दिली.

**४) भटक्या विमुक्त जातीसाठीः-**

(स्वतःच्या सहकारी संस्थेमार्फत)

महाराष्ट्र प्रथम स्वतःचे पतसंस्थेमार्फत प्रतापसिंह यांनी भटक्या विमुक्त समाजातील मागासलेल्या बांधवांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे या उद्देशाने विनाजमिन, विनातारण कर्ज पुरवठा करण्यात येतो. गोधंळी, शाहीर, वाघ्या-मुरळी लोकनाटया, डोंबारी वगैरे सर्व प्रकारच्या पारंपारिक कलेला उत्तेजन देणेसाठी सर्वतोपरी साहाय्य करतात.

**५) युवक चळवळीच्या माध्यमातून सामाजिक संघर्षः-**

१) उजनी धरणाचे पाणी माढा तालुक्यास दुष्काळी भागास मिळणेसाठी जन आंदोलन.(१९८७)

२) करमाळा, माढा, इंदापूर तालुक्यास योग्य दाबाने वीज पुरवठा होणेसाठी रास्ता रोको आंदोलन व सायकल मोर्चा (१९८८).

३) एस.टी. महामंडळाकडून प्रवासांना उत्कृष्ट सेवा व सवलती मिळणेसाठी चाकबंद आंदोलन (१९९८).

४) सुशिक्षित बेरोजगारांसाठी रोजगाराची संधी उपलब्ध होण्यासाठी समाज कल्याण अधिकारी व रोजगार विनिमय केंद्र यांचे कार्यालयावर मोर्चा.

**६) सामुदायिक विवाह व हुंडाबंदीः-**

सन १९८८ मध्ये जिंती ता.करमाळा व माळशिरस, जि.सोलापूर येथे विनाहुंडा आंतरजातीय व सामुदायिक विवाहाचे आयोजन तसेच १९९३ मध्ये मोठया संख्येने सदाशिवनगर जि.सोलापूर येथे सामुदायिक मोफत विवाह सोहळयाचे आयोजन केले.[११]

**● श्री.विष्णुपंत विठ्ठलराव कुलकर्णीः-**

माळशिरस तालुक्याच्या पश्चिम भागामध्ये सहकार चळवळी विकसित होण्यामध्ये श्री.विष्णुपंत विठ्ठलराव कुलकर्णी यांचे नेतृत्व कारणीभुत ठरले. त्यांचा जन्म ०९/०६/१९३२ रोजी झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण हरिभाई देवकरण प्रशाला सोलापूर येथे झाले. बृहन महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स या ठिकाणी इंटर कॉमर्स शिक्षण झाले आहे.

**● सार्वजनिक कार्याची सुरवातः-**

मारुतीनाना कुलकर्णी यांच्या प्रेरणेतुन विष्णुपंत कुलकर्णी यांनी कॉलेजच्या जीवनात आखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्ता. त्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भक्कम अशा प्रकारचे कार्य त्यांनी केली आहे.

**● शैक्षणिक कार्यः-**

माळशिरस सारख्या ग्रामीण भागातील गोरगरीब शेतकऱ्यांच्या मुलामुलींना बाहेरगावी जावून शिक्षण घेणे परवडत नव्हते. येथेच उच्च दर्जाचे शिक्षण त्यांना मिळावे त्यांचे जीवनमान उंचवावे या उद्दशाने श्री. हनुमान शिक्षण प्रसारक संस्थेच्या माध्यमातुन पुर्व प्राथमिक, प्राथमिक माध्यमिक उच्च, माध्यमिक सिनियर कॉलेज हे विभाग सुरु केले आहेत. शाळेत शिकणाऱ्या प्रत्येक मुलांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे हे ध्येय समोर ठेऊन संस्थेला प्रगतीपथावर नेण्याचे काम केले. या संस्थेतुन अनेक विद्यार्थी तयार होऊन उच्च पदावर कार्यरत झाले आहे. त्यामुळे माळशिरस शेजारच्या खेडयातील विद्यार्थी शैक्षिणक समस्या सुटल्या आहेत.

**● किसान संघः-**

शेतकऱ्याच्या अडीअडचणी, प्रश्न सोडविण्यासाठी भारतीय किसान संघाचे कार्यकर्ता पासून ते महाराष्ट्र प्रदेश प्रातांचे उपाध्यक्ष पदापर्यंत त्यांनी काम केले. कॅनॉलचे पाणी, विद्युत पुरवठा, शेतमालाचे बाजार भाव या प्रश्नाविषयी अधिवेशने,

तालुका मेळावे, ग्रामसभा, वेळोवेळी आंदोलने, निवेदने, मोर्चा काढून शेतकऱ्यांचे प्रश्नावर आवाज उठविला.

● **श्री.हनुमान मोफत वाचनालयः-**

माळशिरसमधील नागरिकांना वाचनाची सवय लागावी, बौधिक तहान भागविणे, सांस्कृतिक विकास व्हावा या उद्देशाने स्थापन १९५३ साली झालेल्या श्री.हनुमान मोफत वाचनालंयाच्या स्थापनेत व विकासामध्ये विष्णूपंत कुलकर्णी यांचा महत्त्वांचा हातभार आहे. आज या वाचनालयाची स्वतःची सुसज्य इमारत व व्यापारी संकुल स्वंतत्र स्वरुपात आहे. वाचनालयातील ग्रंथ संग्रह २५,००० इतका आहे. विष्णुपंताच्या सहकार्य व मागदर्शनामुळे हनुमान मोफत वाचनालय जिल्हयात नावारुपाला आलेले आहे.

● **व्यापारी संकुलः-**

बेरोजगारी व बेकारी कमी व्हावी म्हणून त्यांनी व्यापारी संकुलाची कल्पना मांडली. माळशिरस येथील आहिल्यादेवी चौक, पुणे पंढरपूर रस्त्यावर ३६ गाळे व मारुती मंदीराशेजारी २० गाळे बांधून बेरोजगांराना त्यातुन उद्योगधंदे करण्याची संधी उपलब्ध करुन दिली आहे.

● **राजकीय कार्यः-**

माळशिरस गावचे १९६८ ते १९७७ या काळात त्यांनी सरपंच पद भुषविले आहे. सरपंच असताना पाणीपुरवठा, नळ योजना आखणी करुन कार्यान्वित केली. गावातील जनतेला प्रथमच नळाद्वारे पाणी मिळवून दिले. तसेच पंचायत समिती सदस्य म्हणून कार्य केले आहे.

● **सहकार क्षेत्रातील कार्यः-**

१) विविध कार्यकारी सेवा संस्था या पतसंस्थेच्या स्थापना करुन तिच्यात वाढ व्हावी म्हणून प्रयत्न केले. ही संस्था माळशिरस मध्ये अग्रगणी आहे.

**२) माळशिरस नागरी पतसंस्थाः-**

पतसंस्थेची स्थापना त्यांनी दि.२७/०३/१९८७ साली केली. संस्थेतला कारभार पारदर्शक असून संस्थेच्या भाग भांडवल, सभासद कर्ज, यासाठी विष्णुपंत कुलकर्णी यांनी महत्वाचे काम केले आहे.

**३) शिवकृपा कुक्कुट पालन संघः-**

शिवकृपा कुक्कुट पालन संघाच्या स्थापनेपासून ११/२/१९८७ पासून ते आजतागायतपर्यंत संघाचे चेअरमन आहेत. अडचणीच्या काळात संस्था चालवून संस्था नावारुपाला आणली आहे. संघाचे कामकाज कार्यक्षम व काटकसरीने चालवून अंडी उत्पादन मोठया प्रमाणात वाढविण्यात त्यांचा सहभाग होता. त्यामुळेच राष्ट्रीय उत्पादकता पारितोषिक भारताचे राष्ट्रपती मा.श्री.के.आर.नारायण यांचे हस्ते संस्थेला मिळाले.

- **हनुमान व्यावसायिक सहकारी दूधसंस्थाः-**

या संस्थेची स्थापना विष्णुपंत कुलकर्णी यांनी १९८७ मध्ये केली. शिवमृत दूध संघाला दूध पुरविठा करुन स्थानिक दूध उत्पादक सभासदाला योग्य दर मिळवून देण्यामध्ये या संस्थेचा हातभार आहे.

- **शंकर सहकारी स्थापनेच्या कामात सहभागः-**

तालुक्याच्या पश्चिम भागातील शेतकऱ्यांच्या उसाच्या गळितासाठी एक कारखाना असावा या उद्देशाने श्री.विष्णुपंत कुलकर्णी यांच्या प्रयत्नामुळे कै.शंकरराव मोहिते पाटील यांनी चितळे कंपनीकडून कारखाना विकत घेऊन सदाशिवनगर येथे १९६८ साली कारखाना सुरु केला. विष्णुपंत कुलकर्णी हे शंकर सहकारी कारखान्याचे स्थापनेपासूनचे संचालक व या कारखान्याचे उपाध्यक्ष म्हणूनही सुस्थितीत आणण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. ते उपाध्यक्ष असताना स्वच्छ कारभाराच्या जोरावर कारखान्यास गुणवत्ता पुरस्कार मिळाला.[१२]

### ● कै. बापूराव तुळशिराम सिदः-

माळशिरस परिसरामध्ये सहकारी चळवळीमध्ये कै. बापूराव तुळशिराम सिद यांचे योगदान आहे. त्यांचा जन्म दि.१४/०६/१९५२ रोजी एका अशिक्षित कुंटुबात झाला. लहानपणासून त्यांना सामाजिक व राजकीय कार्याची आवड असल्यामुळे त्यांचे शिक्षण ७ वी पर्यंत झाले. माळशिरस परिसरातील शेतकऱ्यांना पाणी मिळत नसल्यामुळे शेतीचा फारसा विकास झाला नव्हता. कै. बापूराव सिद यांनी धर्मपुरी येथील मुख्य हेडअॅप कॅनाल फोडून आणले. त्यानंतर उसाचे क्षेत्र वाढले. सहकार चळवळीला पोषक असे वातावरण तयार झाले. उस, दुध हे उपलब्ध होण्यास मदत झाली.

**● राजकीय कार्यः-**

माळशिरसचे सन १९८०-८५ या काळात सरपंच पद त्यांनी भुषविले. त्यांच्या ५ वर्षाच्या काळात पाणीपट्टी व घरपट्टी पेडिंग न ठेवता गरज भासल्यास स्वतःलोकांच्या रक्कमा भरल्या. तसेच स्वतःच्या मालकीची जागा ग्रामपंचायतला पाण्याची टाकी बांधण्यासाठी बक्षीस पत्र दिले.

**● शैक्षणिक कार्यः-**

त्यांनी गोरगरीबांच्या मुलांना चांगले शिक्षण घेता यावे म्हणून माळशिरस प्रशाला माळशिरस या शाळेच्या उभारणीसाठी फार मोठे योगदान दिले.

**● जिनिंग मिलः-**

माळशिरस परिसरातील शेतकऱ्यांच्या कापसाला चांगला भाव मिळावा म्हणून आहिल्यादेवी जिनिंग कापसाची मिल स्थापन केली.

**● दुध संकलन संस्थाः-**

दुध उत्पादन वाढावे, लोकांना दुध व्यवसायाची आवड निर्माण करणेसाठु बंगलोरहून १९८० मध्ये गायी व म्हैस खरेदी करुन वाटप केले. त्यांनी

१) धुळदेव दुग्ध व्यावसायिक संस्था मर्या. सिदाचीवाडी.

२) जय मल्हार दुध व्यावसायिक संस्था, देशमुखपट्टा या दोन दुध संकलन संस्था काढल्या. आज या दोन संस्था मोठया जोमाने कार्यरत आहेत.

त्यांच्या पश्चात्य त्यांच्या कुंटुबीयांनी कै. बापूराव सिद सहकारी पतसंस्था, धुळदेव व विविध विकास कार्यकारी सोसायटी, बापूराव सिद दुध संस्था, घोगंडी उत्पादक सहकारी संस्था, पाणी पुरवठा संस्था, मजुर सहकारी संस्था यांची स्थापना केली आहे. त्या सर्व संस्था सुव्यवस्थित चालतात.[१३]

● **कै. ज्ञानेश्वर संतराम सालगुडे - पाटील**

माळशिरस तालुक्याच्या पश्चिम भागातील चळवळीचे विकासामध्ये कै. ज्ञानेश्वर संतराम सालगुडे पाटील यांचे महत्त्वाचे योगदान आहे. माळशिरसच्या पश्चिम भागामध्ये शैक्षणिक, सामाजिक, राजकिय, क्षेत्रामध्ये ते कार्य करीत होते.

कार्याची सुरूवात : कै. सालगुडे - पाटील अण्णांच्या कार्याची सुरूवात पुरंदावडे गावच्या सरपंच पदापासून झाली. सतत २५ वर्षे सरपंच म्हणून बिनविरोध निवडून येण्याचा उच्चांक कै. पाटील यांनी केला. पुरंदावडे गावचा विकास हाच ध्यास मनाशी बाळगून २५ वर्षे सरपंच पदाच्या माध्यमातुन विकासकार्याची गंगा पुरंदावडे गावच्या झोपडीपर्यंत आणली.

● **शैक्षणिक कार्य :** सदाशिवनगर व पुरंदावडे परिसरातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहु नये म्हणून कै. सालगुडे पाटील यांनी प्राथमिक शिक्षणाच्या सोयीसाठी ग्रामस्थांच्या सहकार्याने ११९० पर्यंत खोल्यांची स्लॅबची इमारत बांधली. एक शिक्षकी असलेली ३० वर्षापुर्वीची शाळा आज १६ शिक्षकी झालेली आहे. प्राथमिक शिक्षणाबरोबरच माध्यमिक शिक्षणाची सोय व्हावी. म्हणून सदाशिवनगर येथे कै. बाबासाहेब पाटील विद्यालय या नावाने माध्यमिक विद्यालयाची स्थापना केला. या शाळेत ५वी पासून १२वी पर्यंत वर्ग चालु आहेत.

● **दुध संकलन केंद्र :** कै. शंकरराव मोहिते पाटील यांचा घरटी एक जर्सी गाय हा मंत्र कै. सालगुडे - पाटील यांनी जोपासला. जर्सी गाय घेण्याविषयी लोकांना प्रोत्साहन दिले.

माळशिरसच्या पश्चिम भागात प्रथम दूध संकलन केंद्राची सुरूवात करुन पुरंदावडे येथे दूध व्यावसायिकांची सोय केली.

● **श्री. शंकर साखर कारखान्याच्या निमित्ताने योगदान :** कै. सालगुडे पाटील यांनी या कारखान्याचे संचालक, उपाध्यक्ष आणि चेअरमन म्हणून जबाबदारी पार पाडलेली आहे. कारखान्याच्या स्थापनेच्या प्रक्रियेत व विकसासामध्ये त्यांनी हातभार लावला.

इतर कार्ये : सहकारी संस्थांची वाढ व्हावी, पंचायत समितीचे उपसभापती, दूध डेअरीचे चेअरमन, शेतकरी बँकेचे व्हाईस चेअरमन या पदांचा उपयोग करुन सभासदांच्या अडीअडचडी सोडवून सामाजिक, आर्थिक, क्षेत्रात मदत केली.

● **व्यायामशाळा :** कै. बाबासाहेब पाटील यांच्या नावे कै. ज्ञानेश्वर पाटील यांनी व्यायामशाळा स्थापन करुन कुस्तीगीरांना प्रोत्साहन दिले. त्यांच्या या कार्यामुळेच या व्यायामशाळेतील तानाजी बनकर हा महाराष्ट्र केसरी बनला. ज्ञानदेव केसरी हा कामगार केसरी(१९९९) मध्ये झाला. त्यांनी आपले कौशल्य संघटनेतुन शेतकऱ्याचा मुलगा शेतकरी बनावा ही कल्पना साकार केली. एकंदरीत माळशिरस तालुक्याच्या पश्चिम भागामध्ये सहकार चळवळ सुरूवात करुन वाढविणे, रुजविण्यामध्ये कै. ज्ञानेश्वर संतराम सालगुडे पाटील यांचा महत्त्वाचा वाटा आहे.[१४]

थोडक्यात माळशिरस तालुक्यामध्ये सहकार चळवळ स्थापन करुन रुजविण्यामध्ये व वाढविण्यामध्ये , विकास करण्यामध्ये कै. शंकरराव मोहिते-पाटील, श्री. जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, ना. विजयसिंह मोहिते-पाटील, श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री. विष्णुपंत कुलकर्णी, कै. बापुराव तुळशिराम सिद व कै. ज्ञानेश्वर संतराम सालगुडे-पाटील, कै. नानासाहेब विठोबा मगर यांच्या नेतृत्त्वाचा फार मोठया प्रमाणात हातभार असलेला दिसून येतो.

## संदर्भ सूची:-


१) हरिश्चंद्र मगर, महाराष्ट्राचे शिल्पकार शंकरराव मोहिते-पाटील, प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई जाने. २०१० पृ.६६

२) प्रमोद जोशी, परिसस्पर्श, प्रथमावृती – १९९७ पृ.

३) प्रमोद जोशी, परिसस्पर्श, प्रथमावृती – १९९७ पृ.

४) हरिश्चंद्र मगर, महाराष्ट्राचे शिल्पकार शंकरराव मोहिते-पाटील, प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई जाने. २०१० पृ.६६

५) प्रमोद जोशी, परिसस्पर्श, प्रथमावृती – १९९७ पृ.३४८-३४९

६) प्रमोद जोशी, परिसस्पर्श, प्रथमावृती – १९९७ पृ.३५९

७) संपादक ला. रा. साळुंखे, जाणीव (नियतकालीक) प्रकाशक विनायक आर्टस पुणे. २००२ (पृ३०)

८) संपादक ला. रा. साळुंखे, जाणीव (नियतकालीक) प्रकाशक विनायक आर्टस पुणे. २००२ (पृ.३५)

९) संपादक ला. रा. साळुंखे, जाणीव (नियतकालीक) प्रकाशक विनायक आर्टस पुणे. २००२ (पृ.४१,४२,४३)

१०) निर्णय, संपादक- लारा साळुंखे, प्रकाशक- विनायक आर्टस पुणे. पृ-५,६,७,८

११) 'साप्ताहिक आनंदयात्री' संपादक चंद्रकांत कुंभार, वाढदिवस विशेषांक, दि.२५/०६/०७ ते १/७/२००७ पृ.७,८,९

१२) सुवर्णभरारी 'अमृतमहोत्सव स्मरणिका', प्रकाशक, सुभाष देशमाने, संपादक- नागन्नाथ राऊत, सन-२००७

१३) सचिन सिद, मु.पो. माळशिरस यांनी दिलेल्या दि. २०/१२/२०१० रोजी दिलेल्या माहितीवरुन.

१४) दै. सकाळ, बुधवार २३ जून १९९९ पृ.१८

# प्रकरण ५वे:

# ● उपसंहार ●

आधुनिक काळामध्ये इतिहासलेखनातील बदलत्या प्रवाहामुळे इतिहासाच्या शाखेमध्ये बदल होत आहे. त्या बदलांना अनुसरून संशोधकानेही संशोधनासाठी स्थनिक इतिहासाच्या दृष्टीने प्रस्तूत विषय निवडला आहे. वरील दृष्टीकोन ठेवण्याचे कारण की, बऱ्याच वेळा संबंध जगाचा, देशाचा इतिहास माहित असतो. परंतु आपल्या सभोवतालचा इतिहास माहित नसतो. त्यामुळेच संशोधकाने आपल्याच परिसराची माहिती गोळा केल्यामुळे त्याचा उपयोग निश्चित स्थानिक विकासासाठी होईल असा स्थानिक इतिहासाचा प्रकार विशेषतः फ्रेंच राज्यक्रांतीनंतर प्रसिध्दीस आला. तर भारतात ब्रिटीश काळात डिस्ट्रीक गॅझेटिअरच्या लेखनातून सुरू झाला. व ही परंपरा आजही दिसून येते. त्यामुळे स्थानिक इतिहासाचे महत्त्व समजून या संशोधनाचा जास्तीत जास्त समाजासाठी उपयोग व्हावा या हेतूने हा प्रबंध निवडला आहे. स्थानिक इतिहासाबाबत रेनियर म्हणतात, "स्थानिक इतिहास हा अशा पध्दतीने लिहला पाहिजे की, देशाच्या इतिहासामध्ये चपखल बसला पाहिजे. स्थानिक इतिहासामध्ये सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक बाबींचा समावेश असणे अगत्याचे आहे."

मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. या समाजशास्त्रीय सिध्दांताचा मध्येच सहकाराचा उगम आहे. कारण समाज हा कधीही एका व्यक्तीने तयार होत नाही. तो अनेक व्यक्ती एकत्र आल्याशिवाय समुह अथवा समाज ही संज्ञा धारण करु शकत नाही. आणि असा समाज परस्पर सहाकार्य केल्याशिवाय अस्तित्वात येऊ शकत नाही. सहकार हा इतका आदीम आहे. परंतु रुढ अर्थाने अशा अवस्थेस सहकार चळवळ असे संबोधता येत नाही. आजच्या अर्थाने सहकार चळवळींचा उदय १९ व्या शतकामध्ये इंग्लंडमध्ये झाला. औद्योगिक क्रांतीमधून निर्माण झालेल्या समस्यांवर उपाय म्हणून सहकाराची निर्मिती झाली आहे. कामगारांना मिळणारे वेतन अतिशय तुटपुंजे होते त्यामुळे अशा कागगारांनी एकत्रित येऊन माल खरेदी केला व तो स्वतःच कामगारांना विकल. असे करताना जो नफा झाला तो पुन्हा सभासदांना सेवा देण्यासाठीच वापरला अशा प्रकारे परस्परांचा बचत व

सहकार्यातून स्वतःच्या जीवनावश्यक गरजा भागवता येतात. हे लक्षात घेऊन सहकाराचा उगम झालेला दिसतो.

"एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ." या सुभाषितावर सहकाराची तत्वे आधारलेली आहेत. सहकार याचा नेमका अर्थ असा की, सर्वांच्या हितासाठी एकत्र कार्य करणे होय. 'एकी हेच बळ' या तत्तवानुसार आपल्या समान गरजा भागविण्यासाठी, समान हेतूने लोक एकत्र येतात. परस्पर सहकार्य, स्वावलंबन, काटकसर, सहाय्य व स्वार्थत्याग लोकशाही कारभार या वृत्तीतून आपल्या सर्वांगिण विकासासाठी अने व्यक्ती स्वेच्छेने एकत्र येतात. समान हक्क, समान दर्जा, नफा तोटयाची समान वाटणी इत्यादी तत्त्वे इत्यादी तत्त्वे मान्य करुनच सहकाराची संस्था अस्तित्त्वात येतात. सहकार्यामुळे समाजाची आर्थिक व सामाजिक प्रगती होते. आधुनिक संस्कृत्यांचा विकास सहकार्यामुळेच झालेला आहे.

भारतातील सहकारी चळवळ इ.स. १९०४ मध्ये झाली. आज तिला जवळजवळ १०६ वर्षे पुर्ण झाली आहेत. ही चळवळ प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या गरजा पुर्ण करण्यासाठी ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास घडवून आणण्यासाठी सहकाराशिवाय पर्याय नाही असे अनेक समित्यांनी व तज्ञांनी सांगितले. ही गोष्ट लक्षात घेऊनच सहकाराचा विकास करण्याचा प्रयत्न साल. भारतात स्वांतत्र्यप्राप्तीनंतर पंचवार्षिक योजनामधून सहकाराला प्रोत्साहन देण्यात आले. त्यामुळे विविध क्षेत्रात सहकारी चळचळ वेगवेगळया अंगानी विकसित झाली आहे. भारतामध्ये सहकाराचा विकास मोठया प्रमाणात महाराष्ट्र, तामिळनाडू, गुजरात, केरळ या राज्यातील बहुतेक सर्वच खेडयातून सहकारी संस्थाचे जाळे पसरल्यामुळे झाला आहे.

आज ग्रामीण भागातील या सहकारी ग्रामीण जनतेला विविध प्रकारच्या सेवा व वस्तू यांचा पुरवठा करत आहेत. इतकेच नव्हे तर ग्रामीण भागातून विविध प्रकारच्या सहकारी संस्था शेती व्यवसायाला पुरक ठरतील असे इतर अनेक व्यवसाय करण्याकरिता उदा. कुक्कुटपालन, दूग्ध व्यवसाय इ. वेगवेगळया प्रकाराच्या संस्था स्थापन केल्या आहेत. सन १९९९-२००० मध्ये भारतात सर्व प्रकारच्या सहकारी संस्थाची संख्या ५२,८२,४७

लाख एवढी होती तर सर्व संस्थातील एकून सभासद संख्या २००९ दशलक्ष एवढी होते. म्हणजेच सहकारी चळवळीची मोठी प्रगती झाली आहे. महाराष्ट्रात सन १९६१ मध्ये व ३१,५६५ लाख एवढया सहकारी संख्या होत्या तर २००० मध्ये संख्या १६,७२६६ लाख एवढी झालेली होती.

दुर्बलांचे शोषण, सप्पंतीचे विषम वाटप, वर्ग सघंर्ष, राजकीय लढे, इर्षा. या सर्वाचाच लोप सहकारात होत असल्याने बंधुता आणि समानता यावर आधारलेला नवसमाज निर्माण करण्यासाठी सहकारी चळवळीसारखे दुसरे साधन नाही. सहकारामुळे दुर्बल घटकांची आर्थिक प्रगती साध्य केली जाते, संप्पतीचे समान वाटप करुन विषमता टाळली जाते मध्यस्थांची उचलबागंडी केली जाते, ग्राहकाच्या हिताचे रक्षण केले जाते, कामगारांना रोजगारात स्थैर्य लाभते, मालक व नोकर वर्ग या व्यवस्थेत तणाव निर्माण होत नाही. व्यक्तिविकासातून सामाजिक विकास साधला जातो. आदर्श समाज व्यवस्था निर्माण होते, समाजाचे शांतातमय परिवर्तन घडवून आणता येते. परस्पर सहकार्याची भावना निर्माण होते. एकंदरीत एकमेकांस सहाय्य करुन स्वतःचा उद्धार करुन घेणे हाच सहकाराचा पाया असल्यामुळे प्रत्यके सभांसदास एकत्र राहण्याचे, एकत्र काम करण्याचे व एकत्रित आव्हाने स्वीकारण्याचे शिक्षण मिळेत. अशा विविध फायद्यामुळेच जनतेला जीवनाचे धडे देणारे विद्यालय असे सहकारी संस्थानी वर्णन केले आहे, ते बव्हतांशी खरे आहे.

महाराष्ट्रातील सर्वात जास्त अवर्षणग्रस्त तालुक्यातील एक असलेला माळशिरस तालुका, तसेच स्वांतत्र्यलढयाच्या काळापासून कॉग्रेसचे ( मोहीते पाटील ) नेतृत्व या तालुक्याला लाभलेले आहे. या पार्श्वभुमीवर माळशिरस तालुक्यातील सहकार चळवळीचा अभ्यास करणे गरजेचे आहे. माळशिरस तालुक्याच्या उत्तर भागातून बारमाही नदी वाहत असली तरी पश्चिम भागात शेतीसाठी व जनतेच्या पिण्याच्या पाण्याची समस्या भेडसावत असते. तालुक्यातील पिकाऊ जमीनीचे क्षेत्र जास्त असले तरी, जमीन ही मुख्यतः ओसाड व माळरानाची आहे. तरीही पाट, कालवा यामुळे व आधुनिक तंत्रज्ञानाच्या ( ठिंबक सिचंनाच्या ) वापरामुळे शेतीचे उत्पन्न वाढ लागले आहे. तालुक्यात सहकारी संस्थेच्या

माध्यमातून औद्यागिक विकासाठी पोषक वातावरण आहे. वरील सर्व पार्श्वभुमी पाहता या तालुक्यातील सहकारी चळवळीचे मुल्यमापण करणे गरजेचे आहे.

मागील ५० वर्षातील माळशिरस तालुक्यातील सहकार चळवळीचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की, या काळामध्ये सहकारी संस्थाची संख्यात्मक व गुणात्मक वाढ फार मोठया प्रमाणात झालेली आहे. इ.स. १९५० मध्ये एकूण ३१ सहकारी संस्था अस्तीत्वात होत्या.

सन २००० मध्ये तालुक्यातील एकूण सहकारी संख्याची संख्या ७२३ झालेली आहे. या कालावधीमध्ये सहकारी संख्याची फक्त संख्यात्मक वाढ न होता सहकारी संस्थाचे विविधिकरण मोठया प्रमाणात झालेले आहे. यावरुन उत्पादन, सेवा, प्रक्रिया अशा सर्व कार्यामध्ये व विविध प्रकारच्या सहकारी संस्थाचा विकास झालेला दिसतो. १९८० पासून सर्व प्रकारच्या सहकारी संस्थाची गुणात्मक व संख्यात्मक वाढ मोठया प्रमाणात झालेली आहे. ग्रामपातळीवरील विविध कार्यकारी सेवा संस्थाची वाढ व विकास स्वाभाविक दिसून येते. कारण केंद्र व राज्य सरकारच्या शेतीविषयक पतपुरवठयाच्या योजनेअंतर्गत सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून या सेवा संस्था तालुक्यात मोठया प्रमाणात निर्माण झालेल्या आहेत. सर्व प्रकारच्या सहकारी पतसंस्था या १९९० पासूनच्या काळात निर्माण झालेल्या आहेत. तसेच शेतकरी सहकारी बँक व गहिनीनाथ सहकारी बँक या दोन नागरी बँकाचे देखील कार्य उल्लेखनीय आहे. एकंदरीत मोठया प्रमाणावरील पतसंस्थाच्या वाढीमुळे ग्रामीण व शेतकरी वर्गबरोबरच शहरी विविध क्षेत्रातले नोकर छोटे व्यापारी व्यावसायिक यांनाही आपल्या आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी, आर्थिक व्यवहार करण्यासाठी सहकारी पतसंस्था, नागरी बँक, कारखाना, दूध संघ यांच्या मार्फत आपला विकास करुन घेतला आहे. तालुक्यातील वेगवेगळया कामावरती मजुरवर्ग मोठया प्रमाणावर काम करत असतो. यामुळे मजुर सहकारी संस्थाचीही वाढ या काळामध्ये फार झपाटयाने झालेली आहे. या मजुर सहकारी संस्थामुळे मजूरामध्ये संघटितपणा निर्माण होऊन खाजगी संस्था कत्रांटदार यांच्याकडून मजूरांच्या शोषणाला निश्चित आळा बसला आहे.

तालुक्याच्या एकूण आर्थिक प्रगतीमध्ये सहकारी चळवळीचे योगदान इतर घटकांपेक्षा निश्चितच जास्त आहे. दुष्काळी तालुका व उद्योग वाढीसाठी अनुकूल परिस्थिती नसल्याने या पार्श्वभूमीवर जनतेच्या आर्थिक जीवनामध्ये सहकाराने महत्त्वाची केंद्रीभूत भूमिका बजावलेली आहे. तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये वि.का.सेवा संस्था आहेत. त्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना, अल्पभूधारकांना विविध कारणांसाठी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून कर्ज पुरवठा उपलब्ध करुन दिला. कमी व्याजाने कर्जपुरवठा उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांची सावकारशाहीतून सुटका होण्यास मदत झाली. सेवा संस्था व विविध पतसंस्थांमधून सुलभ व्याजाने व स्थानिक पातळीवर कर्जपुरवठा झाल्याने शेतीमाल गुंतवणूकीत वाढ होऊन, शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञानाच्या वाढीस चालना मिळाली. शेतीतील प्रयोगशिलतेस वाव मिळून तालुक्यात डाळींब द्राक्षे यासारख्या फळबागा वाढीस मोठया प्रमाणात चालना मिळाली. जास्त प्रमाणात ऊस लागवडीचे क्षेत्र मोठया प्रमाणात वाढले. परिणामी शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे.

सहकारी ग्राहक भांडारे तसेच शेतीमधून पुरवठा संस्था, यामुळे शेतकऱ्यांना व इतर जनतेला जीवनावश्यक वस्तू, तसेच शेतीसाठी बी बीयाणे औषधे खते योग्य किंमतीत उपलब्ध होत आहेत. साखर कारखाने, सुतगिरणी, दूध संघ, कुक्कूट पालन संघ,
यामुळे मोठया प्रमाणात स्थानिक पातळीवर रोजगार निर्माण होऊन बेरोजगारांना काम मिळाले आहे. येथील सर्वात मोठे म्हणजे यशवंत सहकारी कारखाना, शंकर सहकारी कारखाना, पांडूरंग सहकारी कारखाना, शिवामृत दूध संघ, ४ कुक्कूट पालन संघ, सुमित्रा पतसंस्था, शंकरराव मोहिते पाटील बँक हे सर्व सहकारी तत्त्वावर चालविले जातात. यावरुन तालुक्याचे सहकारचे महत्त्व दिसून येते. तालुक्यातील प्रत्येक गावात दूध संकलित करुन शिवामृत दूध संघाला दूध पुरविणाऱ्या संकलन संस्था आहेत. त्यामुळे दूध व्यवसायामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. प्रत्येक घरामध्ये जर्सी गाय असल्यामुळे रोख दुधाचे पैसे उपलब्ध होत आहेत. येथील लोकांचे स्थलांतर स्थानिक रोजगार मिळालेने कमी झाले आहे.

सध्या विदर्भात(महाराष्ट्र) शेतकऱ्यांचे आत्महत्येचे दुर्दैवी सत्र फार मोठया प्रमाणात वाढले आहे. परंतु माळशिरस तालुक्यामध्ये कर्जापोटी शेतकऱ्यांची आत्महत्या झाली नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सहकारी चळचळींच्या माध्यमातून येथील ऊस उत्पादन, दूध उत्पादन, पतसंस्था, उद्योगधंदे यामध्ये झालेली वाढ होय. कारण दुध व्यवसायामुळे लहान लहान  शेतकरी भूमीहीन यांना उत्पन्नाची निश्चित हमी मिळाली आहे.

येथील सहकारी चळवळींमुळे आर्थिक लाभाबरोबरच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, लाभ होऊन जीवनमान उंचावले आहे. या चळवळींमुळे लोकांना सामाजिक तत्वावर राहण्यास शिकविले, उधळपट्टी, जुगार चांगल्या सहकारी संस्थामुळे कमी झाल्या. सहकारामुळे एकात्मता, बंधुता व मेहनतीची जाणीव निर्माण झाली व सामाजिक नैतिक लाभ प्राप्त झाले आहेत. समाजामध्ये अनेक प्रकारचे तणाव कमी होण्यास मदत झाली आहे. सहकारी संस्थांमुळे  लोकांना लोकशाहीचे प्रशिक्षण मिळाले. स्थानिक नेतृत्व निर्माण करण्यात सहकारी चळवळ यशस्वी झाली आहे.

माळशिरस तालुक्यातील अनेक सहकारी संस्थापैकी काही प्रातिनिधीक स्वरुपाच्या संस्थाचा अभ्यास करताना असे दिसते की, या संस्थाच्या स्थापनेमुळे जनतेच्या आर्थिक जीवनावर परीणाम झाला आहे. १९६६ साली यशवंत सहकारी साखर कारखान्याची स्थापना झाली. असून कारखान्याच्या स्थापनेपासून सन २००० पर्यंत कारखान्यातील उत्कृष्ट कार्यक्षमता, उत्कृष्ट उत्पादकता, उत्कृष्ट कारखाना कामगार कार्यक्षमता अशाप्रकारे विविध पुरस्कार मिळाले आहेत. कारखान्यामार्फत सामाजिक बांधिलकी राखण्यासाठी सभासद विमा योजना, कामगार विमा, ऊस विकास योजना, हॉस्पिटल ट्रस्ट, शेतकरी कल्याण निधी, ऊस लागवडीसाठी कर्जे, शैक्षणिक सोय, कुस्ती स्पर्धा, सामुदायिक विवाह, रक्तदान शिबीरे इत्यादी सोयी सुविधा पुरविल्या जाऊन त्यामध्ये यश संपादन केले. कारखाना विकासासाठी उपपदार्थ डिस्टीलरी, ॲसिटीक ॲसिड, सायलेंन्ट स्पिरीट, मिथेन गॅस इत्यादी निर्मिती, केली जाते. त्यामुळे सभासदांना ऊस दर जादा मिळून त्यांच्या आर्थिक स्थितीत प्रगती झाली आहे.

कै. शंकरराव मोहिते पाटील, विजयसिंह मोहिते पाटील, जयसिंह मोहिते पाटील यांचे कारखान्यास नेतृत्त्व आजपर्यंत लाभले आहे. कारखान्याचे प्रशासन अत्यंत पारदर्शक व कार्यक्षम आहे. कारखान्याचा कारभार चालवताना संचलक मंडळाने विश्वस्ताच्या भावनेतून काम करुन स्वतःचा स्वार्थ न साधता, भ्रष्टाचार न करता, तालुक्यातील जनतेत पत व विश्वास निर्माण केली आहे. कारखान्याच्या स्थापनेपासून ते आजतागायत एकवेळ वगळता प्रत्येक पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध केल्याने होणारा खर्च टळला आहे. हा सहकार क्षेत्रातील उच्चांका आहे. म्हणूनच यशवंत सहकारी साखर कारखाना हा महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रामध्ये आदर्श ठरला आहे. याशिवाय तालुक्यातील पांडूरंग सहकारी साखर कारखाना लि. श्रीपूर, शंकर सहकारी साखर कारखाना सदाशिवनगर, या सहकारी क्षेत्रातील कारखान्यांच्या योगदानामुळे तालुक्यातील जनतेच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक जीवनमान उंचावले आहे.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँक, शंकरराव मोहिते पाटील बँक, सुमित्रा पतसंस्था या सहकारी संस्थांनी तालुक्यातील शेतकरी, उद्योगधंदे, कारागीर, मजूर, छोटे उद्योग, व्यापारी, जनावरे घेण्यासाठी असे विविध प्रकारचे कामासाठी कर्जपुरवठा करुन आर्थिक स्तर उंचावण्यासाठी हातभार लावला आहे.

सहकार चळवळीचा विकास घडवून आणणेसाठी निष्ठावान अशा नेतृत्वाची आवश्यकता असते. ज्यांना सहकाराचे ज्ञान आहे, त्यांची तत्त्वे माहित आहेत ज्यांना सहकार चळवळींची आस्था वाटते, असे नेतृत्व सहकारी चळवळीचा विकास घडवितात. महाराष्ट्रामध्ये डॉ. गाडगीळ, वैकुठभाई मेहता, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, विखे-पाटील, रत्नाप्पा कुंभार, तात्यासो कोरे इत्यादी त्यांगी व कतृत्ववान नेतृत्वामुळे सहकारी चळवळींचा विकास मोठया प्रमाणात झाला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे या चळवळीला लाभलेले तालुक्यातील नेतृत्त्व होय.

येथे खऱ्या अर्थाने सहकारी चळवळीला चालना मिळाली. ती कै. शंकरराव मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या यशवंत सहकारी कारखान्यामुळे येथून पुढच्या काळात तालुक्यामध्ये जो सहकाराचा, विकास झाला त्याचे मुख्य कारण म्हणजे शंकरराव

मोहिते पाटील, विजयसिंह मोहिते पाटील, जयसिंह मोहिते पाटील, चांगोजीराजे देशमुख, विष्णूपंत कुलकर्णी इत्यादींचे सहकारी चळवळीस लाभलेले नेतृत्त्व व मार्गदर्शन यामुळेच होय. विशेषतः शंकरराव मोहिते पाटील, यांनी तालुक्यात विविध सहकारी संस्था १९८० पर्यंत स्थापन केलेल्या आहेत. या संस्था सध्या महाराष्ट्रात नव्हे तर भारतात उत्कृष्टपणे कार्यरत आहेत. तालुक्यातील नव्हे तर सोलापूर जिल्हयातील अनेक सहकारी संस्थाच्या जडणघडणीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. शंकरराव मोहिते पाटील यांच्या सहकारी चळवळीच्या विचारसरणीतून कार्य करणारी नेते मंडळी मोठया प्रमाणात आहेत.

माळशिरस तालुक्याच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक विकासास सहकारी चळवळ व त्या चळवळीला लाभलेले नेतृत्व आहेत. नैसर्गिक परिस्थिती अनुकूल नसताना नीरा भाटघरचे पाणी आणून माळशिरस तालुक्याचा सहकारी चळवळीच्या माध्यमातून जाळे खेडयापाडयापर्यंत विणून त्याचा मोठया प्रमाणात झालेला विकास हा इतरांसाठी आदर्श व मार्गदर्शक आहे.

# ● संदर्भ सूची ●


१) अर्थसंवादाचे विविध अंक व टाटा सव्हिसेस स्टॅटिस्टिकल आऊटलाइन (१९९५-९६)

२) अुगळे जयंत, शतकोत्तर सहकार, (प्रका) अजिंक्यतारा सहकारी मुद्रणालय, लि. सातारा. प्रथमावृत्ती २००४.

३) उपमहानिर्देशक, हवामानशास्त्र, मुंबई. २००५.

४) कर्वे चि. ग. जोगळेकर, स. आ. व शं गा जोशी (संपा) महाराष्ट्र परिचय संयुक्त महाराष्ट्राचा ज्ञानकोश प्रसाद, प्रकाशन सन १९५४, पुणे.

५) प्रा. कृल फाले, ए. एम. पणम. 'सहकारी संस्थांसाठी अर्थसहाय्याच्या विविध योजना',

६)

७) डॉ. गो.स. कामत, सहकारः तत्व, व्यवहार आणि व्यवस्थापन,

८) कुलकर्णी पी. आर.,सहकार तत्त्व आणि व्यवहार , पिंपळापुरे ॲन्ड पब्लिशर्स नागपूर, प्रथमावृत्ती , जुन १९९०.

९) संपादक, कुंभार चंद्रकांत, साप्ताहिक 'आनंदयात्री' वाढदिवस विशेषांक, दि. २५/०६/२००७ ते दि. ०१/०७/२००७.

१०)जोशी प्रमोद, परीसस्पर्श, प्रकाशकः शंकरराव मोहिते-पाटील स्मरणिका कमिटी, अकलूज. पहिली आवृत्ती १९९७

११)डॉ. जोशी सी. जे. 'सहकाराचा विकास' फडके प्रकाशन, कोल्हापूर जून २००५

१२) डॉ. जोशी सी. जे., 'सहकाराची तत्त्वे आणि व्यवहार', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

१३) जुगळे वसंत, 'महाराष्ट्रातील सहकारी चळवळ : दशा आणि दिशा', समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी १९९६.

१४) तहसिलदार कार्यालय, माळशिरस तालुका येथील संगणकीय नकाशावर आधारीत माहिती.

१५) तामलकी एस. एस. 'कोऑपरेशन इन इंडीया ॲन्ड अ ब्रॉन्ड' बेसल मिशन प्रेस मेंगलोर १९३१.

१६) डॉ. दास्ताने संतोष, 'महाराष्ट्र २०११' प्रकाशक दास्ताने रामचंद्र कं. पुणे.

१७) पंचायत समिती कार्यालय, माळशिरस यांचेकडील कृषी अधिकारी मासिक सभा फाईल. २००२-०३ दि.२७/०२/२००२.

१८) पंचायत समिती माळशिरस, प्रपत्र क्र. १ तालुका गोषवारा दीर्घकालीन यथार्थदर्शी प्रारुप आराखडा. तयार करण्यासाठी गावनिहाय गोळा करावयाची विकासात्मक आकडेवारी संदर्भ कालावधी १/०४/२०००

१९) पशुगणना २००३ व जिल्हा सामाजिकी व आर्थिक समालोचन सोलापूर जिल्हा २००६-०७ अहवाल तक्ता क्र.६.१३, ६.१४ पान ६१ते६९

२०) मगर हरिश्चंद्र, 'महाराष्ट्राचे शिल्पकार, शंकरराव मोहिते पाटील', प्रकाशकः- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, प्रथमावृत्ती २०१०.

२१)'महाराष्ट्रातील सहकारी चळवळ' एका दृष्टीक्षेपात २००२ (भाग २) २००३.

२२) संकलक-माने अ. ब. 'शंकरराव एक कल्पवृक्ष' 'स्मृतिग्रंथ', १९८०.

२३) माळशिरस तालुका पाटबंधारे कार्यालय, यांचेकडील माहिती उपमहानिबंधक हवामान शास्त्र, मुंबई. २००५.

२४) डॉं. माथूर बी.एस. 'को. ऑपरेशन इन इंडीया' ले. तृतीय आवृत्ती साहित्य भवन १९७७.

२५) यशवंत सहकारी साखर कारखाना, लि. शंकरनगर अकलूज, वार्षिक अहवाल, १९८२-८३ ते १८८८.

२६) संपादकः राऊत नागनाथ 'सुवर्णभरारी' अमृतमहोत्सव स्मरणिका, प्रकाशक-सुभाष देशमाने सन २००७.

२७) विजय सहकारी कुक्कुटपालन संघ लि. विजयनगर विझोरी, वार्षिक अहवाल, सन १९८९-९० व २०००-२००१.

२८) शंकरराव मोहिते पाटील सहकारी बँक लि. अकलूज वार्षिक अहवाल सन १९९२-९३

२९) शंकरराव मोहिते-पाटील सहकारी सूत गिरणी लि. अकलूज.पिसेवाडी ता. माळशिरस जि. सोलापूर १९९३-९४ ते २०००-२००१ पर्यंतचे १५, १६, १७, १९, २१, २२ चे वार्षिक अहवाल.

३०) प्रा. शहा रुपा, डॉ. बी. एच दामजी, 'सहकार' मेहता पब्लिकेशन, पुणे १९९२.

३१) डॉ. शंकरराव मगर, स्मरण महाराष्ट्राच्या शिल्पकाराचे, विशेष स्मरणिक, संपादकः एक्स्प्रेशन पुणे. २०१०.

३२) शिंदे वसंतराव, 'सहकारी महाराष्ट्र' मानद सचिव महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे. जुलै. २००४.

३३) शिवधन रौप्य महोत्सव स्मरणीका, २०००

३४) शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ मर्यादित विजयनगर-अकलूज ता. माळशिरस जि. सोलापूर १९९२-९३, १९९९-२०००, २०००-२००१ चे १८, २५, २६ वे वार्षिक अहवाल.

३५) दै. सकाळ, बुधवार, दि.२३ जून १९९९.

३६) ले. प्रा. सराफ मोहन, ना. मा. आचार्य 'सहकार' मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे. १९९२.

३७) संपादक साळुंखे लारा, 'जाणिव' साप्ताहिक, प्रकाशक-विनायक आर्टस पुणे.

३८) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सह. साखर कारखाना लि. शंकरनगर वार्षिक अहवाल सन १९८९ ते २०००.

३९) सिद सचिन मु. पो. माळशिरस यांनी दिलेल्या दि.२०/१२/२०१० रोजी दिलेल्या माहितीनुसार.

४०) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अकलूज. ता. माळशिरस यांचे कार्यक्षेत्रातील सहकारी संस्थांची यादी. २००९.

४१) सार्वजनिक बांधकाम कार्यालय अकलूज यांचेकडील कार्यालयीन माहिती

४२) सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँक, मर्या. सोलापूर वार्षिक अहवाल, २०००-०१.

**४३)**श्री. १००८ महावीर स्वामी दिगंबर जैन, अतिशय क्षेत्र दहिगाव.

परिशिष्टये:

**फोटो**

१) कै. शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील

२) श्री. विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील


३) श्री. विष्णुपंत विठ्ठलराव कुलकर्णी

४) श्री. प्रतापसिंह शंकरराव मोहिते पाटील

५) श्री. जयसिंह शंकरराव मोहिते पाटील

६) कै. बापुराव तुळशिराम सिद

७) कै. पांडुरंग सालगुडे-पाटील




सहकार महर्षि कै. शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील


संघाचे संस्थापक



विजयसिंह शंकरराव मोहिते - पाटील


मा. श्री. विष्णुपंत विठ्ठलराव कुलकर्णी




मा. श्री.प्रतापसिंह शंकरराव मोहिते — पाटील

मा.श्री. जयसिंह मोहिते-पाटील





कै. बापुराव तुळशिराम सिद



मा.श्री. पांडुरंग सालगुडे-पाटील

श्री. शंकर सहकारी साखर
कारखाना लिमिटेड, सदाशिवनगर,



शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज



अकलूज विविध कार्यकारी सहकारी
सोसायटी लि., अकलूज



कृषि उत्पन्न बाजार समिती, अकलूज



कृषि उत्पन्न बाजार समिती, अकलूज



राजहंस सहकारी कुक्कुट पालन
संघ लि., शंकरनगर, अकलूज



जवाहर को-ऑपरेटिव्ह इंजि. ॲन्ड
मेकॅनिकल वर्क्स लि., अकलूज



शिवपार्वती सार्व. विकास ट्रस्ट
(ग्रीन फिंगर्स इंग्लीश मेडीयम स्कूल), अकलूज



शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघ मर्यादित
अकलूज



शंकरराव मोहिते पाटील सह. बँक. लि.
अकलूज



शिवरत्न शिक्षण संस्था (शंकरराव मोहिते-पाटील
इंग्लीश स्कूल धवलनगर, अकलूज)



प्रताप क्रिडा मंडळ शंकरनगर, अकलूज



स. सा. का. ऊस वाहतूक संघ मर्यादित, अकलूज



शंकरराव मोहिते सहकारी सुतगिरणी लि.
अकलूज



शंकरराव मोहिते सहकारी सुतगिरणी लि.
अकलूज



विजय सहकारी कुक्कुट पालन संघ लि.
विजयनगर, अकलूज



विजय सहकारी कुक्कुट पालन संघ लि.
विजयनगर, अकलूज



शिवकृपा कुक्कुट पालन उद्योजक सहकारी
संघ मर्या., अकलूज



शिवकृपा कुक्कुट पालन उद्योजक सहकारी
संघ मर्या., अकलूज



१. विजयरत्न सहकारी पशुपक्षी संवर्धन संघ लि.
शंकरनगर, अकलूज



शिवशंकर मध्यवर्ती सह. ग्राहक संस्था मर्यादित
अकलूज



सुमित्रा नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अकलूज



१४. सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील प्रतिष्ठान
संचलित विजयसिंह मोहिते-पाटील महाविद्यालय
नातेपूते,



श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील
माळशिरस तालुका ग्रामीण बिगरशेती
सहकारी पतसंस्था मर्या. शंकरनगर, अकलूज



सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना लि., शंकरनगर, अकलूज

